१८६४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १५१०

# मराठी अस्मिता

मधुकर केचे

REFBK-0013776

३६८५०
क्रमांक—
६.२.६४
अ. शा.
१५१०

# म रा ठी
# अ स्मि ता

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3६८५0 वि: निबंध
क्रमांक १५७० नों० दि० ६/८/६८

संपादक

प्रा. मधुकर केचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३८८६

REFBK-0013776

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मूल्य दोन रुपये

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथम मुद्रण : जून १९६२
पुनर्मुद्रण : जून १९६३
पुनर्मुद्रण : ऑगष्ट १९६४

प्रकाशक
प्र. दि. बेदरकर
महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मुद्रक
पां. ना. बनहट्टी
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर १

# अ नु क्र म णि का


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | पाच |
| १ | वाचनाची खरी रीत | वि. कृ. चिपळूणकर | ११ |
| २ | स्वामी विवेकानंद | बा. गं. टिळक | १८ |
| ३ | एक कल्पित गोष्ट | शि. म. परांजपे | २५ |
| ४ | वर्तमानपत्रकर्ता | श्री. कृ. कोल्हटकर | ३७ |
| ५ | सिमलावर्णन | न. चिं. केळकर | ५० |
| ६ | यंत्र हे शाप की वरदान ? | वि. दा. सावरकर | ५८ |
| ७ | लोकाश्रयी मराठी वाङ्मय | श्री. व्यं. केतकर | ६४ |
| ८ | हरिमय जीवन | विनोबा भावे | ७१ |
| ९ | कुमार आणि साहित्य | प्र. के. अत्रे | ७८ |
| १० | शाहिरी काव्य | ग. त्र्यं. माडखोलकर | ८७ |
| ११ | चंद्रास्त | सौ. कुसुमावती देशपांडे | ९४ |
| | लेखकांचा परिचय | … … … | १०१ |

# मराठी अस्मिता

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 36850 दि:
क्रमांक 9490 नों दि
93668

## प्रस्तावना

मराठी निबंध वाङ्मयाच्या खाणीत विखुरलेल्या रत्नांना एकत्र माळण्याचे प्रयत्न आजवर अनेक झाले. गंभीर व ललित, समाजविषयक व साहित्यविषयक इ. अनेक सूत्रे त्याबाबत अवलंबिली गेली. आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ असेही विभाजनप्रकार त्यात आले. यात बव्हंशी भर निबंधाच्या बाह्य आकारांवर, कथन-विषयांच्या विविधतेवर किंवा प्रतिपादनाच्या प्रकारांवर असलेला आढळून आला. त्या त्या दृष्टींनी ती कार्ये मराठीच्या अभ्यासकाला उपकारकच ठरली. पण अमुक एक विषय, तो मांडण्याचा अमुक एक प्रकार, त्या मागची अमुक एक बैठक एवढ्याने केवळ मराठी निबंधाची सर्व अंगे संपत नाहीत. गेल्या अर्धतपाच्या अवधीत मी निबंधांना ओवण्यासाठी पक्के व पुरेसे सूत्र शोधीत होतो. कृतज्ञतेने बोलायचे ते हे की महाराष्ट्रात विद्यमान असलेल्या कित्येक विद्वान मंडळींनी मला याबाबत मार्गदर्शन करून उपकृत केले. या सर्व चर्चेमधून जे निष्पन्न झाले ते हे की महाराष्ट्र जीवनाचे प्रतिबिंब वास्तव अर्थाने निबंधात जास्तीत जास्त पडले आहे. एवढ्या महान व संस्कृतीची थोर परंपरा असलेल्या प्रदेशाचे जीवन विविध असणारच. लो. टिळक, आगरकर त्याही आधी मिशनरी, इंग्रज, चिपळूणकर इ. जीवनप्रवाह महाराष्ट्रात नांदले. सोबतच जीवनासाठी कला की कलेसाठी कला इ. वादही महाराष्ट्राच्या जीवंत महानतेची साक्ष देऊन

गेले. समाजसुधारणा, राजकारण, धर्मकारण, भाषा इ. विषय हे या प्रदेशाला प्राणभूत ठरले आहेत. हे सर्व विविध वाटत असले तरी त्यात एकात्मता आहे. झगडे करणारे दोन्ही पक्ष भाषा, धर्म व मुख्य म्हणजे भारत देश यांच्याशी इमानदार आहेत. म्हणूनच या ना त्या कारणाने परस्परांशी मतभेद राखणारे थोर लोक आपापल्या विचार-प्रणालींनी या प्रदेशाची अस्मिता प्रकट करीत होते. एकाच जीवनाची ती विविध अंगे होती. त्यामुळेच हे सर्व परस्परविरोधी लोक त्यांच्या विविध मतांसहितही महाराष्ट्राला थोर वाटले. महाराष्ट्राचे अस्तित्व असे विविधतेतही टिकवून ठेवणारे सूत्रच त्यामुळे प्रबळ ठरले.

आजवरच्या रूढ प्रकाराप्रमाणे गांभीर्य व लालित्य याच दृष्टीने निबंधाकडे पाहण्यापेक्षा शैलीस प्राणाप्रमाणे असणाऱ्या व्यक्तिमत्वाच्या दृष्टीने निबंधाकडे पाहणे आवश्यक आहे. आणि हे व्यक्तिमत्त्व लेखकाचे लेखनापुरते नसून जीवनातही ते प्रस्फुट झालेले असावे. कादंबरी, नाटक इ. कल्पनाधारित वाङ्मयप्रकारांची गोष्ट न्यारी आहे. निबंध हा काही वाङ्मयीन सत्याभास नव्हे. निदान मराठी निबंध तरी अशा तंत्रापेक्षा वेगळा आहे. मराठी निबंध हे त्या त्या लेखकाचे त्या त्या काळाचे जीवनसत्य होय. अशाच उत्तम व जीवनस्पर्शी निबंधांतून ही निवड करण्याचा हा नम्र प्रयत्न आहे. निबंधाच्यामधून प्रगट होणारे व्यक्तिमत्व जेवढे मोठे तेवढाच तो निबंधही त्या कारणासाठी मोठा. अशा ओजस्वी व्यक्तिमत्त्वांचा व महाराष्ट्र हालविणाऱ्या, घडवणाऱ्या महान मेंदूंचा व उरांचा स्पर्श सुदैवाने मराठी निबंधाला झाला. अर्थातच मराठी निबंधापासून ललित, गंभीर इ. बाह्योपचारी अपेक्षा करण्यापेक्षा या सागरस्पर्शी प्रदेशाची संस्कृती, विद्वत्ता, जागृती यांचे प्रतिनिधित्व व जनकत्व करणारे व्यक्तिमत्त्व त्यात शोधणे हेच उचित आहे. महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक, राजकीय, भाषिक इ.

क्रांती घडवणारे महर्षी मराठीला निबंध-लेखक म्हणून लाभले. त्यांचे शील व त्यायोगे उभ्या शिवराष्ट्राचे 'सत्यं शिवं सुंदरं' शील त्यांच्या शैलीत पाहायला मिळते. आजच्या तांत्रिक अपेक्षा पूर्ण करणारे अभिव्यक्तीचे सामर्थ्यही त्यांच्यात आढळते. अर्थात ते येथे दुय्यम महत्त्वाचे असले तरी तंत्रकरूंच्या अपेक्षा भागवायला कैक पटींनी समर्थ आहे.

मराठी निबंधाला त्याच्या आरंभकाली तरी वाङ्मयीन हेतूपेक्षा बलवत्तर असा जीवनोन्मुख हेतू होता. चिपळूणकरांनी भाषावृद्धीच्या निमित्ताने जरी लेखणी हाती घेतली तरी देशाच्या जीवनाबद्दल बोलल्याखेरीज ती खाली ठेवली नाही. या तेजस्वी व ओजस्वी हेतूला समाजजागृतीचे व मराठी अस्मितेचे अधिष्ठान होते. अशी ही मराठी गद्य परंपरा कथनप्रकारांच्या, विषय, आकारांच्या खेळापेक्षा मराठी शीलासच अधिकाधिकपणाने आजही जपत आहे. म्हणूनच मनोरंजनासाठी व कथनप्रकाराच्या विविधतेचे चोचले पुरविण्यासाठी अनेक खंदे लेखक झटत असताना विनोबासारखे पवित्र, जागृत विचाराग्रणी या निबंधप्रकाराची सेवा करीत आहेत व परंपरा कायम राखीत आहेत.

गद्यलेखक सुबंधु ('वासवदत्ता' या गद्यकथेचा कर्ता) याच्या 'निबंध' शब्दामुळे एका निराळ्याच वाङ्मयप्रकारासाठी निबंध हा शब्द रूढ झाला असे वाटणे एकंदर निबंधवाङ्मयाबद्दल खरे आहे; पण तंत्राने सांगितलेल्या कृत्रिम कक्षा तोडण्यातच जीवंत वाङ्मयाचे नवनवोन्मेषीपण सिद्ध होत असल्यामुळे आज जशी कथा ही रूढ अर्थाने कथा उरलेली नाही तसाच निबंधही अर्धजुन्या अर्थाने निबंध राहिला नाही. आजची कथा ही निबंधाकडे झुकत आहे असे तंत्राभ्यासी म्हणतात. आणि त्याच अर्थाने काही निबंधही कथेकडे झुकलेले आढळतात. तऱ्हा (फॅशन) बरेचदा बदलत बदलत जुन्याकडे व शेवटी उगमाकडे वळत असते. हाच प्रकार होऊन आजचा निबंध

हा सुबंधूच्या अर्थाकडे वळत आहे. गुजगोष्ट, ललित लेख, लघुनिबंध हळूहळू तिकडे वळत आहेत. त्यात हा प्रत्यय देणारा कुसुमावतींचा निबंध या संग्रहात मुद्दाम घेतला आहे. अर्थात हाही बाह्य आकाराचाच झगडा. मराठी अस्मितेत समाजजागृती जशी येते तशीच विद्वत्तेला शोभणारे कविपणही येते. कुसुमावतींनी हीच सांगड घातली.

थोर पुढारी, देशभक्त इ. नंतर कवी व विचारवंत यांनीही निबंधाला घाट दिला. हाही भेद वरवरचाच. मराठीचे सुदैवच हे की निबंध लिहिणारे देशभक्त अनायासेच वाङ्मयगुणसंपन्नही होते. म्हणूनच वाङ्मयचर्चा, सच्चरित्र, स्थलवर्णन, राष्ट्रप्रेम, समाजदोषदर्शन, मराठी स्वाभिमान इ. परस्पर वेगळे वाटणाऱ्या निबंधविषयाची माळणी अस्मितेच्या धाग्याने करता आली. हे सर्व विविध विषय देशप्रेमाकडे, व्यापकतेकडे व समाजोन्नती व जागृती यांच्याकडे तोंडे वळवीत आहेत. महाराष्ट्राची अखंड व उदंड अशी राष्ट्रव्यापी अस्मिताच त्या सर्वांतून प्रगट होत आहे.

कणखरपणा व लालित्य, गंभीरता व सहजता इ. बाह्य प्रकार मराठी निबंधकारांबद्दल करणे हे धाडसाचे आहे. टिळक म्हटले की निबंध आगपाखडू असलाच पाहिजे आणि परांजप्यांनी देशप्रेमामुळे व इंग्रजांपासून निसटण्यासाठी विनोद वगैरे करूच नये असा मराठी वाचकांचा समज होणे शक्य आहे. पण दरवेळी त्या त्या लेखकांचे तेच तेच वाङ्मय नजरेसमोर असल्यामुळे प्रत्येक लेखकावर प्रकाराचा शिक्का मारण्याची सोय झाली. वास्तविक त्या सर्व खंद्या लेखकांनी इतके विपुल व विविध लिहिले आहे की ते सर्व वाचल्यानंतर आपण उगीचच पूर्वग्रहदूषित होऊन टिळकांना कडक, अत्र्यांना नुसते हसवणारे, सावरकरांना केवळ देशभक्त वगैरे म्हणत होतो याची लाज वाटू लागते.

त्याच दृष्टीने टिळकांच्या लालित्याचा, परांजप्यांच्या विनोदाचा, अत्र्यांच्या शांत सोज्वलतेचा व सावरकरांच्या यंत्रासारख्या विषयावरील विचारांचा प्रत्यय येणाऱ्या कृती येथे मुद्दाम निवडल्या. हे असे वेगळे निवडताना नेहमीचा लेखक एकदम वेगळा दिसेल व त्यामुळे त्याच्या आजवर उमटलेल्या व्यक्तिमत्वावर बोळा फिरेल ही धास्ती केव्हाही आली नाही. कारण टणकपणा व लालित्य ही महाराष्ट्राच्या एकाच स्वभावाची दोन अंगे आहेत. 'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास कठीण वज्रास भेदू ऐसे' अशा लोकांचा हा महाराष्ट्र ! ललित व गंभीर या सदरात आजवर होणारी सोयीस्कर विभागणी येथे थांबली व त्या दोन्ही प्रकारांमागे एकच व्यक्तिमत्व आहे असे सिद्ध झाले.

महाराष्ट्र-जीवनाचे असे निबंधांतून पर्यायाने दर्शन होत असतानाच त्याचे प्रत्यक्ष दर्शन देणारे डॉ. केतकरांसारखे लेखकही मिळाले. टिळक, केळकर, परांजपे, कोल्हटकर यांचे निबंध म्हणजे महाराष्ट्र दाखवणारी चिन्हे आहेत तर डॉ. केतकरांचा 'लोकाश्रयी मराठी' हा निबंध ह्या चिन्हांवरचे भाष्य आहे.

यंत्र, वृत्तपत्र, धर्म, थोर लोक, उगवती पिढी, निसर्ग इ. समाजाच्या प्रमुख अंगांबद्दलचे निबंध निवडीत असताना पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्याची कल्पना येत होती. मराठी निबंध नेहमीच समाजाच्या जीवनभास्कराभोवती फिरला. त्या जीवनसूर्याचे तेज प्याला. त्याच वेळी पृथ्वीप्रमाणे त्याचे स्वांग परिभ्रमणही चालूच होते. साहित्यविषयक अशी मराठी निष्ठा प्रदर्शित करणारे माडखोलकर, चिपळूणकर इ. चे निबंध म्हणजे त्याची साक्ष. जीवनविषयक व साहित्यविषयक अशा दोन्ही मूल्यांचे अधिष्ठानही शेवटी मराठी अस्मितेतच असल्यामुळे त्यांचा भेद हा वरकरणी म्हणावा लागेल. विषय, कथन-

प्रकार अथवा आकार यांच्या कक्षेत हा संग्रह किती येईल त्याचा आग्रह येथे नाही. मराठी व्यक्तिमत्वाचा धागा सर्वांना आहे की नाही ते पाहणे हीच त्याची कसोटी होती. मराठ्यांचे व मराठीचे थोर व्यक्तिमत्त्व समर्थ शैलीकारांनी, रीतीकारांनी, नेत्यांनी, संतांनी, कवींनी आणि विचारवंतांनी पुरेसे प्रगट करून मराठी निबंध सजवले हा प्रत्यय जर आजच्या सुशिक्षित व जागृत वाचकाला आला तर त्यामुळे या संग्रहाचा हेतू परिपूर्ण होणार आहे.

—मधुकर केचे

# वाचनाची खरी रीत

* * *

विष्णु कृष्ण चिपळूणकर

वाचनाचा प्रघात आपल्या लोकात सध्या कितपत आहे तो पाहू. पूर्वीच्या पद्धतीचे जे लोक आहेत त्यांच्या वाचनाचा वर एक प्रकार सांगितलाच आहे,—की ज्ञानेश्वरी, भगवद्गीता अशांसारखे ग्रंथ ते नियमाने वाचतात; पण ते केवळ भाविकपणाने, म्हणजे आपण जे वाचतो त्याचा अर्थ आपणास कळावा इतकीसुद्धा थोडयांचीच इच्छा असते ! हे असले वाचन विद्येच्या दृष्टीने केवळ निरर्थक होय हे उघड आहे. आता नव्या पद्धतीचे लोक पाहू. यांपैकी फार करून सगळ्यांचे मुख्य वाचन म्हटले म्हणजे वर्तमानपत्राचेच होय. सांजसकाळ लायब्ररीत खेप घालून आले म्हणजे त्या दिवसाचे कर्तव्यकर्म आपण बजावले असा पुष्कळांचा समज दिसतो. पण खरोखरीची जी लायब्ररी तिजकडे बहुधा कोणी महिन्याचे महिने ढुंकूनही पहात नाही. तेथे खरा अक्षय वास म्हटला म्हणजे अंधाराचा व केराचा. पुस्तकांचा खरा चालक म्हणजे महिन्या दोन महिन्यांनी त्यांवर मळ झाडणारा गडी, आणि त्यांचे खरे उपभोक्ते म्हटले म्हणजे कृमिकीटक ! हा हास्यास्पद प्रकार बहुधा जेथे तेथे दृष्टीस पडत असेल यात संशय नाही. पण याबद्दल कोणासही कधी काही चमत्कार वाटला आहे, किंवा तो मोडायाचे मनांत आहे, असे बिलकूल आढळत नाही ! याचे कारण काय असावे बरे ? एकंदर लोकात एकाएकी ज्ञानाची भरती येऊन आजपर्यंत मोठे मानलेले ग्रंथही त्यांस आज एकदम नादान वाटू लागले; किंवा देशात

विद्येची अगदी रेलचेल होऊन गेल्यामुळे अधिक शिकण्यास आता जागाच उरली नाही; अथवा सर्व लोक एकंदर लोककल्याणाच्या कामास लागून मार्ग तयार करण्याच्या किंवा कलाकौशल्य वाढवण्याच्या कामास गुंतले तर नाहीत ना! काय असेल ते असो. याचे कारण आम्हांस एक सुचते ते हे की, वरच्यासारखे प्रकार केवळ लोकाचाराचे होत. सुधारलेले शहर म्हटले म्हणजे जशी त्यात म्युनिसिपालिटी पाहिजे, सभागृह, नाटकगृह वगैरे अवश्य आलीच; त्याचप्रमाणे पुस्तकालय. त्याची एकदा स्थापना होऊन गेली पाहिजे; मग पुढे त्याची व्यवस्था काही का होईना? त्याचा मूळचा अर्थ असा खरा, की उपयुक्त व मनोरंजक पुस्तके यात ठेवून ती लोकांनी वाचावी, व तेणेकरून ज्ञान-प्राप्ति करून घेऊन देशभाषेत तसे ग्रंथ रचण्याची त्यास उमेद यावी; व पहिल्या पहिल्याने हा त्यांचा उद्देश बराच सिद्धीस गेला. पण त्याचे आता काय? जे पहिल्याने खरोखर उपयोगाकरिता होते ते आता केवळ शोभेचे कलम झाले आहे. सारांश, आमच्या राजेरजवाडयांस कमरेस रेशमी म्यानात लटकणाऱ्या तरवारीचा जितका उपयोग, किंवा प्रत्येक शौकीन गृहस्थांच्या बंडयांच्या कप्यात टिकटिक करणाऱ्या धाकटया घडयाळांचा त्यांस जितका उपयोग, तितकाच घरच्या दिवाणखान्यात सुंदर सोनेरी पुठ्ठे करवून नीट बेताबेताने ठेवलेल्या लायब्ररीतील बुकांचा! असो, एकंदरीत सांगावयाचे काय की, याप्रमाणे ग्रंथवाचनाचा प्रघात बहुतेक सोडून नुसती वर्तमानपत्रेच वाचण्याकडे आमच्या लोकांचा दिवसेंदिवस कल होत चालला आहे. यावरून वर्तमानपत्रे वाचणे अगदी निरर्थक, त्यांस लोकांनी आश्रय देणे अगदी गैर आहे, असे म्हणण्याचा आमचा बिलकूल रोख नाही. ती वाढविणे हे भाषेच्या संबंधाने व सरकार संबंधाने लोकांस फार हितावह होय अशी आमची पक्की खात्री आहे. पण त्यापलीकडे ज्ञानाचे साधनच नाही, ही जी लोकांची समजूत

होत चालली आहे ती मात्र फार गैर आहे हे आम्हास दाखविणे आहे. वर्तमानपत्रे वाचणे हे इंग्रज लोक सकाळी चहा घेतात त्यासारखेच पुष्कळ अंशी होय. म्हणजे अर्धे पोषण अर्धी करमणूक असाच दोहोंचा प्रकार आहे. शरीराचा निर्वाह होऊन त्याचे यथास्थित पोषण होण्यास जसे चांगले जेवणच पाहिजे त्याप्रमाणेच खरी उपयोगाची अशी विद्वत्ता ज्यास संपादन करणे असेल त्याने मोठमोठ्या नानाविधविषयक ग्रंथांचा ऊहापोहपूर्वक यथास्थित व्यासंगच केला पाहिजे. हे परिश्रम केल्याने आलेला शीण घटकाभर दूर करण्यास व जगात काय उलाढाली चालल्या आहेत त्या समजण्यास वरील पत्रांचा आदर करणे बरोबर आहे; पण त्यांना विद्येच्या शिखरावर बसवून ठेवणे हे अगदी शोभत नाही. फार तर काय, पण कित्येक मोठमोठ्या ग्रंथकारांचे असेही मत आहे की, वर्तमान-पत्रे, मासिक पुस्तके, इत्यादिकांची समृद्धी लोकांस अपायकारक होय. का की हीच चालून पालून वरवर वाचण्याची सवय एकदा मनास लागून गेली म्हणजे विचारपूर्वक व शोधकबुद्धीने मोठमोठे ग्रंथ सावकाश वाचण्याचा मनास कंटाळा येऊ लागतो. व यामुळे वरवरचे शुष्क पांडित्य मात्र चोहोकडे माजून खऱ्या विद्वत्तेचा लोप होतो.

प्रस्तुत विषयावर निरनिराळ्या संबंधाने आणखी पुष्कळ लिहिता येईल. पण सरतेशेवटी एका मात्र गोष्टीविषयी काही लिहून हा निबंध आटपतो. ज्यांस ग्रंथ वाचण्याचा नाद असतो, किंवा डौलाकरता जे तसा आव घालतात, ते बहुधा आपली विद्वत्ता वाचलेल्या पानांच्या संख्येवर लेखतात, म्हणजे जितकी पाने आपण वाचली तितक्या मानाने आपले ठायी अधिक ज्ञान आले असे ते समजतात. पण हा केवढा भ्रम आहे हे हवे त्यास अंमळ विचार केला असता कळण्यासारखे आहे. जितके जितके ज्याने वाचले तितका तितका तो विशेष ज्ञानसंपन्न व शहाणा असे जर असते, तर सध्याचा काळ जगाच्या मागील सर्व काळांपेक्षा ज्ञानात व शहाणपणात

श्रेष्ठ असता, कारण हल्ली जितके ग्रंथ झाले आहेत व होताहेत, व लोकात वाचनाचा सध्या जेवढा प्रचार आहे त्याचा लक्षांशही प्राचीन काळी नव्हता. पण चमत्कार पहा काय आहे, की अत्यंत प्राचीन काळाचेच महान महान ग्रंथकार कीर्तिमंदिराच्या अत्युच्च पदावर जे एकदा अटळ बसले आहेत ते आहेत ! हल्लीच्या काळी ज्ञानाचा केवढाही फैलावा झाला तरी त्यांची सर कोणालाही येत नाही ! तेव्हा यावरून स्पष्टच दिसते की, वाचलेल्या ग्रंथांच्या संख्येचा आणि विद्वतेचा मेळ घालणे हे नेहमी बरोबर असते असा नेम नाही. ज्याने दहा ग्रंथच वाचले पण मनपूर्वक शोधकबुद्धीने वाचले त्याचे ज्ञान आणि ज्याने शेकडो भरभर वाचून फेकून दिले त्याचे ज्ञान या दोहोत काहीच साम्य धरता येणार नाही. पारसिकांचे मोठया डामडौलाचे अफाट सैन्य आणि शिकंदराचे थोडकेच पण कसलेले सैन्य या दोहोचा सामना झाला असता जो परिणाम झाला तोच वरील दोन पंडितांचे वाग्युद्ध झाले असता व्हावयाचा. पण इतकेच नव्हे, असे 'भराभर केलेले पाठांतर' सर्वथा 'व्यर्थ' होय इतकेच नव्हे, तर ते अत्यंत अनर्थकारकही होय. वरच्या सैन्याचाच दृष्टान्त घेऊन पाहा. त्यात कोणाचा जोडा कोणाच्या पायात नसल्यामुळे व जो तो आपल्याच थाटात असल्यामुळे ऐन गर्दीच्या वेळेस सगळा घोटाळाच घोटाळा होऊन सैन्याची संख्याच त्याच्या नाशास जशी कारण होते, त्याप्रमाणेच वरील ग्रंथसंख्या वाचणारास उपयोगी पडत तर नाहीच, पण उलटी गर्वोत्पत्तीस मात्र कारण होऊन त्यास प्रसंगी गोत्यात आणण्यास मात्र खाशी उपयोगी पडते ! अथवा सर्वांच्या अतिशय परिचयातला जो व्यापार भोजन त्याचा दाखला घ्या. अन्न जसे शरीरास तसे वाचन श्रवण वगैरे जी ज्ञानाची साधने ती मनास होत. एकाने जसे शरीराचे पोषण होते तसेच दुसऱ्याने मनाचे होते. या दोन्ही व्यापारांत पुष्कळ प्रकारचे मोठे चमत्कारिक साम्य आहे. ते असे—जेवण जसे

सावकाश, नेमस्तपणाचे व नियमाने असेच केले असता अंगी लागून शरीरास हितावह होते, त्याप्रमाणेच वाचावयाचे ग्रंथ जर पूर्ण लक्ष देऊन मननपूर्वक असे बेताबेताने वाचले तरच त्यापासून ज्ञानाचा लाभ होऊन निरनिराळ्या मानसिक शक्ती वृद्धिंगत होत जातील. नाहीतर जसा अधाशी मनुष्य अन्नाशी गाठ पडली असता आकंठ तृप्ती करून घेऊन पुढे मग आमांशाच्या योगाने होणारी पीडा भोगीत बसतो त्याप्रमाणेच वाचणाराचीही स्थिती होते. म्हणजे सगळेच अर्धेमुर्धे माहीत, पक्के निश्चित असे काहीच नाही, असे असल्यामुळे भलभलत्या कल्पना व विलक्षण वेडगळ मते त्याच्या मनात शिरून ती अभिमानास्तव त्यास कधीही टाकावीशी वाटत नाहीत. तेव्हाच अन्नाचा परिपाक होऊन ते रक्तरूपाने शरीरास मिळाले म्हणजे जसे त्याचे सार्थक झाले त्याप्रमाणेच आपण जे वाचले त्याचे पुरतेक्षणी विवेचन करून त्यातले ग्राह्य कोणते, त्याज्य कोणते, वगैरेंची नीट व्यवस्था झाली म्हणजे तो मजकूर ज्ञानरूपाने आपल्या मनाशी मिळून तो आपला झाला असे समजावे. या ठिकाणी मांसाहाराचा दृष्टान्त फार समर्पक होय. पशुपक्ष्यादिकांचे मांस खाल्ले म्हणजे ते जसे तत्क्षणीच शरीराच्या मांसाशी मिळत नाही, तर जठराग्नीने त्याचे पुन: पृथक्करण होऊन व तेथील सर्व व्यापार त्यावर क्रमाक्रमाने होऊन शेवटी जेव्हा त्याचे रक्त बनते व रक्ताचे मांस होते, तेव्हाच ते जसे खाणाराच्या मांसाशी मिळते, तशीच गोष्ट ग्रंथवाचनाची होय. शेकडो जाडे मोठमोठाले ग्रंथ जरी घोकून टाकले, तरी जोपर्यंत त्यांचे विवेचन करण्यास वाचणाराने आपल्या विचारशक्तीचा उपयोग केला नाही, तोपर्यंत तितकी विद्या त्या जाडया पुस्तकातल्या पुस्तकातच राहिली. त्याचा लवलेशही याच्या मनात शिरला नाही. इसापनीतीतील उंटाप्रमाणे त्याच्या पाठीवर मात्र अन्नसामुग्री पुष्कळ झाली, पण पोटात

काही नाही ! त्या खाशा ओझ्याने यास वाहण्याचे मात्र श्रम होतील, व मूर्खत्वास्तव त्याच्या भाराचा यास मोठा गर्वही वाटेल; पण उपयोग म्हटला तर जो कोणी शहाणा त्यातील अन्न काढून करून घेईल त्यासच !

असो; वरील अर्ध्याकच्च्या विद्वत्तेचे अनर्थ फार प्राचीन काळापासून सर्व देशात पंडितांनी पाहून ठेवले आहेत. ते सर्व भाषांतील म्हणीत व सुभाषितांत बहुधा सापडतील. त्यांपैकी आम्हास अवगत असलेल्या तीन भाषांतले तीन चुटके येथे लिहून हा लेख पुरा करतो.

आपल्या मराठीतील म्हण आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच--

'उथळ पाण्याला खळखळाट फार'

पोप कवीने आपल्या एका लहानशा काव्यात (Essay on Criticism) म्हटले आहे--

A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the Pierain spring,
There Shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again.

'चुटपुटती विद्या ही फार भयंकर आहे. विद्यारूप झऱ्याशी तोंड लावून एक येथेच्छ प्राशन तरी कर, नाहीतर एक बिंदूही घेऊ नको. कारण त्याचा असा विचित्र गुण आहे की, थोडेच घोट घेतले असता त्याने माथे फिरून जाते; पण ते पुष्कळ जसजसे घ्यावे तसतसा मद उतरत जातो.'

भर्तृहरि 'नीतिशतका'च्या आरंभी म्हणतो--

अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।
ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि च तं नरं न रंजयति ।।

जो केवळ अज्ञान आहे त्याची लवकर समजूत करून देता येते; किंवा जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहीपेक्षा लवकर करता येते. पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार ज्यास घडला आहे अशास नमस्कार असो ! साक्षात ब्रह्मदेवाच्यानेही त्याचे समाधान करवणार नाही.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36550 दि: निबंध
क्रमांक 2590 नों दि: ५५५६४.

# स्वामी विवेकानंद

* * *

बाळ गंगाधर टिळक

श्रीमत स्वामी विवेकानंद हें कलकत्त्यास आपल्या बेलूर मठात समाधिस्थ झाल्याची बातमी ऐकून हिंदुधर्माविषयी कळकळ बाळगणाऱ्या हजारो हिंदूंस वाईट वाटल्यावाचून राहणार नाही. श्रीमत स्वामी विवेकानंद यांचे नाव ज्यास माहीत नाही, असा हिंदू क्वचितच सापडेल. एकोणिसावे शतक म्हणजे आधिभौतिक शास्त्रांच्या उत्कर्षाचे उच्च स्थान मानले आहे. अशा प्रकारच्या शतकाच्या उत्तरार्धात हजारो वर्षांपूर्वी हिंदुस्थानात प्रचलित असलेले आध्यात्मिक शास्त्र पश्चिमेकडील राष्ट्रांतील विद्वानांस समजून सांगून त्यांच्याकडून सदर शास्त्राच्या अपूर्वतेबद्दल मान्यता मिळविणे आणि ज्या राष्ट्रात अशा प्रकारचे शास्त्र निर्माण झाले, त्यातील लोकांबद्दल सहानुभूती उत्पन्न करणे, हे काही लहानसहान काम नव्हे. पाश्चिमात्य आधिभौतिक शास्त्राचा ओघ इंग्रजी विद्येबरोबर इतक्या काही झपाटयाने येत होता की, तो परतून लावण्यास असामान्य धैर्याचा व बुद्धीचा पुरुष उत्पन्न होणे जरूर होते. थिऑसॉफिकल सोसायटीने हे काम स्वामी विवेकानंदांच्या पूर्वी सुरू केले होते, पण त्यांच्या उद्योगास अस्सल हिंदुत्वाचे स्वरूप स्वामी विवेकानंद यांनीच प्रथम आणले, ही गोष्ट निर्विवाद आहे.

अलीकडे आमच्या देशातील शाळांतून जे शिक्षण मिळते ते निव्वळ तार्किक असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात धर्मविचारांची जागृती न

होता, उलट स्वधर्माचीच नव्हे तर धर्ममात्राचीही टवाळी करण्यास ते प्रवृत्त होतात. स्वामी विवेकानंद यांची लहानपणची वृत्ती अशाच प्रकारची होती. हे मूळचे बंगालचे राहणारे असून हल्ली यांचे वय सुमारे पसतीस–चाळीस वर्षांचे असावे. म्हणजे त्यास जे शिक्षण मिळाले ते सुमारे वीस वर्षांच्या पूर्वीचे होते व एवढयावरून ते कसे होते, याची वाचकांस सहज कल्पना करता येईल. कारण कलकत्याच्या इंग्रजी शाळा आणि मुंबई–पुण्याच्या इंग्रजी शाळा बहुतेक सारख्याच प्रकारच्या आहेत, असे म्हटले तरी चालेल. स्वामीचे पूर्वाश्रमीचे नाव नरेंद्र सेन असून हे जातीने क्षत्रिय होते व अशी गोष्ट सांगतात की, लहानपणीच एका जोश्याने यांची पत्रिका पाहून ‘मुलगा कधीही गृहस्थाश्रम घेणार नाही’ असे त्यांच्या आईस कळविले होते. असो. आपल्या वयाच्या १८–१९ व्या वर्षी कलकत्ता युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा पास झाले व तेव्हापासूनच त्यास तत्त्वज्ञानाचा नाद लागला. पहिल्या–पहिल्याने यांची प्रवृत्ती नास्तिक मताकडे असे व पुष्कळ धर्मगुरूंशी वादविवाद करताना “तुम्ही आपला देव तरी प्रत्यक्ष पाहिला आहे काय?” असा प्रश्न विचारून हे त्यास कुंठित करीत असत. पण श्रीमत स्वामी रामकृष्ण परमहंस यांची गाठ पडल्यादिवसापासून त्यांच्या बुद्धीत फरक झाला आणि ते सदर स्वामींचे अखेर पट्टशिष्य होऊन संन्यासी बनले.

श्रीमत रामकृष्ण परमहंस यांचे चरित्र सुप्रसिद्ध असून इंग्रजीत प्रो. मॅक्सम्यूलर यांनी ते लिहून काढले आहे. श्रीमत रामकृष्ण हे १८८६ साली समाधिस्थ झाले. तेव्हा त्यांच्या पश्चात त्यांच्या अद्वैत मताचा प्रसार करण्याचे काम त्यांच्या शिष्यशाखेने पत्करले व त्यात विवेकानंद सामील होऊन त्यांनी अमेरिकेतील लोकांसही अद्वैत सिद्धांताची ओळख करून दिली. स्वामी विवेकानंद यांनी प्रथमतः काही वर्षे कोणास न

कळत म्हणजे आपले स्वरूप प्रकट न करता हिमालय पर्वतात सिद्ध लोकांस भेटण्यात व हिंदुस्थानातून प्रवास करण्यात घालविली. या अज्ञात प्रवासातच ते पुणे मुक्कामी सन १८९१–९२ साली आले होते व येथून महाबळेश्वरास जाऊन तेथून पुढे बेळगाव-धारवाडहून मद्रास-रामेश्वराकडे गेले. यास अमेरिकेस पाठविण्याची कल्पना प्रथमतः मद्रासेत निघून तेथील लोकांनी त्यास साहाय्य केले व सन १८९३ साली शिकागो प्रदर्शनाच्या वेळी तेथे जी मोठी राष्ट्रीय धर्मपरिषद झाली, त्यात हिंदुधर्माच्या अद्वैत ज्ञानाची पताका अग्रस्थानी नेऊन लावण्याचे सर्व श्रेय स्वामी विवेकानंद याजकडे आहे. धर्मपरिषद संपल्यानंतर अमेरिकेत एकदोन वर्षे राहून तेथे त्यांनी अद्वैत मताचा प्रसार केला व त्याचे मठ स्थापन करून तेथे शिष्यसंप्रदायही सुरू केला. अमेरिका खंड म्हणजे आज सर्व शास्त्रांचे माहेरघर होय. अशा देशात ख्रिस्ती धर्मगुरूंच्या समक्ष अद्वैत सिद्धांताचे प्रतिपादन करून अद्वैत मत प्रचलित करणे हे काम सामान्य पुरुषाच्या हातून निभावणे शक्य नाही.

स्वामी विवेकानंद यांचे असे मत असे की, हिंदुस्थानातील हिंदू लोकांस हिंदुत्व किंवा हिंदुधर्म हेच काय ते सामान्य बंधन आहे व या धर्मातील तत्त्वे इतकी श्रेष्ठ आहेत की, हिंदुस्थानातच काय पण दुसऱ्या कोणत्याही धर्माच्या लोकात किंवा देशात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीसही त्याचा प्रसार करणे शक्य आहे. इतकेच नव्हे, तर असा प्रसार करणे हे हिंदू लोकांचे कर्तव्य होय. हिंदू लोकांजवळ जर आता काही अमोल वस्तू राहिली असली तर ती त्यांचा धर्म होय. तो जर ते सोडतील, तर ते आपणास जगाच्या निंदेस व उपहास्यतेस पात्र करून घेतील. हिंदुधर्म काय आहे तो पुरा ओळखा, त्याची तत्त्वे काय आहेत याचा अभ्यास करा, ती शास्त्राच्या कसोटीस लावा आणि सर्व जगभर त्यांचा प्रसार करून आपले व आपल्या देशाचे नाव चिरस्मरणीय करा,

१३८८६

असे उद्गार त्यांच्या मुखातून अनेक वेळा निघाले आहेत. भक्ती हे धर्माचे मुख्य लक्षण खरे, पण अद्वैत ज्ञानाची त्यास जोड असल्याखेरीज धर्माचे स्वरूप लंगडे पडते असे त्यांचे म्हणणे होते. परमार्थाविषयी ते जेव्हा बोलत, तेव्हा याच तत्त्वावर कटाक्ष ठेवून बोलत असत. ख्रिस्ती लोकांस तुम्ही ख्रिस्ती धर्म सोडून द्या, असा त्यांनी कधीही उपदेश केला नाही. तुम्ही ख्रिस्तास भजा, परंतु तुमच्या धर्मात तत्त्वज्ञान नसल्यामुळे आमच्या हिंदुधर्मातील अद्वैत सिद्धांताची त्यास जोड देणे अवश्य आहे, किंबहुना तुमच्या धर्मगुरूंनीही तीच तत्त्वे स्पष्टपणे नाही तरी अस्पष्टपणे लक्षात ठेवून आपल्या धर्माची रचना केली आहे, असे ते सांगत असत. सारांश, ज्ञानयोग, कर्मयोग किंवा राजयोग हे खऱ्या धर्माचे सार्वत्रिक मार्ग असल्यामुळे कोणत्याही धर्माशी त्यांचा विरोध नाही. इतकेच नव्हे तर सर्वांनी ते घेण्यासारखे असून हे ज्ञान पिढीजात ज्यास प्राप्त झाले आहे त्यांनी याचा प्रसार करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, असा ते उपदेश करीत असत. हिंदुस्थानातील लोकांची धर्माबद्दल हयगय पाहून त्यांचे अंतःकरण तीळतीळ तुटत असे व धर्माची उन्नती झाल्याखेरीज राष्ट्र वर यावयाचे नाही, असा त्यांच्या मनाचा ग्रह झालेला होता व त्याकरिता त्यांची जिवापाड मेहनत चालू असे. अमेरिकेत शिष्यपरंपरा स्थापून अद्वैत मताचा प्रसार करून ते इकडे आल्यावर प्रथमतः सिलोनमधून मद्रासेत आले व तेथून कलकत्त्यात व हिमालयात त्यांचा अल्मोरा येथे मठ आहे तेथे गेले.

या सफरीत त्यांचा सर्वत्र जयजयकार होऊन त्यांनी दिलेली व्याख्यानेही कळकळीची आहेत. बेलूर मठ स्थापन करून तेथे आपल्या मताप्रमाणे धर्मोपदेशक तयार करण्याची सोय केली आहे, व मठास

जोडून रामकृष्ण परमहंस यांचे समाधिमंदिर बांधले आहे. आलमोरा येथे 'प्रबुद्ध भारत' पत्र निघत असे, ते यांच्याच मित्रमंडळीकडून निघत असे. व ९६-९७ सालाच्या दुष्काळात राजपुतान्यात रामकृष्ण परमहंस मिशनची मंडळी जाऊन, ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या हातात बरीच अनाथ मंडळी पडण्याचे यांनी बंद केले. धर्मोपदेशकांचा जितका भरणा असावा तितका शिष्यसंप्रदाय वाढला नसल्यामुळे हिंदुस्थानात सर्व ठिकाणी आपले उपदेशक ठेवावेत अशी त्यांची जी इच्छा होती, ती सफल झाली नाही. तथापी कलकत्ता, अलमोरा, अजमीर, मद्रास, वगैरे ठिकाणी त्यांचे उपदेशक असत व अमेरिकेतही एकदोन शिष्य राहत असत. १९०० साली पॅरिस येथे जे प्रदर्शन झाले त्या वेळी सहा महिन्यात फ्रेंच भाषेचा अभ्यास करून स्वामी विवेकानंद यांनी वेदान्त विषयावर तेथे व्याख्यान दिले होते व त्याबद्दल त्यांची तिकडच्या पत्रांतून पुष्कळ प्रशंसा झाली होती.

हल्ली वर्षभर हे छातीच्या दुखण्याने अस्वस्थ होते; त्यामुळे जपानातून निमंत्रण आले असताही तिकडे जाण्यास त्यास फावले नाही. गेल्या शुक्रवारी नित्याप्रमाणे हे संध्याकाळी फिरून आले व अस्वस्थता वाटल्यावरून शिष्यास हाक मारून आपण आता हा लोक सोडून जाणार, असे सांगून त्रिवार दीर्घोच्छ्वास करून समाधिस्थ झाले; असे आम्हास आलेल्या तारेवरून समजते. भर तारुण्यात स्वामी समाधिस्थ होण्याची वेळ यावी, हे आमच्या देशाचे मोठेच दुर्दैव होय. श्रीरामकृष्ण परमहंस हे आमच्या इकडील अक्कलकोटच्या स्वामींप्रमाणे पुरे ब्रह्मनिष्ठ होते खरे; पण सर्व जगातील देशांत अद्वैत मताची पताका फडकत लावून हिंदुधर्माची अर्थात हिंदू लोकांची महती सर्व जगभर करून धर्मसंस्थापना करण्याचे काम श्रीमत विवेकानंदांनीच हाती घेतले होते व आपल्या विद्वत्तेने, वक्तृत्वाने, उत्साहाने व कळकळीने

त्या कामाचा पाया त्यांनी भक्कम घातला होता. या पायावर इमारत उभी होऊन तिच्यावरील कळस स्वामी विवेकानंद यांच्याच हस्ताने बनविण्यात येईल, अशी सर्वांस आशा व उमेद होती, पण ती स्वामी समाधिस्थ झाल्याने आता नाहीशी होण्याचा प्रसंग आला आहे. हिंदुधर्माचे उज्वल स्वरूप कोणते ? अशा प्रकारचा धर्म आमच्या देशात झाला हेच आमचे अमूल्य धन व बळ, आणि त्याचा सर्व जगभर प्रसार करणे हेच आमचे खरे कर्तव्य असे बोलणारे नव्हे, तर जगास सिद्ध करून दाखविणारे सत्पुरुष हजार–बाराशे वर्षांपूर्वी एक शंकराचार्य होऊन गेले व १९ व्या शतकाच्या अखेरीस दुसरे स्वामी विवेकानंद झाले. परंतु स्वामी विवेकानंदांचे काम अद्याप परिपूर्ण व्हावयाचे आहे व ते त्यांच्या शिष्यवर्गापैकी अगर दुसऱ्या कोणी हाती घेऊन परिपूर्ण करावे, अशी आमची त्यास विनंती आहे.

आमच्याजवळ जर काही महत्त्वाचा ठेवा असेल तर तो आमचा धर्मच होय. आमचे वैभव, आमचे स्वातंत्र्य सर्व काही लुप्त झाले आहे. परंतु आमचा धर्म अद्याप आमच्यापाशी शिल्लक आहे व तो असा तसा नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्रात उघड रीतीने कसोटीस लावला असताही त्याचा कस शुद्ध व उत्कृष्ट येतो, हे आता अनुभवास आलेले आहे. अशा स्थितीत जर आम्ही त्यास सोडून देऊ तर इसापनीतील कोंबडयाप्रमाणे आम्ही रत्नपारखी आहो अशी आमची सर्व जगभर नालस्ती होईल, हे लक्षात ठेवले पाहिजे. हल्लीचा काळच असा आहे की, आपल्याजवळ कोणतीही उत्तम वस्तू असली, तर जगाच्या चढाओढीच्या व्यापारात ती मांडून तिची योग्यता स्थापन केली पाहिजे. स्वामी विवेकानंद यांनी हे काम केले होते आणि आमच्या सुदैवाने आणखी काही दिवस ते वाचते तर राष्ट्राला राष्ट्रीयत्व येण्यास जे काही तेज लागते ते थोडेबहुत तरी त्यांच्यापासून आम्हांस प्राप्त

झाले असते. असो. त्यांच्या कर्माप्रमाणे त्यांस उत्तम गती प्राप्त होईल यात शंकाच नाही; पण त्यांनी आम्हावर जे उपकार करून ठेवले आहेत, त्याचे उतराई होण्यास त्यांनी घालून दिलेलाच धडा आम्हास गिरवला पाहिजे; हे उघड आहे. करिता यांच्या चरित्रावरून अशा तऱ्हेची उत्तरोत्तर लोकांची प्रवृत्ती होवो आणि सर्व धर्मांचे अद्वैतमतात एकीकरण करण्याचे श्रेय आमच्या ऋषींच्या अर्वाचीन वंशजास प्राप्त होवो; अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून स्वामी विवेकानंद यांचे स्वल्प चरित्र येथे समाप्त करतो.

अमेरिकेतून परत आल्यावर पुण्यास येण्याबद्दल स्वामींना दोन-तीन आमंत्रणे केली होती. पण एकदा स्वामी आजारी असल्यामुळे व दुसऱ्या वेळी काही अन्य कारणामुळे स्वामींची व्याख्याने प्रत्यक्ष ऐकण्याचा योग पुणेकरास आला नाही हे मोठे दुर्दैव होय !

* * *

# एक कल्पित गोष्ट

* * *

शिवराम महादेव परांजपे

बंगाल्यात 'गोल्डन बेंगाल' ची गुप्त मंडळी उघडकीस आली त्या वेळी हिंदुस्थानातील इंग्लिशांचे खरोखरच धाबे दणाणून गेले होते. हिंदुस्थानातील लोक आपल्या जुलमामुळे खरोखरच चिडले आहेत की काय, आपले हृद्गत उघड रीतीने बोलता येत नाही म्हणून त्यांनी खरोखरच अनेक ठिकाणी गुप्त मंडळ्या काढल्या आहेत की काय, आणि गुप्त रीतीने हत्यारे जमवून या सगळ्या गुप्त मंडळ्यांच्या मनातून इंग्लिशांना खरोखरच हिंदुस्थानातून हाकलून द्यावयाचे आहे की काय, अशा त्यांच्या मनात अनेक शंका उत्पन्न होऊ लागल्या होत्या आणि म्हणून कोण काय बोलतात, कोण काय करतात, हे जाणण्यासाठी गुप्त हेरांचे तपास विशेष जारीने सुरू करण्यात आले होते. हे गुप्त हेर दिवसा निरनिराळी सोंगे घेऊन लोकात मिसळत असत आणि रात्रीची लोकांची बोलणी आडून ऐकत असत. असा क्रम बंगाल्यात पुष्कळ दिवस चालू असता एके वेळी एका मोठ्या शहरात एक फारच चमत्कारिक गोष्ट घडून आली.

ज्याप्रमाणे भित्र्या मनुष्याला प्रत्येक काळोखामध्ये भुते दिसतात, त्याप्रमाणे संशयग्रस्त मनुष्याला पाहिजे त्या ठिकाणी शंकास्थाने भासू लागतात. तशी वर सांगितलेल्या गुप्त हेरांची स्थिती झालेली होती. हे गुप्त हेर एका शहरात रात्रीच्या प्रहरी कोण काय बोलते हे ऐकण्याकरिता फिरत असता बाजूला असलेल्या साधारणपणे एका पडक्या व

ओसाड घरात त्यांना काही संशय येण्यासारखे शब्द ऐकू आले. तेव्हा येथे काही तरी बंडाचा बेत चालला असला पाहिजे असा त्यांना संशय आला. म्हणून त्याची शहानिशा करण्याकरिता ते गुप्त हेर दुसऱ्या दिवशी रात्री त्याच वेळेच्या सुमारास त्या घराजवळ येऊन बसले. तेव्हाही आदल्या दिवसाप्रमाणेच 'स्वदेश', 'स्वराज्य', 'स्वतंत्रता', 'राज्यक्रांती' इत्यादी शब्द त्यांच्या कानावर आले. तेव्हा त्यांची पक्की खात्री झाली की 'सोनेरी बंगाल'च्या गुप्त मंडळीपैकीच एखादी शाखा येथे असली पाहिजे. गुप्त हेरांच्यासारखी स्वदेशद्रोहाची आणि नीचपणाची कामे जे पत्करतात ते स्वदेशस्थितीच्या अज्ञानामुळे आणि पोट भरण्याच्या अशक्ततेमुळेच पत्करतात. तेव्हा स्वाभाविकपणेच असल्या नीच धंद्यात आपण अधिक नीचपणा केला तर आपल्याला अधिक बक्षीस अगर बढती मिळेल असे त्यांना वाटत असते. त्याप्रमाणे ज्या गुप्त हेरांना या गुप्त शाखेचा सुगावा लागला, त्यांना आपल्याला अकरावाच गुरु आला आहे असे वाटू लागले. आता आपण हा गुप्त कट शोधून काढल्याची बातमी साहेबांना जाऊन सांगू, ते आपल्यावर खूष होणार, आपण हिंदुस्थानचे कोटयावधी रुपयांचे राज्य त्यांच्याकडे कायम राखले याबद्दल आपण त्यांच्याकडून दहापाच रुपयांची तरी बढती मांडून घेणार, असे मनोराज्य करीत ते आपल्या पुढल्या उद्योगाला गेले. इतकी मोठी शिकार हाती लागल्याची खात्री वाटू लागल्यानंतर मग अर्थातच मध्यंतरीची वेळ अतिशय सावकाश चालली आहे असे कोणाला वाटणार नाही? 'सोनेरी बंगाल'च्या शाखेच्या अस्तित्वाची बातमी साहेबापर्यंत जाऊन पोहोचली व त्याच दिवशी म्हणजे ता. २८ रोजी रात्री सदर ठिकाणी जाऊन सदर शाखेतील सर्व मंडळींना एकदम चारी वाटा बंद करून पकडण्याविषयी गुप्त हुकूम सुटले. ज्यांनी शाखा हुडकून काढली होती त्यांना तर सूर्य

इतका सावकाश का चालतो याबद्दल आश्चर्य वाटू लागले होते व ज्या वेळेला पोलिसांना एखादे काम त्वरित करावयाचे असेल त्या वेळी सूर्याला चालण्याला एखादी मोटारगाडी वर पाठवून देता येण्याची युक्ती निघणे शक्य आहे किंवा नाही याबद्दल ते विचार करू लागले. परंतु अखेरीस एकदाचा तो कंटाळवाणा सूर्य अस्तास गेला. सात वाजले. आठाचा ठोका पडला. आठाच्या ठोक्याबरोबर तीनशे पोलिसचे शिपाई, पंधरा माउंटेड स्वार, दहा-बारा ऑफिसर वगैरे सर्व लढाईची तयारी सिद्ध झाली. एक मशिनगनही बरोबर मागून आणिली होती असे म्हणतात व तयारीत असण्याबद्दल दोन फलटणींना हुकूम सुटल्याबद्दलची वदंता होती. वर सांगितलेले सर्व सैन्य बरोबर साडेआठ वाजता मार्च करून निघाले. ही बातमी आधी कोठेही फुटू नये म्हणून हे सैन्य रात्रीच्या काळोखातून दुरून आडवाटेने लपत छपत येऊन त्याने त्या पडक्या घराकडे जाणारे सर्व रस्ते रोखले. जिकडे तिकडे नाकेबंदी झाली आणि बाकीचे लष्कर कोठे वळचणीला, कोठे खळग्यात, कोठे झाडाच्या पाठीमागे, कोठे भिंतीच्या आड असे छपून राहिले व त्यातील मुख्य मुख्य लोक त्या घरात काय प्रकार चालतो हे पाहण्यासाठी जास्त जवळ गेले. आदल्या दिवशीच्या गुप्त हेरांनी जवळ उभे राहून ऐकण्याला कोणकोणत्या सोईवार जागा आहेत हे त्यांना दाखविले, व सर्वजण भिंतीला कान लावून आत काय काय बेत होतात हे लक्षपूर्वक ऐकत उभे राहिले. पहिल्या दोन-तीन दिवसांप्रमाणे याही दिवशी रात्रीचे सुमारे साडेनऊ वाजल्यानंतर घरात हालचाल सुरू झाली. पहिले दोन दिवशीचे गुप्त हेर बऱ्याच दुरून ऐकत असत, त्यामुळे मधले मधले मात्र काही शब्द ऐकू येत असत. परंतु त्या दिवशी जे अगदी भिंतीला कान लावून ऐकत होते त्यांना साहजिकपणे सर्व संगतवार भाषण ऐकायला मिळाले. भिंतीच्या आतून पुढे लिहिल्याप्रमाणे शब्द त्यांना ऐकू येऊ लागले :—

"माझ्या देशबंधूंनो, आपल्या देशाची काय अवस्था झाली आहे हे तुम्ही पाहतच आहा. ही अवस्था तुम्ही किती दिवस सहन करीत बसणार? गुलामगिरीसारखा नरक नाही आणि, स्वतंत्रतेसारखा स्वर्ग नाही. आणि या स्वर्गाला जाण्याला स्वदेशभक्तीसारखी दुसरी भक्ती कोणतीही कामी पडावयाची नाही. त्या स्वदेशभक्तीने तुमची सर्वांची अंत:करणे प्रज्वलित झालेली असल्याची स्पष्ट चिन्हे तुमच्या चेहऱ्यावर दिसत आहेत. मग आता उशीर कशाला पाहिजे? अजून गुलामगिरीचे दु:ख पुरेसे झाले नाही काय? बैल जोखडाखाली जुंपला तर तो देखील तेथून सुटण्याचा प्रयत्न करीत असतो. मग आपण तर मनुष्य आहो. आपल्यावर इतका भयंकर जुलूम होत आहे की तसा जगातील दुसऱ्या कोणत्याही लोकांवर होत नसेल. आपल्यातील श्रीमंत भिकारी झाले आणि आपल्यातील भिकारी किती तरी उपाशी मरून गेले. जिवंत माणसांपेक्षा मेलेल्या माणसांची संख्या जास्त होऊन गेली असेल. सर्व जग आपणाकडे पाहून आश्चर्य करते की, यांना अजून गुलामगिरीची खंती कशी वाटत नाही! जगाचे बहुतेक भाग स्वतंत्रतेमध्ये नांदत असता या गुलामगिरीच्या जाचणुकीमध्ये आपणच काय म्हणून कुजत पडावे? ही गुलामगिरीची बेडी तुटण्याला मोठी कठीण आहे असे नाही. आजपर्यंत किती तरी स्वातंत्र्यप्रिय महात्म्यांनी हिचे तुकडे तुकडे करून टाकलेले आहेत! त्या महात्म्यांच्या उच्च पदाला जाऊन पोहोचण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी या वेळी कंबर बांधली पाहिजे."

एक ऑफिसर आपल्या शेजारच्या ऑफिसराच्या कानाशी लागून खालच्या स्वरात म्हणतो "हा तर स्पष्ट राजद्रोह आहे. अजून तुमची वाट पाहण्याची इच्छा आहे?" "थोडे थांबा, आणखी काय काय होते ते पाहू, म्हणजे सहजच यांच्या गुप्त मंडळीची सगळी हकीगत

आपल्याला समजेल," असे म्हणून त्याला दुसऱ्या ऑफिसरने थांबवून धरले. इतक्यात फिरून आतून आणखी आवाज ऐकू येऊ लागला:—

" मित्रहो, आता वाट पाहत बसण्यात अर्थ नाही. सर्वांची मने तर बदलली आहेत. परंतु सुरुवात कोणी करावी आणि कशी करावी, या प्रश्नाच्या बुचकळ्यात सगळेजण पडले आहेत. अशा प्रसंगी कोणी तरी आरंभ हा केलाच पाहिजे. स्वतंत्रतेच्या बिकट किल्ल्यावर जाण्याला फक्त एकच वाट आहे. आणि ती लढाईची होय. ज्यांनी राज्यक्रान्तीने स्वतंत्रता मिळवून देशामध्ये स्वराज्य स्थापन केले ते याच वाटेने गेले. आपल्याला जर स्वतंत्रता पाहिजे असेल तर आपणही त्याच मार्गाचे अवलंबन केले पाहिजे. आता दुसऱ्याच्या जुलमाखाली असताना आपल्याला राजरोसपणे दारूगोळा आणि हत्यारे जमवून कधीही मोठी लढाई करता यावयाची नाही. याकरिता निरनिराळ्या ठिकाणी लहान लहान पण अनेक लढाया आपण निर्माण केल्या पाहिजेत. एखाद्या घराला जशी चोहोकडून आग लागते तशी स्थिती झाली पाहिजे. पण याला प्रारंभ कोण करणार ? तो आपणच का करू नये ? आपल्या शत्रूंचे अन्याय अतिशय झाले आहेत. लोक त्यांच्याबद्दल अतिशय नाराज झालेले आहेत. आणि त्यांची सद्दी निःसंशय सरलेली आहे. परमेश्वराची कृपा आजकाल आपल्याकडे फिरली आहे. आकाशातील ग्रह हल्ली आपल्या देशाला अनुकूल आहेत. आणि आपल्या स्वतंत्रतेचा वृक्ष फलोन्मुख होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मग अशा वेळी आपण का सुरवात करू नये ? आपल्यापाशी आता येथे एक हजार निवडक लोक तयार आहेत— "

"एक हजार निवडक लोक!" एक ऑफिसर म्हणाला. "आणि आपल्यापाशी तर येथे फक्त तीनशे-साडेतीनशेच माणसे आहेत. मग कसे होणार ?"

फिरून आतून शब्द येऊ लागले— "आणि या भुयारामध्ये आपल्याला तीन महिने पुरेल इतकी अन्नसामुग्री आणि दारूगोळा भरलेला आहे. एवढ्या सामुग्रीवर आपल्याला किती तरी गोष्टी करता येतील ? याच्यापेक्षा जास्त सामुग्री नको. एकदा लढाई सुरू झाली म्हणजे आज जे शत्रूच्या ताब्यात आहे ते सगळे आपलेच. प्रारंभाची तयारी असली आणि पुढे यश येत गेले म्हणजे कोठेही अडावयाचे नाही. याकरिता आपण आपला हा कट आता उघडकीस आणून आपल्या जन्मभूमीच्या पायातील साखळदंडाचे दुवे तोडण्याच्या उद्योगाला लागू या. दुःखाने, दारिद्र्याने आणि जुलमाने मरणाऱ्या लोकांना जमिनीमध्ये जागा नाहीशी झाली आहे. सूर्याला आपल्या देशातील गुलामगिरीच्या दुर्गंधीवर प्रकाशण्याची लाज वाटू लागली आहे आणि या गुलाम देशावरून वाहात जाणाऱ्या वाऱ्यालाही आपल्याकडे न येण्याविषयी स्वतंत्र देशांनी बंद केली आहे. अशा अपमानाच्या आणि गुलामगिरीच्या दुःखदायक स्थितीमध्ये राहण्यापेक्षा मरण आले तरी हरकत नाही. आपण मरू किंवा स्वतंत्र तरी होऊ ! चला ! बघता काय ? म्हणा स्वदेशासाठी आणि स्वतंत्रतेसाठी हर हर महादेव !"

इतक्यात प्रथम एक बारीक शिटी वाजली आणि नंतर लगेच बिगुल झाले. घोड्यांच्या टापा ऐकू येऊ लागल्या. बऱ्याच माणसांची चाहूल सुरू झाली. त्या घराचा दरवाजा एकदम उघडला, आणि—

"पकडा ! पकडा ! कोठे आहेत ते ?" असे म्हणत बरेच ऑफिसर आत घुसले व त्यांच्या मागून इतरही शिपाई लोक आत आले. "कोठे गेले ? इतक्यात इतके लोक कोठे गेले ? कोठे आहेत ते कटवाले ? त्यांना शोधून काढा. नाकेबंदी कायम ठेवा. कटातील एकही मनुष्य आपल्या या छाप्यातून सुटून जाता कामा नये." असा त्या घरात

जिकडे तिकडे एकच गलका उडून गेला. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की इतक्या हजार कटवाल्यांपैकी कोणीही या बहाद्दरांच्या हाती लागेना. ऑफिसर लोकांनी पहिल्याने दरवाजा उघडला त्या वेळी त्यांना तेथे फक्त एक मनुष्य आढळला. त्याला त्यांनी ताबडतोब कैद केले व त्याला आपल्या ऑफिसच्या मुख्य ठिकाणी ताबडतोब पाठवून देण्यात आले व कच्च्या तुरुंगाचे दरवाजे उघडे ठेवा, व जितक्या खोल्या मोकळ्या करता येतील तितक्या करा; कारण, हजार लोक राहिले पाहिजेत, असे निरोपही धाडण्यात आले. तसेच गुप्त कट पकडल्याच्या ताराही जिकडे तिकडे धाडण्यात आल्या. इकडे निरोपाप्रमाणे तुरुंगात ताबडतोब सगळी व्यवस्था झाली. एकेका खोलीत वीस वीस कोंडून सगळे राहावे अशा बेताने सुमारे पन्नास कोठड्या रातोरात खाली करण्यात आल्या आणि गेटवाले, वॉर्डर वगैरे सगळे लोक नवीन कटवाले हजार कैदी केव्हा येतात म्हणून तुरुंगाचे दरवाजे उघडे टाकून वाट पाहत बसले !

परंतु बराच वेळ झाला तरी पहिल्या एका कैद्याशिवाय दुसरे कोणीच येईनात. पकडण्याकरता जे ऑफिसर गेले होते त्यांच्याकडून आपल्या कामात काही कसूर होत होती असे म्हणावे तर तसेही नाही. ते आपल्याकडून त्या घरात अगदी शिकस्त करीत होते, त्यांनी कटवाल्यांकरता त्या घराचे कोने-कोपरे, माळे, फडताळे, पेटया आणि कोनाडेसुद्धा शोधले; पण त्यांचा कोठेच पत्ता लागेना. भिंतीत दडून बसले असतील म्हणून अखेरीस त्यांनी त्या घराच्या भिंतीही पाडल्या. तरी पण भिंतीतही ते कटवाले नव्हते ! तेव्हा ते आपल्या हातावर तुरी देऊन कोठे तरी निघून गेले असे समजून ते सर्व अधिकारी निराश झाले. तरी पण निदान त्या कटवाल्यांनी जमविलेला दारूगोळा आणि हत्यारे तरी जप्त करून न्यावीत असा निश्चय करून अखेरीस तिकडे

त्यांनी आपले लक्ष वळवले. पण ते सामान तरी कोठे आहे ? तेही त्यांना कोठे दिसेना. तेव्हा तेथे अशिक्षित आणि मूर्ख शिपाई होते. त्यांना वाटू लागले की, ही काहीतरी भूतचेष्टा असली पाहिजे व या कल्पनेने ते त्या घरात उभे राहण्यालाही भिऊ लागले. परंतु त्या ऑफिसर लोकात एक बऱ्याच फितीच्या तुकडयांचा ऑफिसर होता व त्याची धूर्तपणा-बद्दल फार प्रख्याती होती. त्याने असा तर्क काढला की, या घराच्या जमिनीच्या खाली अतिशय मोठे तळघर असले पाहिजे आणि त्यात हे सगळे लोक दडून बसले असले पाहिजेत आणि त्याच तळघरात दारूगोळा व हत्यारे ठेवण्याचीही योजना केलेली असली पाहिजे. ही कल्पना निघताक्षणीच जे ते तळघराचे तोंड शोधू लागले; पण तेही कोठे सापडेना. तेव्हा ज्यांची ही कल्पना होती त्यांनी असा हुकूम केला की, तळघर लागेपर्यंत ही जमीन खोदा. त्याप्रमाणे खोदण्याचे काम सुरू झाले. एक हात, दोन हात, चार हात, आठ हात, पंधरा हात खोल सगळे घर खणून झाले. पाणीसुद्धा लागले; पण भुयार लागले नाही. तेव्हा ही खास भूतचेष्टा आहे असे सगळ्यांनाच वाटू लागले. जे ऑफिसर धूर्तपणासाठी प्रख्यात होते त्यांनी आणखीही डोके खाजवून पाहिले; पण अक्कल काहीही काम करीना. शेवटी त्यांनी असे उद्गार काढले की, हे गुप्त कट करणारे लोक मोठे वस्ताद असतात. आपल्या चातुर्याने आपण त्यांची गुप्त कारस्थाने हुडकून काढू असे म्हटले तरी ती आपल्याला कधीही काढता यावयाची नाहीत. त्यांनी आपण होऊन ती सांगण्याची मेहेरबानी केली तर मग हुडकून काढण्यात आपले चातुर्य ! सबब जो एक कैदी आपण पकडून पाठवला आहे त्यालाच हे सगळे काय कोडे आहे ते आपण विचारले पाहिजे. ही कल्पना सर्वांना पसंत पडून ते सगळे सैन्य तो कैदी ठेविला होता तेथे आले व त्यातील काही थोडेसे प्रमुख लोक त्याच्याजवळ

गेले, तो तो कैदी संतापाने अगदी लाल होऊन गेलेला होता व त्या अधिकाऱ्यांना पाहिल्याबरोबर त्याने त्यांना शिव्यांची लाखोली मोजण्यास सुरवात केली. तो म्हणाला, " तुम्ही मांडले तरी आहे काय ? लोकांवर तुम्ही इतका जुलूम करता तो काय म्हणून ? आम्ही आमच्या घरात देखील आम्हाला वाटेल ते करू नये की काय ? "

" अरे गाढवा ! " एक ऑफिसर त्याला एक ठोसा लगावून मोठ्याने ओरडला. " गुप्त कट आणि बंडे करतोस नाही ? हा तुझा धंदा आहे की काय ? थांब तुला दाखवतो कसे काय आहे ते ! "

" पण ते तुझे एक हजार साथीदार कोठे आहेत ! " दुसऱ्या एका ऑफिसरने मध्येच विचारले. " आणि तो तुझा तीन महिने पुरणारा दारूगोळा तू कोठे ठेविला आहेस ? आम्ही तुझ्या घराच्या सगळ्या भिंती पडून पाहिल्या आणि जमिनी खणून पाहिल्या; पण त्याचा कोठे पत्ता लागत नाही. "

" काय ? " तो कैदी रागाने चवताळून म्हणाला, " तुम्ही माझ्या घराच्या भिंती पाडिल्या आणि जमिनी खणल्या त्या काय म्हणून ? थांबा, हे सगळे नुकसान तुम्हाला भरून द्यावे लागेल, आणि विनाकारण कैद करून माझी अब्रू घेतल्याबद्दलची तुम्हाला नुकसानी भरून द्यावयाला लावीन तरच मी खरा होईन. "

" तुला विनाकारण कैद केले ? तू लोक जमवून लढाईला उत्तेजन देत होतास आणि तरी— "

" केव्हा ? कोण ? मी साथीदार जमवून लढाईला उत्तेजन देत होतो ? "

" चूप बैस ! मुकाट्याने कबूल होतोस किंवा तुला चौदावे रत्न पाहिजे आहे ? तूं आपल्या कटातील साथीदारांना बंड करण्याविषयी उत्तेजन देत असताना आम्ही सगळ्यांनी प्रत्यक्ष ऐकले आहे. "

"केव्हा ? कोठे ?"

"आता, तुझ्या भिंतीच्या आड उभे राहून आम्ही सगळे ऐकत होतो."

हे शब्द ऐकून त्याला अतिशय हसू लोटले, ते काही केल्या आवरेना. ऑफिसर लोकांना वाटू लागले की, हा हसून आपली थट्टाच करीत आहे. आणि त्यामुळे ते जास्तच चिडले आणि "आता तरी कबूल होतोस का नाही ?" असे म्हणून त्याला छळू लागले. तेव्हा एकदाची हसण्याची उकळी कशीबशी थांबवून तो म्हणाला, "मूर्खांनो, कबूल काय होऊ आणि सांगू काय ? मी एक विद्यार्थी आहे. आम्ही काही विद्यार्थ्यांनी मिळून येत्या सुट्टीत अनेक पाश्चिमात्य वीररसप्रधान नाटकांच्या आधाराने एक खेळ करण्याचे योजिले आहे आणि माझे घर हल्ली रिकामे असल्यामुळे आम्ही तेथेच कधी कधी तालमी करीत असतो. त्यातील एका पात्राचे काम माझ्याकडे आहे. त्या पात्राचे भाषण मी अलीकडे पाठ करीत असतो. आता मला ते बहुतेक पाठ झाले आहे. ते मी आपल्याशी म्हणून पाहत असताना बहुतकरून तुम्ही ऐकले असावे. वाहवा रे गुप्त कट पकडणारे ! मोठे बहादर आहा बुवा !" हे त्या बिचाऱ्याचे उत्तर त्या संशयग्रस्तांपैकी कोणालाही खरे वाटले नाही व आपला गुप्त कट आणि आपले साथीदार यांना छपविण्यासाठी याने ही काही तरी शक्कल काढली आहे असे त्यांना वाटले व अशी लबाडी लढविणारा हा मोठा बिलंदर असला पाहिजे असे वाटून ते त्याला कटाविषयी खोदून खोदून विचारू लागले. तेव्हा फिरून एकदा हसण्याची उकळी आवरून तो म्हणाला, "तुमची खात्री करण्याला माझ्या खिशामध्ये दुसरेही एक साधन आहे. परंतु तुमची आता चांगलीच फजिती उडविली पाहिजे. तेव्हा तुम्ही मला आता मॅजिस्ट्रेटकडे घेऊन चला म्हणजे तेथे भर कोर्टात

हजारो लोकांसमक्ष तुमची चांगली फट्फजिती करण्याला ठीक सापडेल. असे म्हणून त्याने आपल्या खिशाचे तोंड घट्ट दाबून घेतले. तुझ्यापाशी काय पुरावा आहे तो आम्हाला पाहू दे, असे म्हणून ते त्याच्याशी हिसकाहिसकी करू लागले. पण तो आपला खिशावरील हात सोडीना. तेव्हा एकाने आपल्या खिशातील हळूच कात्री घेऊन त्याचा खिसा कातरला. त्यात एक कागद सापडला. या कागदावर बहुतकरून कटवाल्या लोकांच्या सह्या असाव्या आणि तसे असेल तर आपले मोठेच काम झाले असे म्हणून अतिशय उत्सुकतेने सगळेजण तो कागद उलगडून पाहू लागले. कागद उघडला आणि सर्वजण तो वाचू लागले तेव्हा, त्यांच्या चेहऱ्यांची जी काही अवस्था झाली तिचे यथार्थ निदर्शन करून देण्याला फोटोग्राफच पाहिजे होता. "माझ्या देशबंधूंनो, आपल्या देशाची काय अवस्था झाली आहे—" इत्यादी शब्द त्याने उच्चारले होते ते तसेच्या तसेच त्या कागदावर लिहिलेले होते. ते पाहिल्याबरोबर त्यांच्या हातातील कागद गळला. कंबरेला लटकणाऱ्या तरवारीच्या खणखणाटात ते मट्कन खाली बसले, आणि खजिल होऊन त्यांनी आपल्या माना खाली वाकविल्या. काही वेळ सर्व स्तब्ध राहिले. फक्त तो एकटा कैदी मात्र खदखदा हसत होता. काही वेळाने ती सर्व मंडळी उठली व "या मूर्खाला सोडून द्या" असे त्यांनी सांगितले. हे ऐकून तो म्हणाला, "मी या तुरुंगातून बिलकुल बाहेर जाणार नाही. मी येथेच बसणार. मी असा बाहेर जातो की काय?"

इतक्यात त्याला गाडी आणून घरी पोहचविण्याविषयी हुकूम झाला. त्यावर तो म्हणाला, "मला गाडी बसायला दिलीत, तरी देखील मी घरी जाणार नाही. माझे घर तुम्ही ठेविले आहे कोठे? माझ्या घराची आणि अब्रूची नुकसानी भरून घेतल्यावाचून आणि तुमच्या या कृत्याबद्दल चार लोकात तुमची फट्फजिती केल्यावाचून मी मुकाट्याने या

तुरुंगातून कधीही बाहेर जाणार नाही." एखाद्याला निरर्थक तुरुंगात घालण्याला देखील जितके कधी श्रम पडले नसतील, तिकडे याला तुरुंगातून बाहेर घालविण्याला त्या वेळी पडले ! त्याच्या हाती पायी पडून व त्याच्या झालेल्या नुकसानीची गुप्तपणाने भरपाई करून देण्याची व्यवस्था करून त्याला मोठ्या मिनतवारीने गाडीत घालून बाहेर पोहोचते करण्यात आले, आणि नंतर साऱ्या रात्रभर थकले भागलेले ते सर्व इसम आपआपल्या घरी गेले.

पण अजून एक काम राहिले होते. सगळ्या मोठमोठ्या वर्तमानपत्रांकडे एक गुप्त कट पकडल्याबद्दल तारा पाठविण्यात आलेल्या होत्या आणि छापखान्यातून त्या तारांचे टाईप जुळले जात होते. थोडा वेळ जाता तर त्या वेडगळपणाच्या तारा सगळ्या जगभर प्रसिद्ध झाल्या असल्या व मग 'गोल्डन बंगालच्या' गुप्तकटाप्रमाणे अगर नाशिकच्या वंदे मातरम्-मधील छाप्याप्रमाणे आणखी एक अनिष्ट प्रसंग आला असता. याकरिता पहिल्या तारा चुकीच्या आहेत, त्या मेहेरबानी करून छापू नयेत अशा उलट तारा ताबडतोब स्वारांच्या हाती देऊन रवाना करण्यात आल्या.

ही सगळी निरवानीरव होऊन जिकडे तिकडे स्वस्थता होईपर्यंत चांगले फटफटीत उजाडले. नित्यक्रमाप्रमाणे गस्त घालणारे शिपाई आपआपल्या अंमलदारापुढे सकाळी हजर झाले आणि शहरात चोरांनी कोठे कोणतेही घरबीर काही फोडले नाही अशी सगळी आलबेल देऊन वाकड्या तळहाताने सलाम करून चालते झाले !

* * *

# वर्तमानपत्रकर्ता

* * *

## श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

पंधरा वर्षांपूर्वी मी आपल्या गावी एक मिठाईचे दुकान काढिले. ते काढण्याचा उद्देश केवळ स्वार्थसाधूपणाचा नसून तरुण पिढीचे लक्ष व्यापारधंद्याकडे वळवावे हा होता. त्याप्रमाणे राष्ट्र अनेक व्यक्तींचे बनले असून राष्ट्रहित साधण्याकरिता प्रत्येक व्यक्तीने स्वहितार्थ झटले पाहिजे हे तत्त्व माझ्या मनावर पक्केपणी बिंबले असल्यामुळे या धंद्यात होईल तितका पैसा मिळवून स्वहित साधावे व या रीतीने, पर्यायाने का होईना, स्वदेशहित साधावे हाही माझा एक हेतू होता. दुकान थाटल्यावर काही दिवसपर्यंत फारशी गिऱ्हाइके मिळेनात. पण हळूहळू माझ्या दुकानाची विक्री वाढत चालली. ती शेवटी इतकी वाढली की, पुडे बांधण्यास रद्दी कागद मिळण्याची मारामार पडू लागली. ही जी कागदांची टंचाई पडू लागली तिच्यामुळे वर्तमानपत्र काढण्याचा विचार प्रथमतः माझ्या मनात आला, व तेव्हापासून तो माझ्या मनात सारखा घोळू लागला. शेवटी वर्तमानपत्रात मला फारशी प्राप्ती जरी झाली नाही तरी त्यात मला माझ्या मिठाईच्या दुकानाची जाहिरात देता येईल, वर्तमानपत्राचे अंक पुडे बांधण्यास उपयोगी पडतील, व अशा प्रकारे एका कामात दोन कामे साधतील, असा मी विचार केला, व तो अमलातही आणिला.

एकंदर धंद्यांचा सूक्ष्मपणे विचार केल्यास आपणास त्यांपैकी बरेच जोडधंदे आढळून येतील. येथे जोडधंदा याचा अर्थ जोडयांचा किंवा चांभाराचा धंदा असा न घेता धंद्यांची जोडी असा घ्यावयाचा. या जोडीपैकी प्रत्येकाचे काही साहित्य दुसऱ्याच्या उपयोगी पडत असल्यामुळे दोन्ही धंदे एकाने करणे सोयीस्कर असते. हा अर्थ पूर्णपणे मनात उतरविण्याकरिता येथे काही उदाहरणे देतो. ग्रंथकर्त्याचा व पुस्तकविक्रीचा हे जोडधंदे होत. ग्रंथकर्त्यास नवीन पुस्तके लिहिण्यापूर्वी किताबखान्यातील पुस्तके वाचता येतात व किताबखान्यासही ग्रंथकर्त्याच्या पुस्तकांनी शोभा येते. नाटककर्ता व नाटकमंडळीचा मालक यांची जोडीही याच प्रकारची आहे. हाच प्रकार खाणावळ व दवाखाना यांचा. खाणावळीत जेवले म्हणजे दवाखान्यास रोग्यांचा पुरवठा होतो व दवाखान्यात उपचार करून घेण्याकरिता बाहेरगावाहून आलेले रोगी खाणावळीस गिऱ्हाईके मिळतात. रोगी बरा झाल्यावर खाणावळीत जेवून परत आपल्या गावी जाण्याकरिता निघणार तो त्यास हगवणीने किंवा आमांशाने गाठले म्हणून समजावे; व अशा रीतीने एकदा खाणावळीच्या किंवा दवाखान्याच्या कक्षेत एखादे मनुष्य आले की ते दोहोंचे कायमचे गिऱ्हाईक होऊन बसते. वकिलाचा व दरवडेखोराचा हे धंदेही याच मालिकेत येतात. वकिलाने दिवसा वकिली चालवावी व रात्री दरवडे घालावे. असे केल्याने अहोरात्रीपैकी प्रत्येक क्षणाचा त्याला ईश्वरापाशी हिशेब देता येईल. दरवडयाबद्दल दुसऱ्या कोणास पकडले तर वकिलास दरवडा पचून ते काम चालविण्यासाठी फीही मिळते. बरे तो स्वतःच पकडला गेला तर निराळा वकील करावयास नको; व कुळात भर पडते ती निराळीच ! या ठिकाणी दरवडेखोराचा हलकट धंदा प्रतिष्ठित धंद्यात सामील झालेला पाहून कित्येक लोकांस राग येईल खरा; पण

वरील नियम व्यापक करण्याकरिता मला निढळाच्या घामाने व मनगटाच्या जोरावर चालविलेल्या सर्व धंद्यांचा विचार करावा लागला; व दरवडयाच्या धंद्याइतका निढळाच्या घामाने व मनगटाच्या जोरावर चाललेला असा दुसरा कोणताही धंदा आढळणार नाही. असो. तर अशांपैकी वर्तमानपत्रकर्ता व मिठाईवाला ही दुक्कल आहे. वर्तमानपत्रात मजकूर कमी पडला म्हणजे तेथे मिठाईच्या दुकानाची जाहिरात द्यावी व पुडे बांधण्याचे कागद संपले म्हणजे वर्तमानपत्राचे अंक उपयोगात आणावे. अशा रीतीने मिठाईच्या गिऱ्हाईकास नकळत त्याच्या हाती नीतिपर लेख पडल्याने देशहित किती होण्यासारखे आहे, व वर्तमानपत्रातील लेखांचे माधुर्य मिठाईमुळे किती वाढेल, याची सहज कल्पना होईल.

मी काढिलेल्या वर्तमानपत्राचे नावही त्याच्या जोडधंद्यास सर्वस्वी शोभण्यासारखे 'नितीमेवा' हे ठेविले होते. 'नितीमेवा' हे आखूड व मधुर नाव कोणीकडे, आणि अलीकडच्या इतर वर्तमानपत्रांची लांबलचक व पांचट नावे कोणीकडे! काही पत्रे आपल्या शहराच्या किंवा प्रांताच्या नावापुढे 'समाचार' हे भले मोठे शेपूट लावून इतस्ततः भ्रमण करीत असतात; पण त्यांपैकी बरीच पत्रे तेथील इत्थंभूत समाचार देण्याऐवजी आपल्या व्यक्तिविषयक, खोडसाळ व कडक लेखांनी त्याचा खरपूस समाचार घेत मात्र असतात. एखादे पत्र आपल्या ठिकाणच्या नावापुढे 'वैभव' हा भव्य शब्द जोडते. या शब्दामुळे माझी एकदा फार फसगत झाली. नागपूर येथे राष्ट्रीय सभा भरली होती. त्या वर्षी मी 'वर्तमानपत्रकर्ता' या उच्च नात्याने तेथे गेलो होतो. नागपूर शहर दृष्टीस पडावे हाही निघते वेळी माझा एक उद्देश होता. परंतु कार्यव्यग्रतेमुळे अखेरपर्यंत शहरात फिरण्यास मला सवड मिळाली नाही व मीही त्याबद्दल फारशी फिकीर केली नाही; कारण 'नागपूरवैभव' पत्राचे कार्यालय पाहिले म्हणजे सर्व नागपूर पाहिल्याचे श्रेय येईल अशी माझी समज़ूत होती. निघण्याचे

दिवशी सदरहू कार्यालय पाहण्याकरिता मी तेथे गेलो मात्र, तो पाचच मिनिटात आतील घाण, गैरव्यवस्था, आरडाओरड वगैरेंनी माझे मस्तक फिरून जाऊन त्या पत्राविषयीचे मस्तकातील मतही फिरून गेले !

'पत्रकर्तेराव' या बहुमानवाचक नावाची मला लहानपणापासून फार आवड असे. पण त्या नावाबरोबर पत्रकर्तेरावावर केवढी जबाबदारी येते याचे मात्र मला त्या वेळी ज्ञान नव्हते. जेव्हा स्वत: ते काम करण्याचा प्रसंग आला तेव्हा छातीवर मोठी थोरली धोंड येऊन पडावी असे मला होऊन गेले. पहिला अग्रलेख लिहिण्याकरिता मी ऐटीने मिशास पीळ भरीत व चिरूट ओढीत टेबलावर हात टेकून बसलो खरा; पण एक वाक्यही पुरे होईल तर शपथ ! मध्यंतरी, कागदच खराब आहेत, टाकच बरोबर नाही, शाई फिकीच आहे, अशा प्रकारे "नाचता येईना अंगण वाकडे" या न्यायाने मी नोकरमाण्सास शिव्याही देऊन पाहिल्या. परंतु सारे व्यर्थ ! शिव्या जितक्या सहज रीतीने तोंडास येत तितक्या शीघ्रतेने भारदस्त शब्द येईनात. एक तास झाला तरी "दयाळू इंग्रज प्रभूचे राज्य सुरू झाल्यापासून" ह्या ठराविक शब्दांपलीकडे काही सुचेना. शेवटी कपाळावर घर्मबिंदु चमकू लागले, अंगास कंप सुटला, तोंडचे पाणी पळून गेले. डोळ्यात अश्रू आले, अंगावरील केस ताठ उभे राहिले; याप्रमाणे काव्यग्रंथात वर्णिलेल्या सात्त्विक भावांचा माझ्या अंगी उद्भव झाला व या "अव्यापारेषु व्यापारात" पडलो नसतो तर बरे झाले असते असे वाटू लागले. परीक्षेत एखादा कागद कठीण असला म्हणजे उमेदवाराची जी धांदल उडून जाते तिचा अनुभव परीक्षेस बसण्याची यातायात न पडता मला आयताच आला. परंतु संकट आले म्हणजे त्यातून सुटण्याचा उपायही आपोआप सुचतो. मी आपली ऐटदार बैठक मोडून घाईघाईने वाचनालयात गेलो, तेथे वर्तमानपत्रांची दोनचार फाइले चाळून पाहिली. त्यातील बाष्कळ

कोटिक्रम, घाणेरडे विचार व गचाळ भाषा पाहून मलाही तितपत लिहिता येईल असे वाटू लागले. फाइले चाळता चाळता 'आर्यभूमि', 'सुवर्णभूमि', 'मायदेश', 'मायभाषा', 'मायधर्म', 'सनातनधर्म', 'सात्विक मनोवृत्ति', 'खाविंदचरणारविंदी मिलिंदायमान', 'आकाशातील बाप', 'टारगे सुधारक', 'रावबहादुर', 'अरेरावी वर्तन', 'अहंपिशाच्चिका', 'अलोट', 'स्तोम', 'खोडसाळ', 'पायमल्ली', 'हरताळ लावणे', 'डोळ्यात धूळ टाकणे', 'सूर देणे', 'री ओढणे', 'गोडवे गाणे', 'टिमकी वाजविणे', 'दांडोरा पिटणे', इत्यादी ठरीव शब्दांचे व अपशब्दांचे मी टिपण केले. त्यांच्या सहाय्याने दोनचार रकाने भरण्याचा मी निश्चय केला, व तो सिद्धीसही गेला. पहिल्या अंकात मी केशवपनापासून होणाऱ्या फायद्याचे विवरण करून त्यात सुधारकांची खूपच हजामत केली होती. त्यामुळे माझ्या पत्राला एकदम बरेचसे वर्गणीदार मिळाले. वर्गणीची रक्कम व सुधारकास दिलेल्या शिव्या यांचा जन्यजनकसंबंध याप्रमाणे मला पहिल्याच खेपेस दिसून आल्यामुळे मी आजपर्यंत तोच क्रम अव्याहत चालू ठेविला आहे, व वेळप्रसंग न पाहता व विषयांतराचे भय न बाळगता सुधारकांस शेलक्या शिव्यांची लाखोली मी नेमाने वहात आलो आहे, यास माझे वाचक साक्षी आहेत! 'शिव्यांची लाखोली' या नावाचा 'विष्णुसहस्रनामा'च्या धर्तीवर मी लिहिलेला ग्रंथ लवकरच प्रसिद्ध होणार आहे. तो होतकरू संपादकांनी अवश्य वाचून पाहावा. त्याजवरून अपशब्दांच्या वाङ्मयाचे माझे अगाध ज्ञान त्यांच्या नजरेस येईल. या शिव्या सारख्या सारख्या अंतरानी लेखात पेरीत गेल्यास त्यापासून द्रव्याच्या रूपाने बरेच मोठे पीक निघते, ही माझी स्वानुभवाची गोष्ट आहे. आजपर्यंत शब्दांचे अनेक कोश झाले आहेत; पण अपशब्दांचा हा पहिलाच कोश आहे!

याखेरीजही वर्तमानपत्रातील लेखांचे काही उगम असतात असे अनुभवांती माझ्या लक्षात येऊ लागले. त्यांपैकी काही नित्य व इतर नैमित्तिक असतात. राष्ट्रीय सभा, धर्मपरिषद, गणपत्युत्सव, सामाजिक परिषद इत्यादी संस्थांच्या वार्षिक बैठकी ह्या नित्य उगमाखाली येतात. पहिल्या तिहींचे पोवाडे गाण्यात व चवथीची थट्टा करण्यात वर्षातून चार महिन्यांच्या अंकांची सहज भरती होते. आता राहिले नैमित्तिक उगम. या सदराखाली लढाया, राज्यक्रांती, पार्लमेंटच्या निवडणुकी, मृत्यू, विधवाविवाह इत्यादी येतात. ईश्वराने साम्राज्यवादी लोकांत जे महत्वाकांक्षेचे बी पेरले आहे ते आम्हा पत्रकर्त्यांच्या फार उपयोगी पडते. नुसते बोअर युद्धच माझ्या पत्रास सतत तीन वर्षे पुरले. तिकडे आफ्रिकेत बंदुकांची फेर झडू लागली की, इकडे आमच्या लेखांची सरबत्ती सुरू होई. तिकडच्या रक्तपाताच्या बरोबरीने इकडे आमची शाई खर्च होत असे. तिकडे छापे पडत त्याचप्रमाणे आमच्याकडेही छापखान्यात पडत असत. तिकडे वेशीस व किल्ल्यास पडलेले भोसके जसे सैनिक तातडीने बुजवीत असत, तसे इकडे आम्हीहि आपले रकाने भरीत असू. अखेरीस जेव्हा तह होण्याचे घाटू लागले तेव्हा मात्र आमचा निरुत्साह होऊ लागला. सारखी तीन वर्षे चेंबरलेनवर कोरडे ओढल्यावर पुनः सुधारकांवर तोंड सोडणे फारच मिळमिळीत वाटू लागले. पण ईश्वरास आमची दया, दुसरे काय ? दक्षिण आफ्रिकेतील वैमनस्याची थोडी विझवाविझव होते न होते तोच उत्तर आफ्रिकेत वेडया मुल्लाने धिंगाणा सुरू केला, व पुढे तर रशिया व जपान यांमध्येही लढाई उपस्थित झाली; त्यामुळे आमच्या जीवात जीव येऊन पुन्हा अन्न पूर्वीप्रमाणे गोड लागू लागले.

एकदा कलकत्त्यास राष्ट्रीय सभेची बैठक होणार होती. तिचा अध्यक्ष मुंबईचा एक प्रसिद्ध गृहस्थ होणार होता. त्याच्या चिटणीसाचा व माझा

दाट परिचय होता. त्याच्या द्वारे आपणास अध्यक्षाचे भाषण आयते लिहिलेले मिळून ते सर्वांच्या आधी जादा पत्रकाने प्रसिद्ध करता येईल तर आपण तारेने बातमी मागविली असा लोकांचा समज होऊन आपल्या पत्राची किंमत वाढेल असे मला वाटले व मी ताबडतोब त्या चिटणीसाजवळ ही गोष्ट काढिली. त्यानेही मोठ्या आनंदाने त्या भाषणाची नक्कल करून माझ्या स्वाधीन केली. बैठकीच्या पहिल्या दिवशी मी ते भाषण छापून त्याच्या हजारो प्रती काढल्या. भाषणात मधून मधून 'टाळ्या' 'हशा', असे शब्द पसरण्याची मी काळजी घेतली होती, व मथळ्यावर "आमच्या खास बातमीदाराकडून मुद्दाम तारेने आलेली बातमी" हे शब्दही मोठ्या अक्षरांनी छापिले होते. संध्याकाळी माझ्या दुकानात नेहमीपेक्षाही जास्त गर्दी जमली, तेव्हा माझा आनंद गगनात मावेना. मी डोळ्यास चष्मा लावून व डोके वर करून प्रत्येकाकडे आपले कृपाकटाक्ष फेकू लागलो. शेवटी एकाने मला विचारले, "का हो पत्रकर्तेराव, आजच्या जादा पत्रकात अध्यक्षांचे भाषण आले आहे ते ताबडतोब मागविण्यास तुम्हाला बराच खर्च आला असेल नाही?" मी लागलीच बेपर्वाईचा व काहीसा अधिकाराचाही अविर्भाव अंगी आणून, प्रत्येक शब्दाचा तोल संभाळून व जरासे ठासून उत्तर दिले, "निरपेक्ष देशसेवेच्या पायी पैसाच काय, पण प्राणही खर्ची पडला तरी हरकत नाही!"

पुन: त्याने म्हटले, "मधून मधून योग्य स्थळी टाळ्या व हशाही दिला हे फार चांगले झाले. मघाशी आम्ही सर्वजण मिळून ते भाषण ऐकत असता अगदी त्याच स्थळी टाळ्या व हशा उत्पन्न होत होती."

मी म्हटले, "भाषण होईल तितके शब्दश: देण्याचा व श्रोत्यांच्या मनोवृत्तिही यथातथ्य वर्णावयाचा प्रयत्न केला आहे खरा."

यावर त्याने प्रश्न केला. " का हो, तुमचा बातमीदार भरपूर माहितीचा मनुष्य दिसतो ! "

" माझी मनुष्यांची पारख नेहमी अशीच असते. "

" कधी कधी तर त्याला घडलेल्यापेक्षाही अधिक गोष्टींची माहिती आहे असे उघड दिसते. "

" ते कसे ? "

" काल अध्यक्षांचे भाषण न होताही ज्या अर्थी त्याने ते सबंध पाठविले आहे त्याअर्थी त्याची माहिती खरोखरच विलक्षण असली पाहिजे. "

प्रथम मला या बोलण्याचा अर्थच कळेना. परंतु ' कालची राष्ट्रीय सभेची बैठक दोन दिवस लांबली आहे ' असे जेव्हा मला कळले तेव्हा मात्र माझ्या फजितीला पारावर नाहीसा झाला व ज्या टाळ्या व जो हशा मी सर्व भाषणभर जरा सढळ हातानेच पेरला होता तो मला प्रत्यक्षच सव्याज अनुभवण्यास मिळाला.

एखादी गोष्ट घडल्याबरोबर तिची तपशीलवार व पद्धतशीर माहिती ताबडतोब वर्तमानपत्रात येते याचे रहस्य हेच असते की, त्या माहितीचा लेख ती गोष्ट घडण्याच्या कित्येक दिवस पूर्वी सावकाशीने लिहिलेला असतो. हे विधान मृत्युलेखास विशेषेकरून लागू पडते. जो मृत्यु घडल्याबद्दल लेखक आपल्या लेखात सखेदाश्चर्य प्रदर्शित करितो त्या मृत्यूबद्दलचा लेख त्याने कित्येक वर्षांपूर्वी दारूच्या धुंदीत खरडलेला असतो; आणि मृताच्या प्रकृतीबद्दल धन्वंतऱ्यासही संशय येण्यापूर्वी व तो आपल्या स्त्रीपुत्रासमवेत आनंदाने नांदत असता लेखक त्याच्या मृत्यूच्या कारणाची मीमांसा करीत असतो, आणि त्याच्या आत्म्यास शांती देण्याबद्दल परमेश्वरास आळवून त्याच्या कुटुंबाचे पुढे कधी काळी होणाऱ्या हानीबद्दल कळकळीने व उदार बुद्धीने समाधान करीत असतो !

वृत्तपत्रांस इतर गोष्टींपासून जो पुरवठा होतो त्याबद्दल येथपर्यंत विवेचन झाले. हा साठा संपला म्हणजे उपासमार होत असलेल्या लांडग्याप्रमाणे वृत्तपत्रे एकमेकावरच उदरनिर्वाह करू लागतात, आणि एकमेकाच्या लेखांवर मनसोक्त टीका करून व एकमेकास मनमुराद शिव्या देऊन आपल्या अंकांची भरती करितात.

वर्तमानपत्रातील अग्रलेख व स्फुट लेख लिहिण्यास ज्या अडचणी येतात त्या दूर करण्याचे उपाय वर सांगितले. या लेखांची जागा वजा केली म्हणजे बाकी राहिलेल्या जागेचा बराच भाग नोटिशींनी व जाहिरातींनी व्यापिलेला असतो. या जाहिराती बहुतकरून औषधांच्या असतात. यातच 'नारूवर वस्ताद', 'हॉलोवेचे मलम', 'इसबावर रामबाण औषध' यांचा अंतर्भाव होतो. या औषधांनी जखमा कितपत भरून येतात हे सांगवत नाही. पण पत्रकर्त्यांच्या पिशव्या मात्र खात्रीने भरतात. तसेच वुइल्यमच्या पिंक गोळ्यांनी रोग्याची क्षुधा प्रदीप्त होते की नाही हे माहित नाही, पण संपादकांची क्षुधा मात्र शांत होते खरी. साहेबलोकात वुइल्यमसाहेब व हिंदु लोकात आंजर्लेकर बिवलकर शास्त्रीबुवा या दोघांना मात्र जाहिरातीपासून होणारा खरा फायदा पूर्णपणे कळून चुकला आहे. तथापि या दोघांच्या जाहिरातीमध्येही महदंतर असते. बिवलकर वाचकांस आपला अभिप्राय सरळ व स्पष्ट रीतीने कळवितात. पण वुइल्यमसाहेब एखादी गोष्ट सांगण्याचा बहाणा करून व एखाद्या सुंदर स्त्रीस, रोटीवाल्यास किंवा खाणीतल्या मजुरास मध्यस्थी घालून आपला डाव साधतात. रजपुतांची समरांगणावर उभे राहून लढण्याची पद्धत व मराठ्यांचा गनिमी कावा यात जितकी तफावत असे, तितकीच या दोघांच्या जाहिरातीत असते. वुइल्यम साहेबांच्या गोष्टी तर फारच मनोवेधक असतात. मी जेव्हा त्यांच्या जाहिराती आपल्या पत्रात देण्यास सुरुवात केली तेव्हा काही जणांनी

माझ्या त्या कृतीबद्दल पत्रद्वारे आपली नाखुषी कळविली म्हणून मी त्या जाहिराती बंद केल्या. पण त्या बंद करण्याचाच काय तो अवकाश, लागलीच मजकडे पत्रावर पत्रे येऊ लागली की, तुमच्या सबंध पत्रात त्या जाहिरातीच काय त्या चांगल्या लिहिलेल्या असतात, व त्या बंद कराल तर आम्हीही पत्र बंद करू. माझ्या अल्पसंतोषी वाचकांच्या मर्जीखातर मी त्या पूर्ववत चालू ठेविल्या आहेत.

माझ्या पत्रात ज्या औषधींच्या जाहिराती येतात, त्यांपैकी काहींच्या गुणासंबंधाने मला स्वत:ला अनुभव आला आहे. माझ्या छापखान्यातील एका इसमास संधिवात झाला होता, तो त्यावरील औषधाच्या जाहिरातीवरून रूळ फिरविल्यानेच बरा झाला. तसेच माझ्या नोकरांपैकी एक कुणब्याचा मुलगा तोतरे बोलत असे, त्याला त्यावरील औषध देऊन पाहिले तेव्हा त्याचा तोतरेपणा समूळ गेला इतकेच नाही, तर तो मराठी भाषा शुद्धही बोलू लागला. कोडावरील मलमाची जाहिरात माझ्या पत्रात ज्या जागी नेहमी असते ती जागा दर आठवडयास कमी कमी पांढरी होत चालली आहे; आणि रक्तपितीवरील औषध एका महारोग्यास देऊन पाहिले तेव्हापासून त्याचा रोग समूळ नाहीसा झाला आहे; कारण ते रामबाण औषध पोटात जाण्याला व त्याचा प्राण बाहेर येण्याला एकच गाठ पडली.

माझ्या पत्रातील वर्तमानसार जितके मनोरंजक करवेल तितके करण्याकडे माझा कल आहे. यामुळे माझे वाचक मजवर फार खुष असतात. वाचकास रंजविण्याकरिता वेळेस मला पदरचे तिखटमीठ जरी घालावे लागले तरी त्या पदरमोडीला माझी एका पायावर तयारी असते. यामुळे माझ्या पत्राचे फाइल चाळल्यास खालीलप्रमाणे माहिती जागोजाग सापडेल.

"अमेरिकेत क्युमेलो या गावी एका बाईस एक तीन तोंडाचे मूल झाले. त्याच्या सर्वांगावर केस असून एका तोंडावर कपाळाच्या मधोमध शेपटी होती. मूल एक तासभर जिवंत होते. रावणाच्या अस्तित्वाविषयी संशय बाळगणाऱ्या सुधारकांचे तोंड या तितोंडी प्राण्याने बंदच केले म्हणावयाचे !"

"भोळेगाव येथील प्रसिद्ध देवालयातील मारुतीस रामनवमीचे दिवशी दरदरून घाम सुटला. हे दुश्चिन्ह आहे असा ज्ञात्यांचा अभिप्राय आहे. हा चमत्कार पाहण्यास खूप गर्दी जमली होती. प्रत्येकापासून एक एक पैसा घेऊन आत सोडण्यात येई. ही रक्कम जमता जमता शंभर रुपयांवर गेली आहे. मारुतीच्या निढळाच्या घामाच्या या रकमेचा विनियोग संकटनिवारणार्थ ब्राह्मणसंतर्पण करण्यात होणार आहे. धर्मद्वेष्ट्यांचे इकडे लक्ष जाईल काय ?"

"लंबोडो येथे एक धरणीकंपाचा धक्का बसला. त्यामुळे जमिनीला जी एक मोठी भेग पडली, तिच्यातून शेषाचे मस्तक दिसत होते. शेषाच्या मस्तकावरील मण्यामुळे त्या भेगेत चोहोकडे प्रकाशच प्रकाश झाला होता. याउपर पुराणे खोटी असे म्हणण्याचे धाडस कोण करील. ?"

वरील गावे केवळ कपोलकल्पित आहेत, हे धूर्त वाचकांनी ताडलेच असेल. श्रीकृष्णाच्या मुखविवरात अर्जुनास जे अनेक चमत्कार दिसले त्या मासल्याचे माझ्याही कपोलातील चमत्कार मी वाचकांपुढे मांडीत असतो.

एकदा एका सामान्य मासिकाचे अनुकरण करून मी 'वर्तमानसार' या शब्दाबद्दल 'सारसंग्रह' हा शब्द योजावयास सुरवात केली. पण लवकरच माझ्या एका वात्रट वाचकाने त्या शब्दाच्या मागे 'अति' व पुढे 'णी' जोडून आणि त्याच्याच लगत 'मोर नाचू लागलेला पाहून लांडोर नाचू लागली' हे वाक्य लिहून माझा अंक मजकडे परत केला. तेव्हापासून मी त्या शब्दाचा त्याग केला आहे.

एखादा मोठा मनुष्य मरण पावला म्हणजे मी त्याच्या सन्मानार्थ मोठ्या आनंदाने—आनंदाने कसचे ! दु:खाने—एक अंक बंद ठेवीत असतो. महाराणीसाहेबांच्या मरणप्रसंगी तर मी एक महिनाभर अंक बंद ठेवण्यास तयार झालो होतो. पण वाचकांपुढे इलाज चालेना.

मध्यंतरी एक मासिक पुस्तक काढण्याचाही माझा विचार होता. पण मासिक पुस्तक बगीच्याप्रमाणे असून वर्तमानपत्र हे शेताप्रमाणे असते. म्हणजे मासिक पुस्तक अधिक सुंदर, व्यवस्थित व टिकाऊ असले तरी त्याला आयापेक्षा खर्चच अधिक लागतो; आणि वर्तमानपत्र जरी तात्पुरत्या महत्त्वाचे असले तरी ते उत्पन्नाला बरे असते. शिवाय मासिक पुस्तक काढले म्हणजे त्याबरोबर अनियमित होण्याची जबाबदारी संपादकाच्या माथी येऊन पडते. ज्याप्रमाणे राजास छप्परपलंगावरून उशिरानेच निजून उठावे लागते त्याप्रमाणे मासिकासही ग्राहकाच्या हाती महिन्याच्या महिन्यास पडून उपयोग नाही. काही मासिके तर इतर सृष्टी दिवाळीच्या उत्सवात मग्न असता शिमग्याचा सण साजरा करीत असतात; व अवर्षणानंतरच्या पुढील साली पीक येऊन सुबत्ता झाल्यावरही दुष्काळाच्या विवंचनेत चूर राहून दुष्काळी कामांची व्यवस्था कशी असावी याची मुद्देसूद वाटाघाट करीत असतात. हा सर्व विचार करून मी मासिक पुस्तक काढण्याचा आपला विचार रहित केला.

पत्रकर्त्यांच्या स्थानाला लोकात बराच मान असतो हा या धंद्याचा एक मोठा फायदा आहे. त्याला वाटेल त्या सभेस जाण्याची पूर्ण मोकळीक असते. त्याच्याकरिता राष्ट्रीय सभेसारख्या परिषदात मुद्दाम निराळे आसन राखून ठेविले असते. शिवाय त्याला वाटेल त्या पुरुषास वाटेल तेव्हा उपदेश करिता येतो. एकदा तर मी खुद्द बिस्मार्कसाहेबास राज्य कसे हाकावे याचा उपदेश केला होता व दुसऱ्या प्रसंगी मॉर्लेसाहेबास ग्रंथरचनेच्या कामी सूचना करून थोडेसे प्रोत्साहनही

दिले होते. गावात नाटकमंडळी आली म्हणजे तिच्याकडून आम्हास दर नाटकास एक दोन पास ठरलेले असतातच. जर नाही आले तर आम्ही लागलीच मंडळीवर टीका करून तिला 'दे माय धरणी ठाय' करून सोडतो. ग्रंथकर्त्यांनी नवीन पुस्तके प्रसिद्ध केली म्हणजे आम्हाकडे त्यांनी एक एक प्रत पाठविलीच पाहिजे; नाही पाठविली तर आम्ही चाबूक ओढओढून मारे त्यांच्या पाठींची सालडी काढितो. आमचा सर्वांत मोठा अधिकार म्हटला म्हणजे आम्ही आत्मनिर्देश एकवचनात न करिता अनेकवचनात करितो.

अजून माझ्या पत्राचा खप असावा तितका समाधानकारक नाही. वर निर्दिष्ट केलेल्या उपायांशिवाय लोकप्रियतेचा आणखी एक उपाय राहिला आहे व त्याची प्रचीती मी लवकरच पहाणारही आहे. तो उपाय कारागृहवास हा होय. मला अशी विश्वसनीय माहिती मिळाली आहे की, संपादकाच्या प्रत्येक बंदिवासास वर्गणीदारांची संख्या पाच हजारांनी तरी वाढते. अलीकडे काही लोकमान्य पुरुष कैदेत गेल्यापासून कैदेचा दोषही कमी झाला आहे. आजपर्यंत मी कैदेत जाण्याकरिता दोन तीन वेळा संभावित लोकांची अब्रू तिखटमीठ लावून चव्हाटयावर आणली; पण व्यर्थ ! त्यांनी मजवर अब्रूनुकसानीची फिर्याद आणिली नाही व माझ्या हातापायांचा कंडू शृंखलांनी शमावयाचा तसाच राहिला. आता यापुढची पायरी म्हणजे चोरी होय; व तिच्यात मला हटकून यश येणार असे माझ्या होऱ्यात येत आहे. जर चोरी पचली तर डबोले हाती येऊन मी जन्माचा सुखी होईन; जर उघडकीला येऊन खटला झाला तर कैदेत जावे लागून वर्गणीदार वाढतील ! याप्रमाणे एकीकडे सुखातिशयाचा आड तर दुसरीकडे विहीर असे होऊन मी त्यामध्ये मनातल्या मनात आनंदाच्या गटंगळ्या खात आहे.

* * *

# सिमलावर्णन

* * *

नरसिंह चिंतामण केळकर

दिल्ली आणि सिमला यांतील अंतर जमीनअस्मानाचे म्हणण्यास हरकत नाही. दिल्ली समुद्राच्या सपाटीपासून सुमारे तीनशे फूट उंच असेल, तर सिमला सात हजार फूट उंच भरेल. **सिमल्यावर चढलेल्याला झाले तरी आकाश ठेंगणे होते असे थोडेच आहे !** पण हिमालय म्हटला म्हणजे पृथ्वीवरच्या कोणाही मनुष्याला जरा आदरानेच बोलावे लागते. समुद्राच्या सपाटीपासून तडक एकदम सात हजार फूट उंच चढणे हे आधुनिक वैमानिकालाही थोडे अवघडच जाईल. 'सिमल्याची टेकडी' हे 'नगाधिराज हिमालया'चे एक लहानसे बछडे आहे; तथापि, हे बछडे आपल्या वडिलांचे नाव काही अगदीच घालवणारे नाही. कारण येथे हिवाळ्यात बर्फ पडतेच, पण ऐन उन्हाळ्यात देखील येथून जवळच वर्फाच्छादित शिखरे दिसतात. हल्ली सिमल्यास हवा फारशी गार नाही. सिंहगड किंवा महाबळेश्वर येथील हवा देखील कदाचित थोडी अधिक गार ठरेल. पण आठपंधरा दिवसांपूर्वीच येथे थंडीचा कडका पडून लिंबाएवढया गारांचा पाऊस कोसळला होता असे आमच्यापूर्वी येऊन राहिलेले लोक सांगतात. **उंच दर्जाच्या माणसाच्या स्वभावाप्रमाणे उंच जागेचे हवामान लहरी नसेल तरच आश्चर्य !**

हिमालय पर्वतात एकाहून एक उंच अशा शिखरांच्या रांगा एकामागे एक लागलेल्या असतात असे म्हणतात. त्याचा मासला सिमल्यास

येताना पाहण्यास सापडला. कालका येथे चढण्यास प्रारंभ केला तेव्हा वाटे, हा डोंगर चढून गेलो म्हणजे सिमला दिसेल. पण सिमला नुसता दिसण्याला देखील त्याच्या सात हजार फूट उंचीतले सहा हजार फूट खर्ची घालावे लागले. आणि हे करताना आगगाडीला वळसे इतके घ्यावे लागले, की आम्ही जिच्याकडे तोंड करून चाललो नव्हतो अशी एकही दिशा उरली नाही. खुद्द सिमलाच पाठीशी घालून पुढे चाललो की काय असाही कित्येक ठिकाणी भास झाला ! वळणे घेण्याला सापाच्या गतीची उपमा देतात; पण आमच्या पूर्ण चक्राकार गतीने ही म्हण साफ खोटी पाडली ! वळणाची एक रांग संपली की पहिली दरी बुजून नवी दरी व नवे खोरे दिसू लागे; यामुळे जमिनीपासून डोळ्यांना उंची फारशी भासत नसे. पण नवी संकटे उद्भवली म्हणजे जुन्यांचा विसर पडावा त्यातलेच हे आहे ! अगणित दऱ्याखोऱ्यांची पुडात पुडे बसवून हिमालयाची बनावट एखाद्या गेंदेदार दीपमाळेप्रमाणे किंवा पाकळीदार फुलांच्या माळेप्रमाणे केलेली आहे. सिमल्याचा पर्वत हे या एकंदर माळेतील शेकडो फुलांपैकी फक्त एक फूल आहे. या प्रत्येक फुलाच्या वाटयाला एकेक उंच गिरिशिखर आलेले आहे. प्रायः ही सर्व शिखरे श्रीशंकराच्या नावाने पवित्र झालेली असावी. आमच्यासमोर दिसते त्या शिखराला 'चुडेश्वर' म्हणतात; व या 'जटाधारी' योगीश्वराच्या विरागी ऐश्वर्याची आठवण करू देणार पवित्र भस्मराशीच की काय असा तो त्या शिखरावरील बर्फाचा विसकटलेला ढीग दिसतो. येथून केदार, कैलास, कांचनगंगा–धवलगिरी वगैरे शंकरजींच्या इतर आवडत्या निवासस्थानांची आठवण सहजच होते, आणि 'एवरेस्ट'वर चढण्याच्या 'प्रयत्नां'ची हकीकत आजच्याच वर्तमानपत्रात वाचली, त्यावरून अजून 'साहेब' शिवला नाही अशी देवता-निवासाची एक तरी जागा शिल्लक उरली आहे या विचाराने खरोखरच जरा बरे वाटले !

[library stamp]

हिमालयात अनेक जातींचे पहाडी लोक आहेत. त्यांची पूर्वी लहान लहान संस्थाने होती. १८०३ साली दिल्ली हस्तगत झाल्यावर इंग्रजांचा प्रवेश पंजाबच्या या कोपऱ्याकडे झाला. पहाडी संस्थानिकांना लढवय्ये व निर्दय गुरखे लोकांचा त्रास होऊ लागला. तो टाळावा म्हणून त्यांनी इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांनी नेपाळच्या युद्धात गुरख्यांना आपल्या हद्दीत पिटाळून लावले. हे कार्य झाल्यावर इंग्रजांनी पहाडी संस्थानिकांना त्यांचा बहुतेक मुलूख परत दिला. पण लष्करी दृष्टीने काही नाक्याच्या जागा म्हणून आपल्या ताब्यात ठेवल्या. तात्पर्य, इसापनीतीतील 'मनुष्य आणि घोडा' या गोष्टीची येथे पुनरावृत्ती होऊन साहेब जो एकदा सिमल्याच्या पहाडावर चढला तो काही केल्या खाली उतरलाच नाही! परत दिलेल्या जागात देखील उंच उंच हवाशीर पठारे पाहून येथे दुखणाईत लोकांकरिता झोपड्या व घरे बांधण्याची परवानगी त्याने मिळवली व अखेर ही लष्करी ठाणी व ही पठारे मिळवून सिमल्याची वस्ती बनली. सिमल्याच्या सात टेकड्यांवर मिळून आज सुमारे नव्वद हजार वस्ती आहे व सगळ्या हिंदुस्थानचा कारभार बारांपैकी सात महिने या पहाडावरून चालतो!

हल्ली सिमल्यावर चढून येण्याला मोटारी चालण्यासारखा रस्ता व प्रत्यक्ष आगगाडीही झाल्यामुळे दळणवळणाची काही अडचण वाटत नाही पण पहिले जे इंग्रज येथे आले त्यांना अमेरिकन वसाहतवाल्यांप्रमाणे धैर्य, काटकपणा व स्वावलंबन या गुणांचा फार उपयोग करावा लागला. १८१९ साली सिमल्यावर साहेबाची पहिली झोपडी बांधली गेली, तेथपासून पुढे उन्हाळ्यात चार दिवस व्हाइसरॉय व सेनापती यांनी नुसते हवेखातर येथे येऊन राहावे असा प्रघात पडला. १८२७ मध्ये लॉर्ड आमहर्स्ट हे आपली खास कचेरी घेऊन उन्हाळभर येथे राहिले.

अखेर १८६४ साली ग. ज. लॉर्ड लॉरेन्स यांनी सिमला ही कायमची राजधानी बनविली. या शंभर वर्षात सरकारी रीत्या या ठिकाणावर किती कोटी रुपये खर्च झाले असतील याची कोणासही सहज कल्पना करता येईल. या राजधानीस सरकारच्या सर्व खात्यांच्या कचेऱ्या, दप्तर, छापखाना, लष्करी छावणी, बिनतारी व साधी तारायंत्रे, लष्करी विमाने वगैरे सर्व कारखाने एप्रिलच्या आरंभापासून नोव्हेंबरच्या आरंभापर्यंत जोरात चालू असतात. उरल्या पाच महिन्यात सिमला योगनिद्रा घेतो.

'एवढया सगळ्या हिंदुस्थानची राजधानी व ती एखाद्या पर्वत-शिखरासारख्या अडचणीच्या जागेत का ?' असा प्रश्न सहज सुचतो. पण त्याचे उत्तर पूर्वीच्या इतिहासात व परंपरेत आहे. कंपनी सरकारचा राज्यसंपादनाचा उद्योग प्रथमतः उत्तर हिंदुस्थानात झाला व कलकत्त्याहून राजधानी बदलून दिल्लीला आली. तरी वरील कारणात काही फरक झाला नाही. उलट कलकत्त्यापेक्षाही दिल्लीला सिमला फारच जवळ, यामुळे ही सकारणता बळावली, नव्या दिल्लीची रचना व इमारती झाल्यापासून मात्र सिमल्याचे महत्त्व सरकारच्या मनातून थोडे कमी झाले आहे. सर्व कचेऱ्या सात महिने येथे असतात; त्या उठून बारा महिने दिल्लीस राहाव्या व मुख्य मुल्की–लष्करी अधिकारी यांनीच वाटेल तर आपले खास नोकर व हस्तक बरोबर घेऊन उन्हाळ्यात सिमल्यास राहावे अशी नवी योजनाही पुढेमागे होण्याचा संभव आहे, नाही असे नाही. पण आज तरी सात हजार मैल समुद्रापलीकडचा साहेब हिंदुस्थानात येऊन सात हजार फूट उंचीच्या पहाडावर बसून राज्य करतो अशी विपरीत वस्तुस्थिती आहे खरी ! हवाखोरीची आवड, एकतंत्री राज्यसत्ता, परक्या लोकांचा

मुबलक पैसा इतके गुणदोष एकत्र झाल्यावर पर्वतावर, तर पर्वतावर पण सुखाला लागेल अशी राजधानी इंग्रजांनी का न करावी ?

पण इंग्रजांनी सिमल्यास राजधानी केली तिला वरच्यापैकी कोणतेच कारण लागू पडत नाही. सुरक्षितपणा म्हणावा तर सिमल्यास तटबंदी कोठेच नाही, उलट बिकट जगातून वर सहज जाता यावे म्हणून वाटा, सडका कितीतरी केल्या आहेत. एकान्तप्रियता म्हणावी तर कलकत्ता मुंबई येथील सरकारी बंगल्यांना जितकी गर्दी दूर तितकी येथे नाही. मुख्य सडक अशी एकच, म्हणजे माल रोड आणि संध्याकाळी किंवा दुपारी पाहावे तो रावांबरोर रंकही येथे खांद्याला खांदा लावून हिंडलेले दिसतात. मुंबई–कलकत्ता येथे आगगाडया, मोटारी असल्यामुळे गर्दीत देखील श्रीमंताला संपर्क लागत नाही. येथे पाहावे तो सगळ्या सिमल्यावर मुलकी लाट ( व्हाइसरॉय ) जंगी लाट ( सेनापती ) पतियाळचे महाराज व भोपाळच्या बेगमसाहेब या चौघांखेरीज इतर कोणालाही मोटार किंवा घोडागाडी वापरण्याची परवानगी नाही ! यामुळे मालवरील अरुंद रस्त्यात सगळ्या बडया अधिकाऱ्यांना पायानेच चालावे लागते. एखाद दुसरा घोडयावरून जातो. काही थोडे रिक्शामधून जातात, पण बहुतेक पायी जातात. यामुळे खांद्याला खांदा सहजच भिडतो. बरे, पवित्रपणा म्हणावा तर इंग्रजांनी येथे देव–देवळांची भानगड फारशी ठेवलेली नाही; आणि सामाजिक व्यवहारात पाहावे तर शहरांपेक्षाही येथे ख्यालीखुशाली व तदनुषंगिक गोंधळ अधिक माजतो म्हणतात.

सिमल्याचा विस्तार सात टेकडया मिळून सहा मैल लांबीचा आहे. त्या मानाने रुंदी फारच कमी भरेल. कोठे कोठे पर्वताच्या माथ्याचा सपाट भाग शंभर फूट देखील रुंद नाही. या सहा टेकडयांना आधारभूत असलेला मुख्य पर्वत घोडनालाच्या आकाराचा आहे. त्याच्या

मध्यभागी दाट वस्ती असून इतर वस्ती टेकड्यांवर पसरलेली आहे. मुख्य वस्ती एकाच्या माथ्यावर एक, म्हणजे एकाने आपल्या पडवीत बसून दुसऱ्याच्या धुराड्यातून खाली पाहावे अशी बसल्यासारखी दिसते. काळ्या लोकांची वस्ती ही बाजारपेठ व त्याखाली लागलेली वीसमजली घरांची उतरंड यात साठवलेली असून सरकारी व युरोपियन लोकांचे खाजगी मालकीचे बंगले बाजूच्या टेकड्यांवर पसरलेले आहेत. तथापि बाजूस झाले तरी महाबळेश्वराप्रमाणे येथे बंगल्यांना विस्तीर्ण कंपाउंड किंवा आवार नसते. कारण माथ्यावर सपाटी अशी फार कमी. स्वाभाविक मैदानी जागा नसल्याने घर–बंगला बांधणाराला प्रत्येक ठिकाणी झाडे तोडून डोंगराची कड खोदून जागा साफ करून घ्यावी लागली आहे. कोणत्याही एका घरातून दुसऱ्या घरात जायचे असल्यास चढले तरी पाहिजे किंवा उतरले तरी पाहिजे. अशा स्थितीत दळणवळण किती अवघड होत असेल याची कल्पना सहजच करता येईल. लांब पल्ल्याला चौघांच्या खांद्यावरून जावे लागते! पण मोठे गाडी-रस्ते नसले तरी लहान सडका व पाऊलवाटा यांचा जणू काही नागमोडी मोक्षपटच पर्वताच्या सर्व अंगभर आखल्यासारखा दिसतो. सिमल्याची इतकी वस्ती पण कोणीही कोणाजवळ असा राहात नाही, असे यथार्थतेने म्हणता येईल. कोणत्याही वस्तीला पाण्याची सोय मुख्य लागते, ती सिमल्यास असावी तितकी नाही. या पहाडात पाण्याचा साठा फार होत नसावा असे वाटते. कारण डोंगरकपारीतून निघालेला जिवंत वाहता झरा येथे सहसा दिसत नाही. येथील म्युनिसिपालिटीने दुरून पाण्याचे नळ आणले आहेत; पण कित्येक बंगल्यांना पाणी बरेच लांबून आणावे लागते.

विजेची रोषनाई मात्र सिमल्याला भरपूर आहे. दुरून रात्री बड्या सिमल्याकडे पाहिले म्हणजे हिरेमोत्यांची ताटेच्या ताटे भरून ती लीलेने

वर उधळून द्यावी असा दाट विखुरलेल्या विजेचा लखलखाट दिसतो; आणि दूर बाजूच्या टेकडयांवर पसरलेले तुरळक दिवे पाहिले म्हणजे आपण एखाद्या मोठ्या बंदरात उभे असून समोर रात्रीच्या वेळी समुद्रात नांगरलेल्या शेकडो आगबोटींचा काफिला पहात आहो असा भास होतो. तारायंत्री तारांच्या जाळ्यांचा विस्तार पाहिला म्हणजे बिनवापराच्या जागेत कोळ्यांनी केलेल्या विणकामाची आठवण होते. एखाद्या वेळी एखादे लष्करी विमानही पहाडावर घिरटया घालते तेव्हा खालच्या दरीतील चीड, देवदार वगैरे वृक्षांच्या झाडीत नव्या फुलांवर मधाकरिता घोंघावणाऱ्या भुंग्यांच्या गुंजारवाचा प्रतिध्वनीच आपण आकाशात ऐकत आहो की काय असे वाटते. तथापि अजूनही सिमला सगळाच काही नवाळला नाही! त्याच्या जुनाट परंपरेचा धागा अजूनही शिल्लक आहे. कारण पहाटेच्या वेळी 'कार्ट रोड'वरून लमाणा खेचरांचे तांडे वर घाट चढून येतात तेव्हा त्यांच्या गळ्यातील घंटा आपल्या गोड आवाजाने जुनी परिचित रागदारी गाऊन साखरझोप घेणाऱ्या आळशी मनुष्याला जागे करून उषःकालाची वर्दी देत असतात. अजून माल देऊन माल विकत घेणारे म्हणजे अडाणी तिबेटी लोक हिमालयातून येऊन आश्चर्यचकित मुद्रेने सिमल्याच्या बाजाराकडे पाहात उभे राहतात. अजूनही आपले सर्व अंग नखशिखान्त झाकून घेणाऱ्या पहाडी स्त्रिया अर्धे वक्षस्थळ उघडे टाकून फिरणाऱ्या गोऱ्या युरोपियन बायांकडे भित्र्या दृष्टीने पण तिरस्कारयुक्त मुद्रेने पाहात जात असतात. अजूनही एखादा जंगली गुराखी पहाडाच्या माथ्यावर बसून जुन्या पद्धतीने अलगुज वाजवून खालचे दरीखोरे मधुर आवाजाने भारून टाकतो.

सिमल्यास सुमारे नव्वद हजार वस्ती आहे म्हणून सांगितले, पण ती उन्हाळी वस्ती होय. ऐन हिवाळ्यात जेव्हा सरकारी कचेऱ्या येथून खाली जातात व चोहोकडे बर्फ पडते तेव्हा ही वस्ती चवथ्या

हिश्शाची राहते; बाकीची खाली निघून जाते. घरधन्यापेक्षा पाहुण्यांचीच गर्दी अधिक, अशातला येथील कायम वस्तीचा प्रकार आहे. आणि उन्हाळी वस्तीत देखील उद्योगी मधमाशांपेक्षा गुलहौशी फुलपाखरेच अधिक. सरकारी पेटया, कागदांची पुडकी, पट्टेवाल्यांची गर्दी, हे सर्व पाहून येथे चालणाऱ्या कामकाजाची कल्पना येते ती काही अगदीच खोटी नसते. पण रस्त्यात भेटणाऱ्यापैकी खऱ्या कामात गढलेल्या अशा एका माणसागणिक दोन माणसे ख्यालीखुशालीच्या ढंगात असतात असे म्हटल्यास फारशी चूक होणार नाही. सरकारी कचेऱ्या येथून हलल्या म्हणजे मग येथील कायम रहिवासी पहाडी लोक व नेपाळतिबेटकडून येणारे फेरीवाले यांच्या स्वाधीन सगळा सिमला होतो. या दोन जातींचे लोक पाहताच वेगळे म्हणून ओळखता येतात. पहाडी मनुष्य हा अर्धशुभ्र, नाकाडोळ्यांनी तरतरीत, व ठेवणीने किंचित छलकाटा असा असतो. आणि तिबेटी वगैरे प्रायः नकटे व खुजे, पण मोठे बळकट असे असतात. हातगाडया वगैरे ओढण्याचे काम पहाडी लोक करतात. पण पल्लेदार मजलीवरचे किंवा ओझे वाहण्याचे काम हे दुसऱ्या प्रकारचे लोक करतात. आमचे घाटी लोक खंबीर खरे, पण हे तिबेटी मोठी ओझी पाठीवर घेऊन उंचवटयावरून खुशाल चढून गेलेले पाहिले म्हणजे आश्चर्य वाटल्याशिवाय राहात नाही. या कायम रहिवाशांच्या यादीत सिमल्यावरील माकडांचाही समावेश केल्यास चूक होणार नाही! कारण त्यांची वस्ती तशीच जुनाट व कायम आहे!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६८५० दि: १९७५
क्रमांक ७५१० नों दि: ६/५/६८

# यंत्र हे शाप की वरदान?

* * *

**विनायक दामोदर सावरकर**

यंत्राचे साधन मनुष्याच्या हाती आल्यामुळे मनुष्याची हानीच हानी होत आहे, तो दुबळा बनत आहे, दुःखी बनत आहे. दरिद्री बनत आहे. यंत्र हा मनुष्यजातीला झालेला शाप होय, अशी यंत्राविरुद्ध जे ओरड करतात त्यांनी हे लक्षात ठेवावे, की **यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीने अधिक कार्यक्षम झालेले मनुष्याचे एकेक इंद्रियच आहे !** कळ म्हणजेच इन्द्रियाची वाढलेली कार्यक्षमता. हत्यार म्हणजेच हाताहूनही दसहत्यारी असा आपला एक जोड हात. यंत्रे म्हणजे आपल्या मूळच्या शक्तीपेक्षा लक्षपटीने शक्तिमान झालेली आपली बहिश्चर इन्द्रिये ! जर हत्यार, कळ, यंत्र नसते तर मनुष्य सृष्टिशक्तीवर आज चालवीत असलेली सत्ता चालवू शकता ना. इतके सांगणे म्हणजे यंत्रशक्तीच्या उपयुक्ततेचे अगदी त्रोटक वर्णन होय. यंत्रावाचून, कळीवाचून मनुष्य या जीवनकलहात जगूच शकता ना, कोल्हा कुत्रा देखील, त्याला भारी होता, फाडफाडून खाता ! मनुष्यास झालेल्या यंत्रबळाच्या सहाय्याविषयी असे म्हटले तरी देखील अतिशयोक्ती होणार नाही की—

**शरीराने पाहिले तर मनुष्य हा अत्यंत दुबळा, कळीनेच काय तो प्रबळतम ठरला !**

मूळच्या पिसाळलेल्या स्वापदांनाही अरण्यात मनुष्याला पुन्हा उभा केला तर त्याच्या स्वतःच्या देहाच्या बळे त्याला किती स्वापदांपुढे टिकाव

धरता येईल ते एकदा कल्पून पहा ! सिंहासारखी नखे नाहीत, दंष्ट्रा नाहीत, दात नाहीत, नुसत्या गर्जनेने सारे रान हादरून सोडील असा भीषण आवाजही नाही. वाघाला तर म्हसरू मारण्यास जितकी दंतनखरे शिणवावी लागतात, तितकीदेखील ह्या माणसाचा दुबळा कोवळा कंठ फोडून टाकण्यास शिणवावी लागणार नाहीत. आपणापुढे जशी कोवळी काकडी, तसा माणूस वाघापुढे ! मनात येताच कचकच चावून टाकावा. माणूस नुसत्या त्याच्या देहाइतका दुबळा; वाघास प्रतिकारील असा एकही अवयव माणसास नाही. हत्तीपुढे तर माणूस म्हणजे मुंगी ! नुसत्या पायाच्या प्रचंड दाबाखाली चिरडावा किंवा त्या अजस्त्र शुंडेत धरून दगडावर नारळासारखा आपटावा ! तरस, लांडगे, रानडुकरे यांच्यासुद्धा समोर उभे राहण्याची त्याची छाती नाही. रानडुकराच्या दाताला प्रतिकारील असा त्याला एकही अवयव नाही. मोठया शिकारी कुत्र्याचीदेखील त्याला वाघासारखीच भीती ! माणूस चावला वा बोचकारू लागला तरी शिकारी कुत्रा एका झेपीसरशी माणसास फाडून काढण्यास सोडणार नाही. फार काय, अगदी दुबळी, दीन, निरुपद्रवी जी गाय तिची देखील जर मनुष्याशी झुंज लागली तर तीच आपल्या शिंगांनी त्याचे पोट बोलता बोलता फाडू शकेल ! रानरेडे, रानबैल, यांच्या त्या उन्मत्त डुरकण्यासरशीच माणसाला पळ काढण्यावाचून जगण्याचा दुसरा मार्ग नाही. लहान मधमाशी ! पण त्या माशा त्याला एकदा का झोंबल्या की त्यांच्या विषारी दंशाच्या भयंकर वेदनांनी तडफडत, माणूस मरून जातो–पण त्यांना काही माणूस उलट डसू वा गिळू शकत नाही, त्यांच्या मागे उडू शकत नाही. कावळादेखील माणसाच्या रक्ताळ घावावर वा डोक्यावर पशूवर मारतो तशी चोची मारून उडून जाऊन कावकाव करीत माणसाला उलट वेडावू शकतो ! अजगर त्यास नुसत्या आपल्या

अजस्र देहाचे वळसे घालून चरखासारखा पिळून काढतो. टिचभर फुरसे ते काय, पण त्याच्या पायाला कुठून कसे डसेल नी त्याला बोलता बोलता ठार मारील याचा नियम नाही! समुद्रनद-नद्यांमध्ये तर माणसाची दुर्दशा विचारावयासच नको! आत पाय घसरला की माणूस सुसरीच्या नी मांसाहारी माशांच्या आहारी गेलाच म्हणून समजावे! माणसाला सूळचे असे तीक्ष्ण सुळे नाहीत, पोट चिरून फाडून टाकणारी शिंगे नाहीत, कोंबडीची कोंबडी किंवा गवत, पाला, पाचोळा, रक्त, हाडे जे मिळेल ते पचवून टाकणारे पोट नाही, थंडी निवारील अशी लोकरीची शाल अंगी नाही, किंवा राठ कातडे नाही. घारीसारखी दृष्टी नाही, मशकासारखे सुद्धा पंख नाहीत, गरुडासारखी क्रकचतीक्ष्ण चोच वा कंठच्छेदक नखरे वा रक्तलिप्सु पंजे नाहीत, विषारी दात नाहीत, दंश नाही, नांगी नाही. हिंदी लोकांना इंग्रजांनी निःशस्त्र केले त्याच्या कितीतरी युगे आधी माणसाला सृष्टीने निःशस्त्र केले होते! वरिष्ठ श्वापदांहूनच नव्हे तर पक्षीमत्स्य-मक्षिकाहूनही माणूस मुळात पाहिला तर केवळ अंगाने असा अत्यंत दुबळा आहे! अक्षरशः गायीहून गाय आहे!

पण तो आज ह्या पृथ्वीतलावर तरी साऱ्या प्राण्यांचा राजा, शास्ता, जेता होऊन मिरवू लागला; सृष्टिशक्तीशीच मल्लयुद्ध करण्यास दंड थोपटून ठाकला; बाष्प, चुंबक, विद्युत्, रेडियम यांना काही प्रमाणात तरी माणसाळवून त्यांच्या अजस्र बळावर समुद्र, पृथ्वी नी आकाश या मानवी जगताच्या तीनही खंडात दिग्विजय करीत चालला आहे. कशाच्या बळावर हा अगदी अत्यंत दुबळा माणूस इतका प्रबळ झाला? कळीच्या, हत्याराच्या, यंत्राच्या!!

त्याच्या अंगच्या पिसपिशीत बुक्कीला कुत्रादेखील भीक घालीत नव्हता; पण ज्या दिवशी माकड-माणसाने पहिला दगड उचलून फेकला

त्या दिवशी त्याला एक नवी बुक्कीच फुटली. दगड दुरून फेकायचा, ह्या हत्यारासरशी माणसाची पिसपिशीत बुक्की कृतांताच्या बुक्कीसारखी असह्य बनून निराळी होऊन उभी राहिली. हाताने उचलून फेकलेली किंवा ढकललेली शिळा म्हणजे 'कृतांतस्य मुष्टिः पृथगिवस्थिता !' माकडमाणूस झाडाच्या फांद्या घेऊन पशूंचे कळप झोडपीत, साप, सापसुरळ्या, विंचू ठेचीत चालला. त्यांचे विष न बाधणारे नवे हात जे त्याला सापडले त्याच त्या फांद्या, त्या काठ्या, त्या लाठ्या, ते सोटे होत. माणसाला रानडुकरासारखे सुळे नव्हते, त्याची उणीव भाल्याने भरून काढली. रेड्यासारखे टक्करमारू डोके नव्हते, त्याने गदेचे डोके टकरावून त्या साऱ्यांची खोड मोडून टाकली. सिंह, वाघ त्याला जेव्हा तेव्हा नखाग्रांनी भेडसावीत; पण माणसास बरची, खंजिरे, कट्यार, खड्गकृपाण असली भयंकर नखे फुटताच वाघसिंह चळचळ कापू लागले ! कारण खड्ग म्हणजे आपले एक वाढलेले नखच नव्हे काय ? इतक्यात माणसाच्या पाठीशी धनुष्य नि हाती बाण प्रकटला. सिंहाची झेप, वाघाची उडी, हत्तीची सोंड, उंटाची उंची, नव्हे त्या घारगिधाड–गरुडांच्या चोची देखील आणि उंच उडणारे पंख–सारी प्राणिसृष्टी माणसाच्या त्या धनुष्याच्या टणत्कारासरशी कुणी ची ची करीत तर कुणी शेपट्या घालीत रानोमाळ पळून मेली ! कारण जवळ आल्यावर ते लढणार, पण हा धन्वी ते चालून येण्याच्या आधीच त्यांचा कंठच्छेद करणार ! कवच ही माणसाची दुर्भेद्य त्वचाच होय. दुर्बीण हा शतपटीने दर्शनक्षम नी सूर्यासही पाहता न दिपणारा असा दुसरा डोळा. दूरध्वनियंत्र हा त्याचा शतपटीने अधिक श्रवणक्षम झालेला नी मुंबईच्या भिंतीशी लावला असता कलकत्त्याच्या वा लंडनच्या मित्राची हाक ऐकणारा कान आणि ती दारू, ती स्फोटके, त्या गोळ्या, ती बंदूक, ती तोफ, तो विषारी धूर हाच पेटून बाहेर भडकलेला

क्रोध! ही चूल, ही वैद्याची भट्टी, हा स्टोव्ह म्हणजे मनुष्याच्या पोटातील जठराग्नीची एकेक शाखा, जे पोटाला पचेना ते पचवून देणारी पोटे! खल–उखळ ही त्याची खालची नवी बळकट दाढ; बत्ता–मुसळ त्याची वरची दाढ. त्या दोन्ही आता प्रचंड आकार धरून वाफेच्या शताश्वशक्तीने पूर्वी जसा एक घास तो माणूस चावी तसे सहजी धान्याचे पोतेच्या पोते एका चर्वणासरशी पिसून टाकतो. त्याची जुनी इन्द्रियेच काय ती अशी सहस्रपटीने कळ-हत्यार-यंत्रबळे अधिक कार्यक्षम झाली नाहीत, तर माणसास उपजता अंगी जी मुळीच नसतात ती नवी अद्भुत इंद्रियेही यंत्रबळे त्याला लाभली आहेत!

लहानशा आडात बेडूक राहतो तितके देखील त्याचे अंग मूळचे जलस्तंभक नाही. पण विज्ञानाने त्याला अकस्मात एक अद्भुत वरदान दिले आणि कासवाहून कठीण, देवमाशाहून प्रचंड, सुसरीची सहस्रे ज्याच्या धक्क्यासरशी स्वतःच चक्काचूर होतात असा एक प्रचंड अद्भुत जलदेह माणसास दिला–ते बेडर, ती पाणबुडी, त्या विनाशिका, त्या प्रचंड वणिकनौका, बाष्पनौका, आगनावा, वीजनावा! एका मशाकाइतके माणसाला वर उडू म्हटले तर उडता येत नसे, मूळचा तो मशाकाहून धूळबंद; पण विज्ञानास आराधिताच वेदकुराणातील मोठमोठ्या ऋषिपीरपैगंबरांनाही मनुष्यास जे देववले नाही असे वरदान माणसास मिळाले आणि प्रत्यक्ष गरुडाच्या बापजन्मी त्याने कधी पाहिले नसतील असे प्रबळ पंख मनुष्यास फुटले ते हे विमान, ते हे विमान!

ज्या ज्या सिद्धी, मोठमोठी जपतपे करकरून देवभोळेपणास मिळाल्या नाहीत किंवा कोणास मिळाल्याशा वाटताच ती एक अत्यद्भुत, प्रत्यक्ष ईश्वरी नि विशेष कृपाप्रसादी मंत्रबळाची देणगी म्हणून वाटे, त्या त्याहून शतपटीने अत्युद्भुत अशा सिद्धी आजच्या हाटात पैशा पासरीच्या भावाने यंत्रबळ लुटवीत आहे! अतिदर्शन, अतिश्रवण,

ध्वनिलेख बोलपटातही (Telephone Talkies नी) मनुष्यास अर्पिलेले अतिस्मरण, महासमुद्राच्या तळाशी खाली अवगाहन, विरलस्तरांच्याही वर आकाशउड्डाण!

आणि हे सारे अद्‌भुत प्राबल्य खुदास वा जेहोव्हास वा देवास दमडीचाही धूप लावण्याची लवलेश आवश्यकता त्या त्या प्रकरणी तरी नसता! यंत्राने मनुष्य दुबळा केला नाही; उलट दुबळा प्राणी जो होता तो माणूस आज पृथ्वीवरील, अंतराळातील, महासागरातील प्राण्यात प्रबळतम जो झाला तो, हत्यार—कळ—यंत्र यांच्याच योगे होय, मंत्रबळे नव्हे तर यंत्रबळे! शाप नव्हे! तर यंत्र हे मनुष्याला अतिमानुष करणारे विज्ञानाचे वरदान होय!

★ ★ ★

# लोकाश्रयी मराठी वाङ्मय

* * *

श्रीधर व्यंकटेश केतकर

महाराष्ट्रीय अभिरुचीच्या इतिहासास काव्यपरीक्षकांच्या विवेचनाचे आणि अभिज्ञतेचे महत्त्व आहेच. तथापी जनतेची अभिज्ञता केवळ तेवढयावरून काढता येणार नाही, काव्यपरीक्षकांची अभिज्ञता ही वाचकवर्गाच्या किंवा श्रोतृवर्गाच्या आवडीनिवडीची कितपत दर्शक आहे हा प्रश्न उरतोच. ग्रंथांची लोकप्रियता केवळ मध्यस्थांच्या शिफारशीवर अवलंबून असते अशातला भाग नाही. उच्च प्रतीच्या ग्रंथाची योग्यता जनतेस आपोआप समजते आणि परीक्षकांची शिफारस केवळ दुय्यमपणा पावते. जनतेतील सामान्य व्यक्ती स्वत: परीक्षण करून दुसऱ्यास कळविणारी असते. ग्रंथकारांमध्ये ईर्ष्या, असूया, द्वेष इत्यादी भाव असतात हे जनता ओळखते, आणि जेव्हा उत्तम प्रकारच्या ग्रंथकारास इतर ग्रंथकार मत्सराने छळू लागतात तेव्हा जनता छळल्या जाणाऱ्याचे महत्त्व तावडतोब ओळखते. याची उदाहरणे आपणास आजच्या कालात, तशीच प्राचीन कालात देखील देता येतील. तुकारामास वह्या बुडवावयास लावण्याची क्रिया केवळ धंद्यातील मत्सराची दर्शक आहे. पण तीच गोष्ट तुकारामाच्या वाणीत काही तरी नवे तेज आहे; याची तत्कालीन लोकात जाहिरात करती झाली. जनतेच्या परीक्षणात दोष असतात, पण तेच दोष धंदेघाईक टीकाकारांच्या लेखातही असतात. जेव्हा अगदी

अपरिचित प्रकारचे वाङ्मय डोळ्यांसमोर येते तेव्हा जनतेस त्या प्रकारच्या वाङ्मयाची आवड उत्पन्न झाली नसल्यामुळे जनता तिकडे प्रथम लक्ष देत नाही. तसेच टीकालेखकास देखील त्या प्रकारच्या वाङ्मयाची अभिज्ञता उत्पन्न झाली नसल्यामुळे टीकाकार देखील त्या नवीन प्रकाराची निंदाच करतात. या प्रकारच्या गोष्टी आपणास प्रत्येक देशाच्या वाङ्मयाच्या इतिहासात दिसून येतात. उत्तम कवी असून त्याची समकालीनात चहा झाली नाही अशांमध्ये भवभूती कवीचे नाव घेता येईल. तथापि या कवीस उत्तरकाली जे महत्त्व मिळाले त्यावरून समकालीनास रुचले नाही तरी हरकत नाही, आपले वाङ्मयविषयक ध्येय सोडू नये अशा तऱ्हेचा उपदेश हाच कवी अजून सर्व भारतीय कवींस करीत आहे असे म्हणता येईल. जनता उदासीन असली तरी कवीने उदास होऊ नये, ज्यास उच्च प्रकारचे वाङ्मय पाहिजे असेल त्यास दीर्घकालीन आशावादी बनले पाहिजे, या भावनांचा भवभूती फार जुना शिक्षक होय.

महाराष्ट्रीय वाङ्मय राजाश्रयाने वृद्धिंगत न होता केवळ लोकाश्रयाने वृद्धिंगत व्हावयाचे हा महाराष्ट्राला कित्येकांच्या मते शाप लागला आहे; किंवा माझ्या मते महाराष्ट्राला हे वरदान मिळाले आहे. त्याचा पहिला अनुभव महाकवी भवभूती यासच मिळाला आहे. भवभूती हा लोकाश्रयावर अवलंबून राहणारा कवी आणि त्याच्या वाङ्मयविषयक उच्च ध्येयामुळे समकालीनाकडून गौरव होत नाही अशा कचाटीत सापडला असता देखील त्याने संस्कृत भाषेला भूषणास्पद होतील अशी तीन नाटके लिहिली हे लक्षात ठेवले पाहिजे. भवभूती हा वऱ्हाडाचा. विदर्भ देश हा महाराष्ट्रात सर्वात अगोदर सुधारलेला आणि तेथील राजावली देखील फार जुनी, असे असता त्यास राजाश्रय न मिळता आपली नाटके जत्रांच्या ठिकाणी प्रकट करावी

लागली. यावरून त्याची लोकांकडून काही तरी चहा होत असली पाहिजे. नाही तर जत्रांच्या ठिकाणी त्यास आपली नाटके दाखविण्याची संधीच मिळाली नसती. शिवाय जर त्यास त्याच्या काळातच चहाते मिळाले नसते तर त्याची नाटके टिकलीही नसती; पण ती ज्याअर्थी टिकली आहेत त्या अर्थी जनतेस चांगले वाङ्मय टिकविण्याइतके बळ आहे खचित. भवभूतीने लोकांची अनभिज्ञता पाहून जे उद्‌गार काढले आहेत त्याचा अर्थ एवढाच की भवभूतीची अवहेलना दरबारी मंडळीच्याकडून झाली असेल, विदर्भाच्या राजघराण्याने त्यास आश्रय दिला नसेल व राजाश्रयास असलेल्या इतर कवींनी त्यास राजद्वारा-पासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला असेल. भवभूतीच्या कहाणीवरून त्याची लोकात चहा नव्हती असा अर्थ निघत नाही. तेव्हा एकंदरीत जनतेच्या अभिज्ञतेविरुद्ध निकाल देण्यास जडच जाईल. याशिवाय आपणास असेही दिसून येईल की जे चांगले होते तेच टिकले, असा धोपट नियम केला तर त्यास थोडेच अपवाद आढळतील. दिवसानु-दिवस संशोधक नवीन नवीन ग्रंथ शोधून काढीत आहेत. पण अव्वल इंग्रजीच्या कालात जे ग्रंथ लोकात प्रचलित होते तेच ग्रंथ अजूनही लोकप्रिय आहेत आणि संशोधकांनी शोधून काढलेले ग्रंथ छापण्यास मारामार पडते. काव्यसंग्रहाचे ग्रंथ छापावयास किती अडचण पडत होती ते निर्णयसागरने मधून मधून प्रसिद्ध केलेल्या कहाण्यावरून कळून येणार आहे.

सामान्य वाचक आपले परीक्षण पुस्तक घेऊन किंवा टाळून व्यक्त करीत आहे. प्रजासत्तात्मक राज्यात जेव्हा "रेफरँडम" ने म्हणजे सर्व जनतेपुढे कायदा ठेवून कायद्यावर जनतेचे मत घेण्यात येते, तेव्हा जनता "होय" किंवा "नाही" एवढेच उत्तर देते आणि या रीतीने अगदी एका शब्दात आपला निकाल देऊन टाकते. नाटके, सिनेमा,

गाणी याविषयी हाच नियम सांगता येईल. जनता फार टीका करीत नाही, पण ग्रंथकाराचे भवितव्य निश्चयेकरून ठरविते आणि ती त्याप्रमाणे भविष्यकालास आपला आदेश देऊन टाकते. जनतेच्या अभिज्ञतेवर महाराष्ट्राची भिस्त आहे आणि यासाठी सुशिक्षित अभिरुचीचा जनतेत प्रसार होणे अवश्य आहे.

मराठी कवितेस दरबारचा आश्रय नाही आणि त्यामुळे दरबारी आश्रयाचे दुर्गुणही तिला लागले नाहीत. राजांच्या खोटया प्रशस्ती मराठीत नाहीत. जेव्हा दरबारचा आश्रय मराठी कवींना मिळाला तेव्हा त्यांची नीती बिघडून ते देखील खोटे लिहिण्यास कसे प्रवृत्त झाले याला उदाहरण वऱ्हाडच्या देवनाथ कवीचे आहे. हा शिंदे सरकारचे तुकडे खात होता आणि नाना फडणिसाला शिव्या देणारा एक पोवाडा त्याने हिंदीत केला आहे.

शिंद्याने विश्वासघाताने नानाला तुरुंगात टाकले, त्याबद्दल त्याने नानालाच दोष दिला आहे. या प्रकारचे तुरळक उदाहरण सोडून दिले तर मराठी कवी सामान्यत: स्वतंत्रच असत असे दिसून येते. मराठी भाषेला राजाश्रय नाही ही स्थिती भवभूतीच्या कालापासून आहे असे वाटते. ज्ञानेश्वरानंतर हिंदू राज्य गेले त्यावेळेस मराठी कवितेस मुसलमान राजांकडून आश्रय मिळाला नाही यात नवल नाही. मराठी राज्यात कवींच्या उपेक्षेची स्थिती फारशी पालटली नव्हती. या विषयी प्रसिद्ध मोगरे कवीने विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यावर लिहिलेल्या विलापिकेमध्ये जे श्लोकचतुष्टय घातले आहे, त्यातील म्हणणे जरी अक्षरश: खरे नाही तरी तत्त्वत: खरे आहे. ते श्लोक-चतुष्टय येणेप्रमाणे—

**नाही राजाश्रयाचा अनुभव अजुनी लेश ज्या दुर्भगेला**
**जीचा धिःकार बुद्ध्या रसिक जन गणी आजपर्यंत केला**

भेणे जी पंडितांच्या बहुत दिवस जी नीच संगेची राही
शास्त्री ठेवू दिला न क्षणहि पद जिला सोवळ्या ब्राह्मणांही.

जीला पाहुनिया निराश्रित अशी आश्वासली वामने
मोरोपंतचि जीकडे वळवुनी घे पंडितांची मने
तात्यांनी वरिता परत्र दिधले त्वत्तातहस्ती जिला
होता वाटत जीस तातसमची तो कृष्णशास्त्री भला.

जीला शृंगारवीराद्यखिलनवरसा सादरे सेववोनी
होता कालानुसारे तरुण मग अलंकारुनी ग्रंथरत्नी
जीला तूंचि स्वहस्ते रसिकजन गणी योग्य अर्पावयाला
जीच्या आम्ही वऱ्हाडी मुदित परिणया जाहलो यावयाला.

कोणी वैधव्य आले म्हणति जन तुझ्या जीस देहावसानी
विष्णो तूझी परी जी म्हणवुनि भगिनी आपणा धन्य मानी
त्या ज्या धर्मस्वसेचे बहुत पुरविले लाड देवोनि शिक्षा
कैसा तूझा अता ही विरह सहन करी ती महाराष्ट्र भाषा.

या ओळींतील मुख्य चुकीचे विधान आहे ते हे की शृंगारादी नवरसांनी भाषेला मढविण्याचे श्रेय जे विष्णुशास्त्र्यांस दिले आहे ते चुकीचे आहे. वस्तुतः हे श्रेय त्यांच्याकडे नसून वामनादी कवींकडे आहे.

मराठी वाङ्मय प्रारंभापासून लोकाश्रयी होते. त्यास राजदरबारचा फारसा स्पर्श झाला नाही आणि त्याचे परिणाम वाङ्मयाच्या स्वरूपावर दिसून येत आहेत. ज्ञानेश्वर देवगिरी राजधानीपासून फार दूर होता. ज्ञानेश्वराची ख्याती देवगिरीला पोचून त्याचा कदाचित सत्कारही झाला असता पण तसा काळच आला नाही. ज्ञानेश्वरीनंतर देवगिरीचे राज्यच लयाला गेले. ज्ञानेश्वरांविषयी आदर बोपदेवाने आपल्या शुद्धिपत्रात व्यक्त केलाच आहे, (भिंगारकरकृत ज्ञानेश्वर काल पहा) आणि बोपदेव हा तर देवगिरीच्या दरबारात वजनदार मनुष्य होता, व देवगिरीचे

राज्यही टिकले असते तर ज्ञानेश्वराच्या ग्रंथाचा आदर होऊन पुढे मराठी भाषेत झालेल्या ग्रंथास महत्त्व प्राप्त झाले असते. देवगिरीच्या दरबारात ग्रंथाची चहा अगदीच नव्हती असे नाही. चतुर्वर्ग-चिंतामणी या ग्रंथाचा विद्वान कर्ता हेमाद्रि हा तर तेथे प्रधानच होता. आणि बोपदेव हा देखील ग्रंथकार होता. अशा सुशिक्षित राज्यात मराठी ग्रंथांची प्रतिष्ठा वाढलीच असती. तथापि ज्ञानेश्वरांसारख्या मनुष्याला राज-दरबारी झालेल्या मानामुळे ग्रंथरचनेकडे प्रवृत्ती झाली असती असे नाही. मराठी राज्य जरी गेले तरी ज्ञानेश्वरीमुळे मराठी ग्रंथरचनेचा संप्रदाय स्थापन झाला हे खचित. त्याच्या ग्रंथास राजे लोकांनी पुढे आणले नसून लोकांनीच पुढे आणले व राज्य जरी नष्ट झाले तरी ज्ञानेश्वरी टिकली एवढेच नव्हे तर लोकातील मान्यतेने आणि त्यात उत्पन्न झालेल्या भागवत संप्रदायामुळे ग्रंथ जिवंत राहण्याची परंपरा कायम झाली.

महाराष्ट्रीय वाङ्मयाला राजांचा आश्रय असे याला कोणी हालाच्या सप्तशतीचे उदाहरण देतील. पण त्यावरून कवीस राजाश्रय होता असे सिद्ध होणार नाही. कारण हालाची सप्तशती हा संग्रह आहे. त्या लावण्या लिहिणारे कवी निरनिराळ्या काळी होऊन गेले. संग्रह राजाने करविला असेल पण त्यावरून कवीस राजाश्रय होता हे सिद्ध होणार नाही. शातवाहन राजे हे जरी ब्राह्मण होते तरी पुढे त्यांचे लग्न व्यवहार इतर लोकांशी होऊन त्यांच्यामध्ये उच्च संस्कारांचा लोपही झाला असेल. महाराष्ट्रातील राजे लोकांची संस्कृती उच्च दर्जाची कोठेच दिसत नाही. ज्याप्रमाणे तमाशास उत्तेजन देणारा एखादा राजा महाराष्ट्रात आजकालच्या दिवसातही दिसतो, त्याप्रमाणेच त्यावेळेस लावण्याचा शोकी एखादा शातवाहन असला म्हणजे राजे लोकांची कवितेबद्दल अभिरुची दिसून आली असे नाही. तथापि ज्याने

जे केले त्याबद्दल त्याला श्रेय दिले पाहिजे. म्हणून वाङ्मयाविषयी उदासीन राजवर्गात हाल हा एक अपवाद होता असे म्हटले पाहिजे.

मराठी राज्यामध्ये शिवाजीच्या कालात वाङ्मयाला उत्तेजन मिळाले. संभाजीने देखील वाङ्मयास उत्तेजन दिले होते. तथापि एकंदर वाङ्मयास उत्तेजन देण्यात मराठी राज्यात औदासीन्यच आहे. शिवाजी व संभाजी यांनी देखील मराठी काव्यास उत्तेजन दिल्याचा पुरावा फारसा नाही. मराठी राज्य गेले आणि सुधारलेले इंग्रज सरकार आले. त्या सरकारने मराठी भाषेच्या उत्तेजनास अनुकूल अशी स्थिती न ठेवता मराठी भाषेस मारक अशीच परिस्थिती ठेवली आहे.

एवंच मराठी वाङ्मय हे जवळ जवळ पूर्णपणे लोकाश्रयी आहे. त्यामुळे ह्या वाङ्मयास राजाश्रयी वाङ्मयाचे घाणेरडे गुण लागले नाहीत. ज्या अर्थी हे वाङ्मय उत्तरोत्तर लोकाश्रयीच होत जाणार त्या अर्थी वाङ्मयाचे वाचक आणि उत्पादक यांच्यामध्ये असणारे जे परीक्षक त्यांच्यावरील जबाबदारी अधिक वाढली आहे. आणि यामुळे त्यांच्या प्रयत्नाची छाननी करणेही या कालात विशेष आवश्यक आहे. टीकाकारांत प्रामाणिकपणा आणि अभिज्ञता ही देखील वाढत गेली पाहिजे.

* * *

# हरिमय जीवन

* * *

**विनोबा भावे**

आपले रोजचे घडीघडीचे जीवन साधे दिसत असले तरी ते साधे नाही. त्यात महान अर्थ आहे. सर्व जीवन म्हणजे एक महान यज्ञकर्म आहे. तुमची निद्रा म्हणजे ही ती एक समाधी आहे. सर्व भोग ईश्वराला अर्पण करून मग जी निद्रा आपण घेऊ ती समाधीच नसेल तर काय? आपणात अशी रुढी आहे की स्नान करताना पुरुषसूक्त म्हणावयाचे. पुरुषसूक्ताचा स्नानाच्या क्रियेशी असा काय संबंध आहे? संबंध पहाल तर दिसेल. ज्याला हजार हात आहेत, हजार डोळे आहेत, अशा त्या विराट पुरुषाचा माझ्या स्नानाशी काय संबंध? संबंध असा की तू जो लोटा डोक्यावर ओतीत आहेस, त्यात हजारो बिंदू आहेत. ते बिंदू तुझे मस्तक धूत आहेत, निष्पाप करीत आहेत. तो तुझ्या मस्तकावर ईश्वराचा आशीर्वाद आहे. परमेश्वराच्या सहस्र हातातील सहस्रधारा जणू तुझ्यावर वर्षत आहेत. बिंदूंच्या रूपाने परमेश्वरच जणू तुझ्या डोक्यातील मळ दूर करीत आहे. अशी दिव्य भावना त्या स्नानात ओता म्हणजे ते स्नान निराळेच होईल. त्या स्नानात अनंत शक्ती येईल.

कोणतेही कर्म ते परमेश्वराचे आहे, ह्या भावनेने केले तर ते साधेच कर्म पवित्र होते. ही अनुभवाची गोष्ट आहे. आपल्या घरी आलेला ईश्वररूप आहे अशी भावना तर करून पाहा. साधा एखादा

मोठा माणूस घरी आला तरी किती स्वच्छता आपण करतो, कसा सुंदर स्वयंपाक करतो. मग परमेश्वर आहे अशी भावना केलीत तर किती बरे त्या क्रियेत फरक पडेल? कबीर वस्त्रे विणीत असे. तो तल्लीन होऊन जाई.

"**झीनी झीनी झीनी झीनी, बिनी चदरिया**" असे गाणे गात डोले. परमेश्वराच्या पांघरवण्यासाठी जणू तो चादर विणीत आहे. ऋग्वेदातील ऋषी म्हणतो—

"**वस्त्रेव भद्रा सुकृता सुपाणी**" हे माझे स्तोत्र सुंदर हातांनी विणलेल्या वस्त्राप्रमाणे मी ईश्वरास लेववीत आहे. कवीने स्तोत्र करावयाचे ते देवासाठी व विणकऱ्याने वस्त्र करावयाचे तेही देवासाठी. किती हृदयंगम कल्पना! केवढा हृदय विशुद्ध करणारा, हृदय उचंबळविणारा विचार! ही भावना एकदा जीवनात आली म्हणजे जीवन किती निर्मळ होईल! अंधारात वीज आली म्हणजे त्या अंधाराचा एका क्षणात प्रकाश होतो. त्या अंधाराचा हळूहळू का प्रकाश होतो? नाही. एका क्षणात सारे अंतर्बाह्य परिवर्तन. त्याप्रमाणेच प्रत्येक क्रिया ईश्वराशी जोडून दिल्याबरोबर जीवनात एकदम अद्‌भुत शक्ती येते. प्रत्येक क्रिया मग विशुद्ध होऊ लागेल. जीवनात उत्साह संचरेल. आज जीवनात उत्साह आहे कुठे? आपण मरत नाही म्हणून जगत आहोत. उत्साहाचा सर्वत्र दुष्काळ, रडके कलाहीन जिणे. परंतु सर्व क्रिया ईश्वराशी जोडावयाच्या आहेत हा भाव मनात आणा. तुमचे जिणे मग रमणीय व मननीय होईल.

परमेश्वराच्या एका नावाने एकदम परिवर्तन होते यात शंका नको. राम म्हणण्याने काय होणार असे नको म्हणू. म्हणून तर पहा. कल्पना करा की सायंकाळी शेतकरी काम करून घरी येत आहे. वाटेत त्याला कोणी वाटसरू भेटतो. त्याने त्या वाटसराला म्हणावे—

"चाल घरा उभा राहे नारायणा" अरे वाटसरू बंधो, अरे नारायणा, थांब. आता रात्र होत आली. माझ्या घरी चल देवा." त्या शेतकऱ्याच्या तोंडून असे शब्द निघू देत तर खरे. तुमच्या वाटसरूचे रूप बदलते की नाही ते पाहा. तो वाटसरू वाटमाऱ्या असला तरीही पवित्र होईल. हा फरक भावनेने होतो. भावनेत सारे साठवून ठेवलेले आहे. जीवन भावनामय आहे. एक वीस वर्षांचा परका मुलगा घरी येतो. पिता त्याला कन्या देतो. तो मुलगा वीस वर्षांचा असला तरी पन्नास वर्षांचा तो मुलीचा बाप त्याच्या पाया पडतो हे काय आहे? कन्या अर्पण करण्याचे ते कर्मच किती पवित्र आहे! ती ज्याला द्यावयाची तो देवच वाटतो. ही जी भावना जामाताच्या, नवरदेवाच्या बाबतीत तीच भावना आणखी वर न्या, वाढवा.

कोणी म्हणेल ही खोटी कल्पना करण्यात काय अर्थ? खोटी खरी प्रथम नको म्हणून आधी अभ्यास करा, अनुभव घ्या व मग खरे-खोटे कळेल. तो नवरदेव खरोखर परमात्मा आहे अशी शाब्दिक नव्हे तर खरी भावना त्या कन्यादानात असू दे, म्हणजे मग काय फरक पडतो ते दिसून येईल. या पवित्र भावनेने वस्तूचे पूर्वरूप व उत्तररूप यात जमीनअस्मानाचे अंतर पडेल. कुपात्र सुपात्र होईल. दुष्ट सुष्ट होईल. वाल्या कोळ्याचे असेच नाही का झाले? वीणेवर अंगुली फिरत आहे, मुखाने नारायणनाम चालले आहे, आणि मारायला धावलो तरी शांती ढळत नाही, उलट प्रेमपूर्ण नेत्रांनी पाहात आहे. असे दृश्यच वाल्याने कधी पूर्वी पाहिले नव्हते. आपली कुऱ्हाड पाहून पळून जाणारे किंवा अंगावर उलटा हल्ला करणारे दोनच प्रकारचे प्राणी वाल्या कोळ्याने त्या क्षणापर्यंत पाहिले होते; परंतु नारदांनी हल्लाही केला नाही किंवा ते पळूनही गेले नाहीत. ते शांत उभे राहिले. वाल्याची कुऱ्हाड थांबली. नारदांची भुवई हालली नाही. डोळा मिटला नाही. मधुर भजन

चालतेच होते. नारद वाल्याला म्हणाला, "कुऱ्हाड का थांबली?" वाल्या म्हणाला, "तुम्हाला शांत पाहून." नारदांनी वाल्याचे रूपांतर करून टाकले. ते रूपांतर खरे की खोटे?

खरोखर दुष्ट म्हणून कोणी आहे का? याचा निर्णय तरी कोणी करावयाचा? खरोखरचा दुष्ट समोर उभा राहिला तरी तो परमात्मा आहे अशी भावना करा; तो दुष्ट असला तरी तो संत होईल. म्हणतात खोटीच भावना करावयाची? मी म्हणतो कोणाला माहीत तो दुष्टच आहे म्हणून? 'सज्जन लोक स्वतः चांगले असतात म्हणून त्यांना सारे चांगलेच दिसते, वास्तविक तसे नसते' असे कोणी म्हणतात. मग काय तुला जे दिसते ते खरे मानावयाचे? सृष्टीचे सम्यक ज्ञान व्हावयाचे साधन जणू दुष्टाच्याच तेवढे हातात आहे! सृष्टी चांगली आहे; पण तू दुष्ट म्हणून तुला ती दुष्ट दिसते; असे का म्हणू नये? अरे, सृष्टी म्हणजे आरसा आहे. तू जसा असशील तसा या समोरच्या सृष्टीत उमटून दिसशील. आपली जशी दृष्टी तसे सृष्टीचे रूप. यासाठी सृष्टी चांगली आहे, पवित्र आहे, अशी कल्पना करा. साध्या क्रियेतही ही भावना ओता. मग काय चमत्कार होतो तो दिसेल. भगवंतांना हेच सांगावयाचे आहे—

> **"जे खासी होमिसी देसी जे जे आचरिसी तप**
> **जे काही करिशी कर्म ते करी मज अर्पण."**

जे जे काही करशील ते सारे जसेच्या तसे भगवंतास दे.

आमची आई लहानपणी एक गोष्ट सांगत असे. ती गोष्ट गमतीची आहे, परंतु तिच्यातील रहस्य मोलाचे आहे. एक होती बाई. तिचे आपले ठरलेले होते की जे काही होईल ते कृष्णार्पण करावयाचे. उष्टयाला शेण लावून तो शेणगोळा तिने बाहेर फेकावा व कृष्णार्पण म्हणावे. लगेच तो शेणगोळा तेथून उठे व मंदिरातील मूर्तीच्या तोंडावर जाऊन

बसे, तो पुजारी मूर्तीला घासून घासून दमला. परंतु करणार काय ? शेवटी कळले की हा महिमा त्या बाईचा आहे. ती जिवंत आहे तोपर्यंत मूर्ती साफ व्हावयाची नाही. एक दिवस बाई आजारी पडली. मरणाचा शेवटचा क्षण जवळ आला. तिने मरणही कृष्णार्पण केले. त्या क्षणी देवळात मूर्तीचे तुकडे झाले. मूर्ती भंगून पडली. वरून विमान आले बाईला नेण्यासाठी, तिने विमानही कृष्णार्पण केले. विमान मंदिरावर ताडकन जाऊन आपटले व त्याचेही तुकडे झाले. स्वर्ग श्रीकृष्णाच्या ध्यानापुढे कुचकामाचा आहे.

सारांश काय, की जे जे बरे वाईट कर्म हातून घडले, ते ते ईश्वरार्पण केल्याने त्या कर्मात काही निराळेच सामर्थ्य उत्पन्न होते. ज्वारीचा पिवळसर लालसर दाणा असतो. परंतु तो भाजला तर किती सुंदर लाही होते ! पांढरी स्वच्छ, अष्टकोनी, परीटघडी करून आणलेली ती डौलदार लाही त्या दाण्याजवळ ठेवा पाहू. किती फरक ! परंतु त्या दाण्याचीच ती लाही यात संशय नाही. हा फरक एका अग्नीमुळे झाला. तसेच तो टणक दाणा जात्यात घालून भरडा, त्याचे मऊ मऊ पीठ होईल. अग्नीच्या संपर्काने लाही झाली, जात्यात घातल्याने मऊ पीठ झाले. त्याप्रमाणेच आपल्या लहानशा क्रियेवर हरिस्मरणाचा संस्कार करा की ती क्रिया अपूर्व होईल. भावनेने मोल वाढते. ते रद्दी जास्वंदीचे फूल, तो बेलाचा पाला, ती तुळशीची मंजरी, ती दुरव, त्यांना तुच्छ मानू नका.

**“ तुका म्हणे चवी आले ।**
**जे का मिश्रित विठ्ठले ॥ ”**

प्रत्येक गोष्टीत परमात्मा मिसळा व मग अनुभव घ्या. ह्या विठ्ठलाच्या मसाल्याच्या तोडीचा दुसरा आहे का कोठला मसाला ? ह्या दिव्य मसाल्यापुढे दुसरे कोणते आणाल ? ईश्वराचा मसाला प्रत्येक क्रियेत घाला, म्हणजे सारे रुचकर व सुंदर होईल.

रात्री आठ वाजता देवळात आरती चाललेली असावी, गंध सुटला आहे, धूप जळतो आहे, दिवे लावले आहेत, आरती ओवाळली जात आहे, अशा वेळेस खरोखरच आपण परमात्मा पाहात आहोत अशी भावना होते. देव दिवसभर जागला, आता निजावयाचा.

"**आता स्वामी सुखे निद्रा करा गोपाळा**" असे भक्त म्हणू लागतात. शंका घेणारा विचारतो, "देव का कोठे झोपतो ?" अरे देवाला काय नाही ? मुर्खा, देव झोपणार नाही, जागणार नाही, तर काय दगड झोपणार व जागणार ? अरे देवच जागतो, देवच निजतो व देवच खातो पितो. तुलसीदासजी सकाळच्या वेळी देवाला विनवीत आहेत—

"**जागिये रघुनाथ कुंवर पंछी बन बोले**" आपल्या बंधुभगिनींना, नारीनरांना, रामचंद्रांच्या मूर्ती कल्पून ते म्हणत आहेत, "माझ्या राम-रायांनो, उठा आता." किती सुंदर विचार! नाही तर बोर्डिंग असावे, तेथे मुलांना उठवताना 'उठलोस की नाही' असे दरडावून विचारतात. प्रात:काळची मंगल वेळ, त्या वेळेस कठोर वाणी शोभते का ? विश्वा-मित्राच्या आश्रमात रामचंद्र निजलेले आहेत, विश्वामित्र त्यांना उठवीत आहेत, वाल्मिकी रामायणात वर्णन आहे—

"**रामेति मधुरां वाणी विश्वामित्रोऽभ्यभाषत ।**
**उत्तिष्ठ नरशार्दूल पूर्वा संध्या प्रवर्तते ।।**"

"रामा वत्सा, ऊठ आता." अशी गोड हाक विश्वामित्र मारीत आहेत. किती गोड आहे हे कर्म. आणि बोर्डिंगातले ते उठवणे किती कर्कश ! त्या झोपेत असलेल्या मुलाला वाटते की कोणी सात जन्माचा वैरीच जणू उठवावयाला आला आहे. आधी हळू हाक मारा, मग जरा मोठ्याने; परंतु कर्कशता, कठोरता नको. उठला नाही तर पुन्हा दहा मिनिटांनी जा.

आज नाही उठला तर उद्या उठेल अशी आशा करा. त्याने उठावे म्हणून गोड गाणे, भूपाळी, श्लोक, स्तोत्रे म्हणा. उठवण्याची एक साधी क्रिया, परंतु ती किती काव्यमय, सहृदय व सुंदर करता येईल ! जणू देवालाच उठवावयाचे आहे. परमेश्वराच्या मूर्तीलाच हलके जागे करावयाचे आहे. झोपेतून कसे उठवावे तेही एक शास्त्र आहे.

सर्व व्यवहारात ही कल्पना आणा. शिक्षणशास्त्रात तर या कल्पनेची फारच आवश्यकता आहे. मुले म्हणजे प्रभुच्या मूर्ती. या देवांची मी सेवा करून राहिलो आहे अशी गुरूची भावना असावी. मग तो मुलाला "जा घरी, चालता हो, उभा रहा तासभर, हात पुढे कर, किती मळला सदरा, शेंबूड किती नाकाला," असे म्हणणार नाही. तो मुलाचे नाक हळू हाताने साफ करील, त्याचे मळके कपडे धुईल, फाटके शिवील. शिक्षक असे करील तर त्याचा केवढा परिणाम होईल! मारून का कोठे परिणाम होतो ? मुलांनी सुद्धा याच दिव्य भावनेने गुरूकडे पाहावे. गुरूने या हरिमूर्ती आहेत आणि मुलांनी ही हरिमूर्ती आहे, असे परस्पर भावून जर वर्तणूक ठेवली तर विद्या तेजस्वी होईल. मुलेही देव व गुरूही देव. हा गुरू म्हणजे शंकराची मूर्ती आहे, त्याच्याजवळून आपण बोधामृत घेत आहोत, त्याची सेवा करून ज्ञान घेत आहोत, अशी मुलांची कल्पना झाली तर मग मुले कशी वागतील!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३६८५० वि: ...
क्रमांक २५१० नो. दि. ५५५६८.

# कुमार आणि साहित्य

* * *

**प्रल्हाद केशव अत्रे**

"कुमारांनो, तुम्ही सारे आलात, या बसा ! मोठ्या आनंदाने मी तुमचे स्वागत करतो. भाषेच्या प्रेमाने तुम्ही येथे आलात, खरे ना ? साहित्याच्या वेडाने तुम्हाला येथे ओढून आणले आहे, नव्हे का ? आपल्या जीवनाचा विकास व्हावा, आपले आयुष्य सुंदर व्हावे, आपला समाज बलवान व्हावा, आपला देश महान व्हावा, अशी तळमळ तुम्हाला वाटते म्हणून तुम्ही तातडीने या ठिकाणी आलात ना ? तुमची मने मी जाणतो, तुमची वदने मी ओळखतो. तुमचा उत्साह या क्षणी तुमच्या डोळ्यात नाचतो आहे. तुमची उत्कटता तुमच्या गालावर थरथरते आहे. तुमचा आनंद तुमच्या ओठी या दोन्ही कोपऱ्यामधून उचंबळतो आहे. तुमची तोंडे झऱ्यासारखी आहेत. अगदी स्वच्छ आणि निवळशंख झऱ्याचा तळ जसा वरून दिसतो तशी तुमची शुद्ध मने तुमच्या स्फटिकासारख्या चेहऱ्यांतून मला स्पष्ट दिसत आहेत. तुम्हाला आपल्या भावना लपविता येत नाहीत. तुम्हाला आपले मनातले आणि जीवनातले काहीच लपविता येत नाही. आत एक आणि बाहेर दुसरे असा दुहेरीपणा किंवा दुटप्पीपणा तुमच्या आयुष्यात. नाही ते कसब आम्हा मोठ्या माणसाच्या हाती असते. आमच्या चेहऱ्यावरून आमच्या अंत:करणाचा थांगपत्ता लागावयाचा नाही. तसे तुमचे नाही. उगवतीच्या उंबऱ्यावर अरुणासारखे तुम्ही उभे आहात. हलूहलू उगवता आहात, तुमचे तेज प्रगट होऊ लागले आहे, तुमचा प्रकाश वाढू लागला आहे. खाली हिरवेगार जग आणि वर

निळेभोर जीवन तुमच्यासमोर पसरले आहे. तुमच्या कर्तृत्वाला दहाही दिशा मोकळ्या आहेत. पराक्रमाची सारी पठारे तुमच्यासमोर उभी आहेत. तुम्हाला कोठेही अटकाव नाही, तुम्हाला कशाचा प्रतिबंध नाही. तुम्ही वाटेल ते पहाड चढा. तुम्ही वाटेल ती मैदाने ओलांडा. तुम्ही वाटेल ते सागर तरंगा किंवा वाटेल ती गगने उल्लंघा. जीवन तुमचे आहे. भविष्यकाळ तुमचा आहे. जग प्रकाशमान करण्याचे तेज तुमच्याजवळ आहे. झोपी गेलेली सृष्टी जागी करण्याचे चैतन्य तुमच्यापाशी आहे. मानवतेचे हे विशाल घर देवाच्या मंदिरासारखे सुंदर आणि पवित्र बनविण्याचे धैर्य आणि सामर्थ्य तुमच्यामध्ये आहे. खरोखरच, धन्य आहात तुम्ही कुमार ! भाग्यशाली आहात तुम्ही तरुण ! तुमच्या निष्पाप आणि निर्मळ मनात अन् प्रफुल्लित देहात देव वस्ती करतात. सुकलेली मने आणि सुरकुतलेली शरीरे देवांना आवडत नाहीत. देव म्हाताऱ्याच्या कधी वाऱ्यालाही उभे राहत नाहीत. म्हणूनच म्हातारे देवांच्या नावाने सकाळ–संध्याकाळ हाका मारीत सुटलेले असतात ! देव हे सदैव तरुण असतात. म्हणूनच तरुणांच्या अंगात दैवी शक्ती संचार करीत असते. तरुण हेच जगाचा खरा आधार आहेत. तरुण हेच जगाचा खरा उद्धार आहेत. आजच्या जगाला तरुणांची फार जरूरी आहे. जग हे मुळात सुंदर आणि पवित्र आहे. विधात्याची ही सर्वांगसुंदर कलाकृतीच होय. ती कुरूप आणि अमंगळ कशी असू शकेल ? पण सत्तेची आणि संपत्तीची हाव असलेल्या पिसाटांनी या जगातल्या साऱ्या सद्गुणांची आणि सौंदर्याची राखरांगोळी करून टाकली आहे. म्हणून रक्तबंबाळ झालेल्या आणि माथेफिरू बनलेल्या या सुंदर आणि पवित्र जगाचा जीर्णोद्धार करण्याची जबाबदारी आता तुमच्यासारख्या जवानांवर आहे. तुमची मने निर्मळ आहेत. तुमची हृदये निष्पाप आहेत. तुम्हीच हे महान कार्य करू शकाल.

तुम्हा तरुण मुलांच्या या आनंदी मेळाव्यात मला आज बसावयाला मिळते आहे, तुमच्याशी मनमोकळेपणाने बोलावयाला सापडते आहे, हे मी माझे भाग्यच समजतो. फुलांच्या संगतीने मातीदेखील सुवासिक बनते, तसेच मुलांच्या सहवासाने मोठयांनाहि तारुण्य लाभते. चैतन्याचे एवढे मोठे सरोवर समोर उचंबळत असता कोणाला आपल्या वयाचा विसर पडणार नाही ? कोणता वृद्ध आणि कोणता प्रौढ मुलांपेक्षाही मूल बनणार नाही ? तारुण्य हे साथीच्या रोगासारखे आहे. त्याचा संसर्ग झाला की, लगेच त्याची बाधा होते. प्रौढांना ती विशेषच होते. तसे आज मला झाले आहे. कुमारांनो ! तुमच्या संगतीत मी माझे वय आणि आकार पार विसरून गेलो आहे. तसे पाहिले तर मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये मी अनेक वर्षे वावरलो आहे. कित्येक वर्षे मी मुलांना शिकविलेले आहे. पण खरे सांगतो, असे प्रसन्न आणि प्रफुल्ल वातावरण शाळेमध्ये क्वचितच पाहावयाला मिळते. शाळेच्या चार भिंतीतील जग कृत्रिम असते. एखाद्या डबक्यात पाणी जसे साचावे, तसे शाळेतील जीवन साचलेले असते. आपला देश स्वतंत्र झाला आहे. स्वतंत्र भारतामधल्या साऱ्या शाळा लवकरच आता स्वातंत्र्याच्या फुलबागा बनतील. विद्येचे तेजस्वी ताटवे तेथे बहरू लागतील, ज्ञानाचा नवीन सुगंध तेथे दरवळू लागेल. पौरुषाचे स्फूर्तिदायक गीतस्वर तेथे निनादू लागतील. कर्तृत्वाची उंच उंच कारंजी तेथे उचंबळताना दिसतील. आणि जगाला दिपवणारी भारतीय तरुणांची नवीन पराक्रमी पिढी या नव्या विद्यामंदिरातून जन्माला येईल. स्वतंत्र भारतातील कुमारांच्या भाग्यशाली भविष्याचे हे मनोहर चित्र आताच माझ्या डोळ्यांसमोर नाचते आहे, आणि खरे सांगू कुमारांनो, 'आपला देश स्वतंत्र झाला आहे' हा एकच विचार आणि हे एकच पालुपद गेले चार महिने माझ्या मनात एकसारखे घोळते आहे. तुमच्याहि मनात तोच

विचार चाललेला आहे, हे मला तुमच्या चेहऱ्यावरून दिसत आहे. आपल्या सर्वांच्याच मनात सध्या स्वातंत्र्याखेरीज दुसरा विचारच नाही. आणि कसा असणार? स्वातंत्र्य ही काय एक साधी गोष्ट आहे की, ती ज्या दिवशी आपल्याला मिळाली त्याच दिवशी फक्त आपण तिचा उत्सव करावयाचा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ती साफ विसरून जाऊन नेहमीप्रमाणे आपल्या कामाला लागावयाचे? पंधरा ऑगस्टच्या दिवशी गगनभेदी जयजयकाराने साऱ्या देशात स्वातंत्र्याचे आपण स्वागत केले म्हणजे स्वातंत्र्याबद्दलचे आपले सारे कर्तव्य संपले, आता पुढल्या वर्षी पुन्हा स्वातंत्र्यदिन उगवेपर्यंत स्वातंत्र्याचा आणि आपला काही संबंध नाही, असा त्याचा थोडाच अर्थ आहे?

स्वातंत्र्य हा या देशातील कोटयवधी लोकांचा दीड शतकाचा निदिध्यास आहे. स्वातंत्र्य हे या देशातील अनेक कवींचे, कलावंतांचे आणि लेखकांचे प्यारे स्वप्न आहे. स्वातंत्र्य ही या देशातील शेकडो स्वातंत्र्यवीरांची आणि हुतात्म्यांची कठोर तपश्चर्या आहे. या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी गेल्या शंभर वर्षांत अनेक शूरांनी आपल्या रक्ताचे पाट वाहविले आणि प्राणांचे अर्घ्य दिले आहे. अनेकांनी आपल्या छातीवर बंदुकीच्या गोळ्या आनंदाने झेलल्या आहेत. अनेकांनी आपली मुंडकी हसत हसत फासाच्या दोरीवर टांगली आहेत. हे स्वातंत्र्य मिळविण्याकरिता काळ्या पाण्याच्या भयंकर नरकात अनेक झुंजार वीर सडून मेले आहेत. तुरुंगाच्या भिंतीवर आणि गजावर अनेकांनी आपली डोकी आपटून प्राण दिले आहेत. अनेकांनी या स्वातंत्र्यासाठी आपल्या घरादारांची आणि प्राणांची राखरांगोळी केली आहे. अनेकांना हा आपला मायदेश सोडून कायमचे परागंदा व्हावे लागले आहे आणि दुसऱ्या कुठल्या तरी देशात एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे लपत छपत आणि एखाद्या भणंग भिकाऱ्याप्रमाणे भीक मागत

जीवन जगावे लागले आहे. हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आजपर्यंत या राष्ट्राने किती रक्त आणि अश्रू गाळले असतील त्याला खरोखरच सीमा नाही. स्वातंत्र्याची ही देवता अशी दुराराध्य आहे की, तिला प्रसन्न करण्यासाठी जेवढे बलिदान करावे आणि जेवढ्या आहुती द्याव्यात तेवढ्या थोड्याच ठरतात. अगदी शेवटच्या क्षणी नाही का तिने या महान राष्ट्राच्या अखंडत्वाचा देखील बळी देऊन टाकला! कालीदेवीच्या भक्ताने तिला प्रसन्न करण्यासाठी आपले शिरकमल कापून तिच्या चरणी वहावे, तसे तिला कापून दिले. देशाच्या या स्वातंत्र्ययुद्धात मोठ्यांच्या खांद्याला खांदा लावून शेकडो तरुणांनी आणि कुमारांनी अलौकिक पराक्रम गाजविले आणि आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या. राष्ट्राच्या नेत्यांनी जेव्हा जेव्हा महत्वाचे राजकीय संदेश देशाला दिले तेव्हा तेव्हा ते झेलण्यासाठी या देशातील सहस्रावधी तरुण विद्यार्थी सर्वांच्या आधी पुढे धावले. पोलिसांचा लाठीमार त्यांनी खाल्ला, चाबकांचे फटके त्यांनी सहन केले, बंदुकीच्या गोळ्यांना ते भ्याले नाहीत. नंदुरबारच्या कुमार हुतात्म्यांनी तर बंदुकीच्या गोळ्या आपल्या छातीवर झेलून चिमुकल्या देहांच्या चिंधड्या उडू दिल्या, पण हातातला राष्ट्रध्वज खाली पडू दिला नाही. अशा तऱ्हेने गेल्या चाळीस वर्षांत देशातल्या तरुणांनी आपल्या रक्ताची सतत धार ओतून या महान त्यागयज्ञाच्या ज्वाला एकसारख्या पेटत ठेवल्या, म्हणून पंधरा ऑगस्टच्या मुहूर्तावर स्वातंत्र्याची देवता त्यामधून प्रगट झाली. दीडशे वर्षांच्या गुलामगिरीच्या लोखंडी बेड्या आपल्या मातृभूमीच्या हातातून खळखळ निखळून खाली पडताना ज्यांनी पाहिल्या ते तुम्ही तरुण आणि कुमार धन्य आहात!

कुमारांनो, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले हे खरे, पण स्वातंत्र्याचा संभाळ कसा करावयाचा आणि जनता सुखी, समृद्ध अन् बलवान कशी

करावयाची, याखेरीज दुसऱ्या कशाचेही चिंतन तुम्ही करता कामा नये. वृद्धापासून कुमारापर्यंत प्रत्येकाने या एकाच गोष्टीचा ध्यास घेतला पाहिजे. देशातल्या सर्व तरुणांनी आणि कुमारांनी बलाची उपासना केली पाहिजे. आणि जगातील सर्व आधुनिक विद्या आणि कला हस्तगत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. विद्येच्या आणि कर्तृत्वाच्या प्रत्येक क्षेत्रात भारताचे नाव त्रिखंडात गाजले पाहिजे. असा तरुणांनी आपल्या मनाशी प्रखर निर्धार केला पाहिजे. देशातल्या सर्व बुद्धिमंतांनी आणि शक्तिमंतांनी आपले ज्ञान आणि बळ एकवटून निकराचा आणि निर्वाणीचा प्रयत्न केला, तर जगातील हे एक अत्यंत प्राचीन आणि थोर राष्ट्र पंचवीस वर्षांच्या आत अर्वाचीन जगामधले एक सामर्थ्यवान आणि श्रेष्ठ राष्ट्र झाल्यावाचून राहणार नाही. एक नवीन संस्कृती आणि एक नवीन समाज आपल्याला निर्माण करून दाखवावयाचा आहे. पाश्चात्त्यांजवळ बुद्धी आहे, पण हृदय नाही. किंबहुना दिवसेंदिवस ते जास्त भावनाशून्य आणि क्रूर होत चालले आहेत. भारताजवळ हृदय आहे, पण त्याची बुद्धी सुप्त आणि सुस्त झाली आहे. म्हणून भारताचे हृदय आणि पाश्चिमात्त्यांची बुद्धी जी कोणती संस्कृती आत्मसात करील, तीच जगाचे तारण करण्यास शेवटी समर्थ ठरेल.

परदेशच्या लोकांना आश्चर्य वाटते की, एवढे तीस कोटी लोक या देशात असून हा देश इतकी वर्षे अज्ञानात आणि दास्यात कसा ? पण त्यांना हे ठाऊक नाही की, कोटयवधी जनता विस्कळीत पडलेली आहे. प्रेमाच्या आणि आपुलकीच्या पाशांनी ती अद्यापि करकचून बांधली गेलेली नाही. या देशात कोणालाही कोणाबद्दल सहानुभूती वाटत नाही. दुसऱ्याचे दुःख पाहून आपल्या डोळ्यात अश्रूच मुळी येत नाहीत. समाजातला अन्याय पाहून आपल्याला मुळी चीडच येत नाही.

दुर्बलांवर होणारे अमानुष अत्याचार बघून आपले डोके संतापाने मुळी फिरूनच जात नाही. दीडशे वर्षांच्या गुलामगिरीमुळे आपण नराचे वानर बनलो आहोत. आपल्यातली माणुसकी नष्ट झाली आहे. ती माणुसकी आपण आपल्यामध्ये उत्पन्न करू या. आता आपण स्वतंत्र झालेलो आहोत. तेव्हा आधी आपण "नर" होऊ मग "नारायण" होण्याचा प्रयत्न करू. नर व्हायचे म्हणजे नराच्या अंगी लागणारे बल, तेज, पौरुष, पराक्रम, धैर्य, स्वाभिमान, प्रेम, क्रोध इत्यादी सर्व गुणांचे आपण आपल्यामध्ये संवर्धन करावयाला हवे. पण ही सर्व गुणमौक्तिके अंतःकरणामधून सहानुभूतीचे पाझर झिरपत असतील तरच पाणीदार दिसतील. सहानुभूती हीच खरी माणुसकीची कसोटी आहे. सहानुभूतीवाचून पौरुष आणि पराक्रम पांगळे पडतील. आज आपल्या राष्ट्रात जर कोणत्या एका भावनेची जास्त जरूरी असेल, तर ती सहानुभूतीची. सहानुभूतीचे सागराच्या सागर रिते पडतील एवढी आपल्या समाजात दुःखे आणि दैन्ये भरलेली आहेत. राष्ट्रातील आणि समाजातील सर्व लोकांच्या सुखदुःखांशी समरस होता येणे याचेच नाव सहानुभूती. गरिबाची दुःखे बघून ज्याचे डोळे भरून येतात, अनाथ–अपंग–अस्पृश्य यांच्या यमयातना बघून ज्याची आतडी तटातट तुटतात आणि अन्याय अन् जुलूम पाहताच ज्याच्या मस्तकात संतापाची तिडीक उठते, तोच गाऊ शकेल, लिहू शकेल आणि रंगवू शकेल. सहानुभूती ही चांगुलपणाची लेक आहे. नारळाच्या शहाळ्यात जसे थंडगार आणि मधुर पाणी भरलेले असते, तसा हृदयात चांगुलपणा तुडुंब भरलेला असला पाहिजे. उत्तम लेखकाला किंवा कलावंताला प्रतिभेपेक्षा चांगुलपणाची अधिक आवश्यकता आहे. हृदयात चांगुलपणा असल्यावाचून मानवतेबद्दल प्रेम वाटणार नाही. तिच्या कल्याणाबद्दल कळकळ वाटणार नाही. दुष्ट माणूस, स्वार्थी माणूस, क्षुद्र

माणूस, घमेंडखोर माणूस हा कधीही उत्तम लेखक किंवा कलावंत होऊ शकणार नाही. म्हणून कुमारांनो, तुम्ही आधी चांगली माणसे व्हा! राष्ट्राला तुमच्या लेखनापेक्षा तुमच्या चांगुलपणाची जास्त जरूरी आहे. लेखक ही काही वेठ नाही. ती एक ऊर्मी आहे. तो एक नाद आहे. अंतःकरणात माणुसकीची वेल रसरसून फुलू लागली, म्हणजे प्रतिभेची सुंदर फुले तिच्यावर आपोआप उमलू लागतात. नागरमोथ्याच्या बेटातून वाहणाऱ्या ओहोळाच्या पाण्याला जसा सुगंध असतो, तसे सौजन्याचे आणि सद्भावनेचे मळे ज्या अंतःकरणात फुललेले आहेत, त्यांतून येणारे सारे वाङ्मय सुंदर आणि सुवासिक असते.

नरसिंह चिंतामण केळकर म्हणत की, 'पाण्यात लहानसा खडा टाकला म्हणजे एकामागून एक आणि एकापेक्षा एक मोठी अशी जशी वर्तुळे उठतात, तशी विचारांची आणि भावनेची वर्तुळे वाङ्मयामुळे आपल्या मनात उमटली पाहिजेत. एकामागून एक, एकापेक्षा एक मोठी, एवढी मोठी की, शेवटी विश्वाच्या वर्तुळात ती विलीन झाली पाहिजेत. व्यक्तीचा आणि विश्वाचा जे समन्वय घडविते ते वाङ्मय'. उत्तम वाङ्मय मनाला जागे करते, मनाला चेतना देते, मनाला प्रेरणा देते. मनाला आभाळात घेऊन जाते. अचाट सामर्थ्याची आणि पराक्रमाची कामे करण्याची मनात इच्छा उत्पन्न करते. वाल्मीकीने रामाच्या हातून रामायण घडवून आणले. शिवरायाच्या वेळी आगिनदास शाहिराने महाराष्ट्राला जागे केले.

आपल्या बुद्धीचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून कुमारांनी आणि तरुणांनी आधी चरित्रवाङ्मयावर धाड घालावी, जगातल्या यच्चयावत महापुरुषांची चरित्रे वाचण्याचा तुम्ही सपाटा सुरू करा. सर्व वाङ्मय-प्रकारात चरित्र हाच उत्कृष्ट प्रकार आहे. गेल्या

शंभर वर्षांत या भारतात जे जे महान क्रांतिकारक होऊन गेले त्यांची चरित्रे अभ्यासा. सत्तावन सालच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धात लढलेल्या वीरांची चरित्रे आणि पराक्रम वाचून हर्षाचे रोमांच अंगावर उभे राहतात. देशाला स्वातंत्र्य मिळावे या तळमळीने बलाढ्य ब्रिटिश राजसत्तेला बंडाचे आव्हान देणाऱ्या वीर वासुदेव बळवंत फडक्यांचे लोकोत्तर धैर्य बघून बुद्धी थक्क होते ! "हे हिंदुस्थानवासी लोक हो, मी जे काही केले ते देशप्रेमाने केले. मला तुमच्यासाठी जे करावयाचे होते, ते मला दुर्दैवाने करता आले नाही. मला क्षमा करा !" हा काळेपाण्याची शिक्षा मिळण्यापूर्वी वासुदेव बळवंतांनी देशाचा घेतलेला हृदयद्रावक निरोप ऐकून आतड्यांना अक्षरशः पीळ पडतो. लोकमान्य टिळक, वीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची अलौकिक पराक्रमाची आणि त्यागाची चरित्रे वाचून मुडदेदेखील मुठी वळवून आपल्या गर्तेमधून उठून उभे राहतील !

खरोखरच धन्य आहे हा भारतदेश ! या देशात हिमालयाएवढे त्याग आणि पराक्रम करणारे हुतात्मेदेखील होऊन गेलेले आहेत. त्यांची दैदीप्यमान चरित्रे वाचून त्यांच्या जळजळीत स्फूर्तीने तुम्ही आपली डोकी आणि हृदये तुडुंब भरून घ्या. आणि आपल्या विचारात, आचारात, आणि जीवनात ओज अन् तेज निर्माण करा. मग वाङ्मय लोटांगण घालीत तुमच्या पायाशी येऊन पडेल. काहीतरी दिव्य आणि भव्य करण्याचा प्रयत्न करा. कोंबाचा वृक्ष व्हावा, थेंबाचे तळे व्हावे, बिंदूचा सिंधू व्हावा आणि हिमकणाचा हिमालय व्हावा, असे महान संकल्प मनात धरा. तुम्ही निश्चित यशस्वी व्हाल !

★ ★ ★

# शाहिरी काव्य

* * *

गजानन त्र्यंबक माडखोलकर

शाहिरांनी नुसते पोवाडे आणि लावण्या लिहिल्या, प्रौढ किंवा प्रदीर्घ रचनेच्या फंदात ते कधी पडले नाहीत, यात अस्वाभाविक असे काहीच नाही. मानवी मनाला तीव्रतेने आकळणारे जर कोणते रस असतील तर ते वीर आणि शृंगार हे दोनच होत; व वीर–चरित आचरण्याची धमक जरी थोडयांच्याच ठिकाणी असली तरी ते ऐकण्याची आवड प्राय: प्रत्येकाला असते. शिवाय वीर आणि शृंगार हे रस जरी दिसावयाला भिन्न असले तरी एकाच पौरुष गुणाचे ते दोन प्रकार आहेत; आणि त्या दृष्टीने पाहिले तर, मराठे वीरांच्या पराक्रमाचे पोवाडे ज्यांनी गाइले त्यांनीच महाराष्ट्रसुंदरीच्या केलि–कौतुकाची गुंफण लावण्यातून करावी, यात औचित्य नाही असे कोण म्हणेल? कारण वीर रसाचा उत्कर्ष जसा रणांगणावर होतो, तशी शृंगाराची खुलावट रंगमहालात होते. महाराष्ट्राच्या तत्कालीन आयुष्यातही या दोनच रसांचा प्रादुर्भाव अतिशय झालेला दृष्टीस पडतो. मराठयांच्या भावनांवर जिने दोन–तीन शतके फाजील प्रभुत्व गाजविले, ती भक्ती आणि वेदान्त यांची दुक्कल यावेळी मागे पडली होती. तथापि, पूर ओसरला तरी दलदल मागे राहते या अनुभवाला अनुसरून, वैराग्याचा पोकळ उपदेश शाहिरांच्या कवनातून चालूच होता. पण उपदेश करणारांनी जसा तो चुकूनही आचरला नाही, तसाच ऐकणारांनीही कधी मनावर घेतला नाही! मोहिमेवर असताना मुलूखगिरीचे नवे नवे बेत योजून

ते तडफेने तडीला न्यावे, आणि आगोटीच्या सुमारास घरी परतल्यावर आवरून धरलेल्या वासनांचे कोड यथेच्छ पुरवावे, असा तत्कालीन कर्तबगार महाराष्ट्राचा आयुष्यक्रम होता. या आयुष्यक्रमाचे वर्णन शाहिरांनी आपल्या कवनांतून फारच प्रामाणिकपणाने केले आहे. त्यात कल्पनेचा भडक रंग भरलेला नाही, निदान नसावा, असे त्या वेळच्या कागदपत्रांवरून तरी स्पष्ट दिसते. शिवाय लावण्यांतून जो शृंगार वर्णन केला आहे तो गृहस्थीबाण्याचा, घरगुती, शिष्ट–शृंगार नव्हे; लष्करी खाक्याच्या, अक्कडबाज शिलेदारांच्या उनाड इष्काची चटोर लज्जत लावण्यांतून भरलेली आहे. त्याबद्दल दोष द्यावयाचा झाला तर तो तत्कालीन दरबारी व लौकिक अभिरुचीला द्यावा लागेल. एकटे शाहीरच त्या पापाचे धनी होऊ शकत नाहीत.

शाहिरांचे लावण्या–पोवाडे हीच काय ती महाराष्ट्राची ऐतिहासिक व राष्ट्रीय कविता होय. वस्तुतः या शाहिरी कवितेला ऐतिहासिक व राष्ट्रीय म्हणणे बरोबर नाही. कारण शुद्ध ऐतिहासिक व राष्ट्रीय कविता ही शाहिरी कवितेहून पुष्कळच वेगळी पडते. प्राचीन मराठी काव्य-वाङ्मयात शुद्ध ऐतिहासिक किंवा राष्ट्रीय कविता इतकी थोडी आहे की, या शाहिरी लिखाणालाच आज ऐतिहासिक व राष्ट्रीय म्हणून निर्वाह करावा लागतो. शुद्ध इतिहास किंवा राष्ट्रीय भावना यांना शाहिरी कवितेत स्थान मिळतेच असे नाही. किंबहुना, निव्वळ लोकचरितापेक्षा लोकक्षोभ वर्णन करण्याकडेच शाहिरांचा कल अधिक असतो; मग तो क्षोभ कशाही प्रकारचा असो आणि म्हणून राष्ट्रीय उलाढालींच्या कोणत्याही काळात, लोकक्षोभाच्या उसळत्या लाटांवर शाहिरी कवनांचा दाट फेस फुटून पसरताना दृष्टीस पडतो. बाजारात, चवाठ्यावर, राजदरबारी, उत्सवांच्या जागी, रस्त्यातील गर्दीमध्ये, लष्कराच्या तळावर, जिथे जिथे म्हणून कंड्या पिकतात व पसरतात

तिथे तिथे प्राय: शाहिरी कवितेची पैदास होते. व ज्या ठिकाणी शाहिरी कवितेची उत्पत्ती होते तेथील गावगप्पांचा रंग तिजवर हटकून चढतो. शाहिरी कवन हे उत्तान, आतुर व भेदक असावे लागते. विचारांचे गांभीर्य शाहिरी कवितेच्या उल्लू चेहऱ्यावर आधी टिकत नाही व टिकले तरी सहसा शोभत नाही. भडक प्रसंग, धावती रचना आणि तुटक पण तडफेची भाषा—यांवर शाहिरी कवितेची गोडी व परिणामकारकता अवलंबून असते. शाहीर नेहमी भावनेच्या भाषेत बोलतो; तो पायापुरते पाहतो. पलीकडे पाहण्याचा प्रयत्न करीत नाही. पांडित्य हे त्याच्या ठिकाणी मूळचे म्हणून तर नसतेच, पण त्याचा आवही घालण्याची तो कधी पर्वा करीत नाही. त्याच्या कवनातील प्रसंग हा जसा लोकातून उचललेला, तशी भाषाही तो लोकांचीच वापरतो. अभिजात कवीप्रमाणे तपशीलाचा घोळ तो कधीच घालीत नाही. त्याच्या प्रतिभेची चाल व चमक ही विजेप्रमाणे असते. पाल्हाळ हा शाहिरी कवितेला पांडित्याइतकाच मारक आहे. अद्‌भुताची भुलावण, विकारांचा उन्माद, पौरुषाचा दर्प, धारिष्टाची जादू, इष्काची लज्जत व विनोदातील चटोरपणा यांच्या छटा शाहिरी कवनातून सर्वत्र विखुरलेल्या असतात; आणि लोकचरितातील हा सगळा चटकदारपणा यात एकवटला असल्यामुळेच त्यांची गोडी अवीट वाटते. डफावर थाप पडली म्हणजे, जे हजार–पाचशे लोकांचे कडे शाहिराभोवती हा हा म्हणता पडते, त्याचे कारण झाले तरी हेच होय. तो लोकांकरिता लिहितो, व लोकही त्याची बूज मोठ्या हौसेने करितात. हातात तुणतुणे घेऊन आवेशाने उभा राहिलेल्या, आणि सभोवती जमलेल्या लोकांकडे तोऱ्याने पाहत केव्हा हाताने ताल धरीत, केव्हा कानावर हात ठेवून, केव्हा रंगण घेत, खड्या सुरात पोवाडा म्हणणाऱ्या शाहिराला बघून कुणाला कौतुक वाटल्याशिवाय राहील ?

शाहिरी कवितेचे स्वरूप समजावयाला, तिच्या कारागिराची ही एकंदर परिस्थिती लक्षात घेतल्यावर, अडचण पडत नाही.

शाहिरी कविता या चटकदारपणामुळे कुणाला कितीही आवडली, तरी इतिहासाच्या दृष्टीने तिला किती किंमत द्यावयाची, हा प्रश्नच आहे. तिची पैदास कोणत्या स्थितीत होते आणि फैलाव कशा रीतीने होतो, हे ज्याला माहीत आहे, तो तिला फाजील महत्त्व द्यावयाला केव्हाही कचरेल. कसोटीच्या दगडावरील सुवर्ण–रेषेहून शाहिरी कवनातील इतिहासाची किंमत फारशी अधिक भरणार नाही. अद्भुताची आवड आणि पराचा कावळा करण्याची प्रवृत्ती साधारण लोकांत जितकी असते, तितकीच ती शाहिरांच्याही ठिकाणी असते. शिवाय सामान्य मनुष्याहून कल्पकतेची देणगी शाहिराला विशेष. मग कवित्वाच्या भरात, कल्पना पल्लवित झाल्यावर, इतिहासाला फाटे फुटत असतील हे काय निराळे सांगितले पाहिजे ? औचित्य आणि सत्यासत्यविवेक यांचे शाहिराला बहुतेक वावडेच असते. शिवछत्रपतीचा पुण्यप्रताप तो जितक्या हौसेने वर्णन करील, तितक्याच हौसेने तंटया भिल्लाचीही कारकीर्द गाजवावयाला कमी करणार नाही. त्यातही, त्याच्या कवनाची किंमत, दरबारात किंवा चवाठयावर, एकदा सोन्याच्या भावाने होऊ लागली, म्हणजे बघावयाला नको. सवाई माधवराव व शिंदे सरकार यांच्या रंगाचे रसभरित वर्णन ज्याने केले, त्याच प्रभाकराने पुढे वृद्धापकाळात जो पैसे देईल त्यावर कवने रचिली. प्रासंगिक स्फूर्ती किंवा शीघ्रकवित्व हा शाहिराचा मोठाच गुण समजला जातो. पण चार लोकांत त्याच्या कवनाचे तेज फाकावयाला हा गुण कितीही उपयोगी पडत असला तरी, सत्याच्या विपर्यासाला तो अतोनात कारण होतो, यात शंका नाही. आपले कवन म्हणून दाखविताना स्वतः शाहीर तर

तात्कालिक स्फूर्तीने त्यात भर घालतोच, शिवाय इतरांकडूनही त्यात वेळोवेळी पुढे भर पडत जाते, आणि कालांतराने, अनेक नाल्यांचे पाणी घेऊन जसा पावसाळ्यातील ओढा फुगतो तशी, शाहिरी-कवनाची स्थिती होते. त्या ओढयातील पाणी जितके गढूळ तितकेच शाहिरी कवनातील सत्य कलुषित असते. शाहिरी कवनांची एकंदर सजावट ऐतिहासिक सत्याला अतिशय बाधते.

अतिशयोक्ती हा शाहिरी कवितेचा आणखी एक अवगुण सांगता येईल. वस्तुतः अतिशयोक्ती हा एक प्रमुख काव्यालंकार गणला आहे; व कोणतेही संस्कृत काव्य उघडले तर त्यात या अलंकाराला भरपूर स्थान मिळालेले आढळेल. पण हा अलंकार सत्याला फारच घातक आहे. इंग्रजी शाहिरी कवितेचा मर्मज्ञ अँड्र्यू लँग याने शाहिरी कवन ओळखण्याची काही अचूक लक्षणे सांगितली आहेत. देवतांना आवाहन व त्यांचे अवतरण, बोलणारे पक्षी, पऱ्या व सोने-मोती यांचा सुकाळ ही शाहिरी कवनात हटकून सापडावयाचीच, असे तो म्हणतो. महाराष्ट्रातील खेडयापाडयातून पसरलेली असंख्य लोकगीते जमविण्याचा उद्योग अद्याप कुणी फारसा झटून केला नसल्यामुळे ही लक्षणे त्यांना कितपत लागू पडतात, हे सांगता येणार नाही. परंतु इतिहासाची नवल कथा बनविणारी मनुष्याला असलेली अद्भुताची आवड या लक्षणांत व्यक्त झाली आहे, हे कोणीही कबूल करील. आणि शाहिरी कवितेच्या बाबतीत तरी ती ग्राह्य समजावयाला फारशी हरकत नाही. कारण कवि-कल्पनेची धाव स्वर्गापर्यंत तेव्हाच जाते. खुद्द महाराष्ट्रातील उपलब्ध शाहिरी कवनात देवतांच्या अवतरणाचा अनुभव असा सिंहगडच्या पोवाडयातच फक्त येतो. पण अतिशयोक्तीचे इतर प्रकार त्यात पुष्कळ आहेत, व ते जुन्या अगर नव्या शाहिरी कवनातून सारख्याच प्रमाणात दृष्टीस पडतात. लोकमान्य टिळकांचा कोणताही

पोवाडा किंवा चाफेकर बंधूंवरील गाणे ऐकताना, शाहिरी कवनातून नवा इतिहास कसा निर्माण होतो, याची उत्तम कल्पना येते; आणि या विसाव्या शतकात, आजकालच्या सुशिक्षित शाहिरालाही टिळकांना जर 'अकरावा अवतार' म्हणण्याचा मोह आवरत नाही, तर पंधराव्या शतकातील अडाणी शाहिराने शिवछत्रपतीला 'सांबाचा अवतार' म्हटल्याबद्दल त्याला कोण दोष देईल? या दृष्टीने सावरकरांच्या प्रसिद्ध पोवाडयांना अलिकडील शाहिरी वाङ्मयात पहिले स्थान द्यावे लागेल. अशा प्रकारची उत्तान रचना राष्ट्रीय भावना उद्दीपित करावयाला कदाचित उपयोगी पडत असेल. पण त्यातील नकली देशाभिमानाचा दुर्दम दर्प कित्येक वेळा अगदी दु:सह होतो; व असल्या ठिसूळ पायावर उभारलेल्या राष्ट्रीय भावना कितपत टिकाऊ ठरतील, अशीही शंका आल्यावाचून राहत नाही. हा एक मासला झाला. अशा तऱ्हेची कविता अलीकडे झपाटयाने पैदा होत आहे; व तिलाच ऐतिहासिक म्हणावयालाही लोक चुकत नाहीत.

परंतु असल्या कवनातून इतिहास तर नसतोच. पण राष्ट्रीय भावनाही नसते. कवि-कल्पनांच्या कोळिष्टकात इतिहासाचे सुवर्णसूत्र कसे बेपत्ता होऊन जाते, याचे नमुने म्हणून फार तर ही कवने पुढे करता येतील. ऐतिहासिक कवितेची कल्पना मनात बरोबर उतरून त्याप्रमाणे रचना केलेली क्वचितच दृष्टीस पडते. कादंबऱ्या व नाटके यांत जसा इतिहासाचा अपलाप व उपमर्द जाणून अगर नेणून केलेला आढळतो, तशीच स्थिती आज कवितेचीही झाली आहे; आणि मन थोडे कठोर करून वेळीच इषारा न दिल्यास, हे अनिष्ट वळण सुटण्याची आशाही दिसत नाही. समकालीनावर टीका करण्याचे काम कुणाला आवडेल? त्यातही अशा तऱ्हेच्या चुका स्वत:कडून होऊन राहिल्या असल्यामुळे तर हे काम अधिकच नाजुक व बिकट झाले आहे, पण कसेही असले, तरी ते

केल्यावाचून गत्यंतर नाही. शाहिरी व ऐतिहासिक कवितेत मूळचा असा भेद असला तरी तो फारच थोडा आहे. त्यांच्या सरहद्दी एकमेकाला अगदी भिडलेल्या आहेत, असे म्हटले तरी चालेल. किंबहुना, शाहिरी व ऐतिहासिक हा भेद केवळ कवीच्या मनोरचनेवर अवलंबून असतो, असेही म्हणता येईल. ऐतिहासिक कविता सजविताना कवी कल्पनेचे साहाय्य घेतो खरे, पण तिला सत्याहून कधी प्रभावी होऊ देत नाही. उलट शाहिरी कवितेत कल्पनेचा वरचष्मा असतो, व सत्य हे अंग चोरून एकाद्या आगंतुकाप्रमाणे तिच्या आसऱ्याला उभे असते; सत्याची पायमल्ली ती केव्हा व कशी करील हे सांगवत नाही. शाहिरी कवन हे ज्या गुणांमुळे हटकून लोकप्रिय होते, ते गुण ऐतिहासिक कवितेला फारसे अनुकूल नसतात. शुद्ध सुवर्णाच्या मोहोरेहून भेसळ सोन्याचे नाणे हे नाद चांगला देते, दिसतेही मोहक व वजनालाही हलके असते. पण व्यवहारात त्याची चलती कितीही असली, तरी त्याला शुद्ध सुवर्णाची योग्यता कशी येईल ? सार्वजनिक सभांच्या चवाठ्यावर म्हणून लोकांच्या मनात हर्ष किंवा विषाद उत्पन्न करावयाला शाहिरी कवन कितीही चांगले असले, तरी कलेच्या दृष्टीने त्याची किंमत कमीच भरेल. कारण, त्यात सौंदर्यनिर्माणापेक्षा परिणाम करण्याकडे अधिक लक्ष असते. आजकाल उत्पन्न होणाऱ्या शाहिरी कवनात धड इतिहासही नाही. अगर परिणाम करण्याचीही धमक नाही. कारण कुणाचे व कसेतरी अनुकरण करण्याचाच सोस फार. लोकांचे हृद्‌गत अचुक ओळखावयाला त्यांचा मर्मभेद करावयाला जी बारीक व भेदक दृष्टी असावयाला हवी ती या आधुनिक शाहिरांत नाही. यामुळे गोविंदाग्रजासारख्या श्रेष्ठ कवीच्या हातूनही पानिपतच्या फटक्यासारखी निर्जीव कवने निपजतात.

* * *

# चंद्रास्त

* * *

सौ. कुसुमावती देशपांडे

ग्रंथ सं... ठाणे. स्थळप्रत.
क्रम ३६८५० वि: निबंध
१५२० नों दि

त्या दिवशी रात्री आम्ही सहज गप्पा मारीत बसलो होतो. बराच उशीर झाला होता. पण आमच्यापैकी कुणाच्या तरी मनात अशीच एकदम भटकायला जाण्याची लहर आली व चौघेजण निघालो. समोरचा आडवा रस्ता पलीकडल्या मैदानात मिळून गेल्यासारखा दिसत होता. त्या मैदानाच्या पलीकडे जुन्या राजवटीतल्या पडक्या कालव्याच्या काठी कित्येक वर्षे पहारा देत असलेल्या शिंदीच्या झाडांच्या ओळींच्या ओळी उभ्या होत्या. त्यांच्या माथ्यावर टेकलेली, अस्ताला आलेली चतुर्थीची चंद्रकोर दृष्टीस पडली. तिने दृष्टी खेचून घेतली व बंदिस्त केली. आमच्यापैकी जो कोणी गाडी चालवीत होता, त्याची तरी नजर समोर रस्त्यावर कशी राहिली कोण जाणे! धावपळीच्या जगरहाटीतही मनाच्या गाभाऱ्यात खोल पण तीव्रपणे जाणवत राहणाऱ्या, बेचैन करून सोडणाऱ्या, दुःखपूर्ण विचारासारखी गाडीच्या त्या तीरासारख्या वेगाबरोबरही, तिने आमची साथ केली. तेलंखेडीच्या निर्मनुष्य व काहीशा भीषण परिसरात, झाडांच्या गर्द फांद्यात क्षणभर ती लपून गेली असेल तोच....वळण घेऊन तलावाच्या काठावर आम्ही येताच, तलावाच्या पलीकडल्या टेकडीच्या माथ्यावर आपल्या अलौकिक, उत्कट, व्याकुळ सौंदर्याच्या परिपूर्णतेत आमच्यासमोर उभी राहिली.

आम्ही कुठल्याही वृत्तीत भटकावयाला निघालो असलो, तरी आमची मने आता आमची थोडीच राहिली होती? एक शब्दही न बोलता त्या भयाण, काळवंडलेल्या पाण्याने भरास आलेल्या तलावाच्या कडयावर जाऊन बसणे व डोळ्यांदेखत त्या टेकडीच्या माथ्याजवळ....माथ्याखाली ....झराझर ओढल्या जाणाऱ्या चंद्रकलेकडे, पाते न लवू देता पाहात राहणे, याशिवाय दुसरे काय करणे शक्य होते? ओढलीच जात होती ती. कोणत्या तरी अदृश्य, अज्ञात, अविरोधनीय अशा शक्तीने ओढली जात होती, असहायपणे खेचली जात होती व भोवतालच्या त्या रात्रीच्या साम्राज्याचा ती जणू प्राणच असूनही कोणी काही करू शकत नव्हते. झाडे निःस्तब्ध उभी होती. फत्तराच्या टेकडयाही धूसर, अस्पष्टदर्शन झाल्या होत्या. मावळत्या चंद्रकलेच्या पायाशीच पसरलेला तो शांत जलाशय तिचे रूप आपल्या अंतरंगात साठविण्याचा प्रयत्न करता करताच काळवंडत चालला होता. ती खाली सरकली. तिची कोर टेकडीच्या माथ्यावर क्षणभर विसावली व खाली गेली, चंद्रकलेची दोन शकले झाली? जाता जाता तिने त्या टेकडीला दोन सोनेरी शिंगांचे वैभव बहाल केले, या विचाराने क्षणभर मौज वाटली, तरी खरोखरी तिच्या त्या विद्ध स्वरूपाच्या व्याकुळतेनेच मन व्यापून गेले, ती टोके झपाटयाने खाली....खाली....जात होती. बोटभर....अर्धे बोट... आता नुसतेच दोन बिंदु....!! ज्याला जीवापलीकडे जपावे ते सौंदर्य, तो प्रकाश लुप्त होताना निव्वळच पाहात बसण्याचे ज्याच्या नशिबी येते, त्याच्या मनःस्थितीची जाणीव करून घेण्याची मुलखावेगळी हौस जर कुणाला असेल तर सृष्टीच्या जीवनातल्या या क्षणाला साक्षी राहावे. किती तरी वेळ ते दोन प्रकाशबिंदू त्या काळ्याशार टेकडीच्या माथ्यावर तरळत राहिले. जणू एका निग्रहाने, काळाच्याही

गतीला न जुमानता, तिथे स्थिर झाले. स्थितिलयाच्या उंबरठयावर जीव एकवटून पाहणारे डोळेच ते....

आमच्याबरोबर आलेल्या दोघांना अशाच डोळ्याकडे पाहात बसण्याच्या अनुभवाचा पुनः प्रत्यय मिळाला. चंद्रकलेसारख्या आपल्या कोमल कन्येचा अंत....मातापितरांच्या दोघांच्याही मनांत तो विचार आला. आईचे डोळे पाण्याने डबडबले. बापाने पुढे किती तरी वेळाने दोनच शब्दांत बोलून दाखविले....

ते दोन प्रकाशबिंदू तरळले व एकदम लुप्त झाले. बुडत आलेला मनुष्य एकदम नाहीसा व्हावा तसे अचानकपणे नाहीसे झाले व भोवतालचे जग काळोखात पूर्ण बुडून गेले. अशा क्षणी अभावितपणेच आपली मान त्या जात्या ज्योतीच्या अभिवादनार्थ खाली वाकते....

प्रकाशाचा लोप व जीवनाचा अंत ! आज युगानुयुगे व देशोदेशी या कल्पना अपरिहार्यपणे संलग्न झालेल्या आहेत. पण तरी देखील चंद्रकलेच्या अंताची किती थोडया कवींना आठवण होते. कवींच्या राजराजेश्वरांनाही ती क्वचितच झाली. विझणारा दिवा म्हणीच्या संप्रदायात बसला. निखळलेल्या ताऱ्याची उपमा कुणाच्याही तोंडी खेळते. कारण घरबसल्या दिसणारी ही दृश्ये, त्यांच्या दर्शनासाठी आपल्या दैनंदिन जीवनाचा राजरस्ता सोडून वाट वाकडी करावी लागत नाही. वेळी अवेळी जागत भटकावे लागत नाही. घरागल्ल्यांची वेस सोडून माळराने तुडवावी लागत नाहीत. शेक्सपीअरचा कविहृदयी ऑथेल्लो ताऱ्यांकडे पाहात, एकप्रकारच्या तंद्रीत डेस्डिमोनाच्या खोलीत तिचा प्राण घेण्याला गेला. पण तरी देखील त्याला तिच्या जीवनाच्या अंताची जाणीव दिवा विझवतानाच पटली. 'ही ज्योत आणि मग ती—मी ही ज्योत विझवली तर पुनः एका क्षणात तिचा प्रकाश परत आणू शकेन, पण....ती तुझी ज्योत मालवली तर....' पण डेस्डिमोनाचे

सौंदर्य, कातरपणे, भयभीतपणे चारित्र्यनाशाच्या काळ्याकुट्ट ढगापुढे लोपून जाणारे तिचे निरागस जीवन–काळ्याशार टेकडीच्या मागे लोपणाऱ्या चंद्रकलेकडे डोळे लागले असताना मला एकदम वाटले, अशीच गेली डिस्डिमोना !

आणि राजा अजाची इंदुमती ! सप्परंगी हिऱ्याच्या तेजाने तळपणारे तिचे नवसौंदर्य आपल्या ऐन ऐश्वर्यात लुप्त झाले. त्या चंद्रकलेसारखी इंदुमती पाहता पाहता लुप्त झाली व अज राजासमोर दुःखाची काळी तमिस्रा पसरली. कविकुलगुरू कालिदासाने सूचकपणे लिहिले– ' निमिमील नरोत्तमप्रिया हृतचंद्रा तमसेव कौमुदी ! '

परंतु समोरच्या थरारून सोडणाऱ्या दृश्यापुढे कालिदासाचेही शब्द फिके पडले. दृष्टी पोचेल तेथपर्यंतच्या दाही दिशांच्या प्रदेशावर भयानक अवकळा आणणारी ती घटना अत्यंत आर्त, रोमांचकारी होती. विनाशाचे, अंतिम लयाचे तीव्र दर्शन घडविणारे ते दृश्य कालिदासाच्या कोमल, कथनात्मक पदार्थांच्या लयीत कसे सामावणार ?

सृष्टीची काही गुपिते, तिच्या जीवनातले अत्युत्कट क्षण, तिच्याशी वेळी अवेळी साहचर्य ठेवणाऱ्या जीवांनाच अनुभवायला मिळतात हेच खरे. या बाबतीत सर्वांचा राजा म्हणजे शेले. त्याचा कविनायक ॲलस्टर याने आपल्या कल्पनेतल्या दिव्य मूर्तीचा साऱ्या विश्वात शोध केला व मग निराश होऊन दूर विजनात अंग टाकले. त्याच्या जीवनशक्तीचे अखेरचे थेंब त्याच्या डोळ्यात उभे राहिले व त्या डोळ्यांनी तो समोर अस्तास जाणाऱ्या चंद्रकलेकडे पाहात राहिला. ती आपले तंतुजाल आवरून जसजशी खाली जाऊ लागली, तसतसे त्याचे चैतन्य ओसरू लागले. तिची बिंदुमात्र अग्रे तरळत राहिली–नाहीशी झाली....व तेही निसर्गसंवादी डोळे मिटले !

कितीतरी वाङ्मयीन आठवणी त्या क्षणी माझ्या मनात उभ्या राहिल्या –व काही व्यक्तिगही. या चंद्रकोरीसारखीच नवतेजाने विलसणारी माझी वहिनी मला दिसली व नाहीशी झाली, नवजीवनाचेच प्रतीक असे हिरवे लुगडे नेसलेली, नववधूच्या प्रसन्न पण लाजऱ्या सौंदर्यात पुढे उभी राहिली व तिच्या हास्याची ओळख पटते न पटते, तोच तिचा म्लान झालेला देह मलाच हिरव्या सौभाग्यवाणात गुंडाळावा लागला. त्या आठवणी व ते तळंखेडीवरचे दृश्य त्यानंतर कितीतरी दिवस मनात तरळत राहिले. दिवसभराच्या कार्यव्यापृततेतही ती चंद्रकला जणू डोळ्यांपुढे तरळून जाई व मन अस्वस्थतेत भरून जाई.

अस्वस्थता....हुरहूर... हेच का त्या दृश्यातील परमतत्त्व होते ? हाच होता का त्याचा स्थायी भाव ? तिथे पुन: जाणे, त्या दृश्याचा पुन: अनुभव घेणे, क्षणाचा आशय नीट जाणून घेणे हे अवश्यच होऊन बसले. अपुऱ्या जाणिवेने आपल्याला किती गोष्टींविषयी हुरहूर लागते, त्या दु:खपूर्ण वाटतात. पण धावत्या जीवनातले तेच अनुभव पुन: पकडले, त्यांची पूर्णत्वाने व उत्कटपणे प्रतीती झाली म्हणजे त्यांच्या अंतरंगातल्या सत्याची शांतीच मन व्यापून टाकते.

असे माझे झाले. पुन: कितीदा तरी मी चंद्रास्त पाहण्याचा निश्चय केला व पाहिलाही. प्रत्येक वेळी जातिवंत काव्याच्या प्रवाहासारखे त्याचे नवनवोन्मेष दिसावेत. प्रथमदर्शनानंतर जाणवलेली हुरहूर ओसरली व तिची जागा सृष्टीच्या जीवनातील एका उत्कट सत्याचे दर्शन घडल्याच्या शांत समाधानाने मात्र अधिकाधिक घेतली.

सपाट मैदानावरून धावणाऱ्या आगगाडीच्या खिडकीतून दिसणारी, अंग चोरणाऱ्या, गिरगिरणाऱ्या काळ्याशार शेताच्या पलीकडे क्षितिजाच्या कडेवर शांतपणे उभी असलेली चंद्रकोर....एकदा विनासायास या

दृश्याचा अमृतकलश माझ्यापुढे आला. डब्यातल्या त्या टीचभर दुनियेत, तळहाताएवढया प्रकाशगोलाभोवती, जणू चिरकालासाठी वसती करून बसलेल्या प्रवाशांच्या गर्दीत व बाहेरच्या विस्तीर्ण काळोखी बिछायतीवर क्षणभर टेकलेल्या त्या प्रकाशमय शांत चंद्रकलेत केवढे द्यावापृथिवीचे अंतर! पहिल्या क्षणी त्या जनसंमर्दाशी असलेले आपले सारे मानवतेचे पाश गळून पडतात. आपण त्यांच्यापैकी नाहीच, ती दूरची शांत व प्रकाशमय चंद्रकला, तिचे विश्व, हेच आपले माहेरघर असे वाटू लागते. पण मग ती निरोप घेणारी चंद्रकलाच जणू आपला शांत प्रकाश डोळे भरून पाहणाऱ्याच्या अंतरंगात ओतू लागते. क्षणभर त्याला आपल्याकडे खेचून घेऊन, त्यावर शांतिसिंचन करून, नवी दृष्टी देऊन, त्याला आपल्या ठायी परत पाठवते. मानवाच्या हेतुपूर्ण प्रवासाची व त्याबरोबरच सर्व प्रकाशाच्या एकत्वाची जाणीव करून देते. आगगाडीतल्या दिव्याचा तळहाताएवढा गोल, काहीशा उदास परंतु अलौकिक अशा तेजाने तळपणारी ती चंद्रकोर, वर आकाशाच्या अमर्याद प्रांगणात विखुरलेले असंख्य तारे—काही लहरीलहरींनी तळपणारे, तर काही मंदपणे स्थिरावलेले—सर्वांचे तेज, सर्वांचा प्रकाश, अखेर एकच. इतकेच काय, त्या साऱ्यांच्या अंतरात भरून राहिलेल्या आकाशाच्या पोटीही खरोखरी तोच प्रकाश. प्रकाशगर्भ अवकाश—त्यालाच म्हणतात का श्यामप्रकाश? हर्ष-शोकाच्या पलीकडील जी मानसिक स्थिती, ती प्रकाश-तिमिराच्या पलीकडील सृष्टीतील स्थिती. दर वेळी अशाच स्थितीला जाते का ती चंद्रकोर?

आम्हाला एकदा गणदेवीला जी दिसली, तिने तरी हीच प्रतीती दिली. उन्हाळ्याच्या सुट्टीत पोहणे, आमरसाची जेवणे इत्यादी कार्यक्रमामुळे चंद्रकलेच्या प्रकाशात निजूनही तिला निरोप देण्याच्या वेळी डोळे उघडे राहतच नसत. परंतु एका रात्री चंद्रास्ताच्या वेळेचा हिशेब

करून मध्यरात्रीनंतर त्याच्या दर्शनासाठी आम्ही उठलो. मोकळे क्षितिज दिसावे म्हणून दोघेजण समोरच्या विस्तीर्ण आमराईच्या पलीकडे जाऊन उभे राहिलो. अविचल शांतीचे साम्राज्य पसरले होते. अस्फुटपणे दिसणारी पायवाट, मधूनच शिरावर एकेक प्रकाशबिंदू घेऊन उभी असलेली गवताची पाती, काळीशार मातीची ढेकळे व पलीकडे ते गर्द निःस्तब्ध आम्रवृक्ष....त्यांच्या बाजूला, त्यांच्याच उंचीवर पण क्षितिजाच्या जवळ जवळ जाणारी चंद्रकोर....सारेच शांत होते. तेलंखेडीवरील चंद्रकोरीपेक्षा ती प्रगल्भ होती. अपरिहार्याला धीराने तोंड देणारी होती. म्हणून की काय कोण जाणे, ती दिसेनाशी झाल्यावर, क्षणभर सारे जग अंधारून आले तरी पुन्हा त्या चंद्रकलेच्या आकृतीत तोवर समावलेला प्रकाश आता अंधाराच्या कणाकणातून प्रस्फुरित होऊ लागला. तमाचे कणकण उजळले, प्रकाश आला नाही; पण अंधारही राहिला नाही. तिथे केवळ चैतन्यच राहिले. एखाद्या विराट आंदोलनाच्या नेत्याला काही काळ अज्ञातवास स्वीकारणे प्राप्त झाले तर क्षणभर त्याचे सर्व कार्य लयाला गेल्यासारखे वाटते; त्याची तपस्या वाया गेली, असे वाटू लागते. परंतु लवकरच त्याच तपस्येचे तेज समाजाच्या अनेक कणांतून स्फुरू लागते. त्याच्याच मंत्राच्या नादाने दशदिशा मुखरित होतात. तो पुनः मोकळेपणाने वावरू लागेपर्यंत जीवनाची प्रसन्नता नाहीशी झाली, तरी त्या मधल्या अंधकारातही धीरोदात्त वृत्तीचा विश्वास कायम राहतो. तसेच त्या चंद्रकलेच्या विश्वात झाले होते. जीवनविजिगीषेची शांत वृत्ती निर्माण करून ती नाहीशी झाली होती. तीही काही काळासाठीच. ती पुन्हा वाढत्या तेजाने विलसू लागेल, याचेही आश्वासन तिने देऊन ठेवले होते.

१३५५६

★ ★ ★

# लेखकांचा परिचय

* * *

## १. विष्णु कृष्ण चिपळूणकर

(१८५० ते १८८२) कृष्णशास्त्रांच्या व्यासंगी, रंगदार व प्रगल्भ शैलीचा वारसा विष्णुशास्त्री यांना लाभून तिच्यामध्ये विष्णुशास्त्र्यांचे भाषाप्रेम, देश व धर्म याबद्दलची श्रद्धा मिसळल्यामुळे मराठी निबंधाचा बाळशास्त्री जांभेकरांपासून सुरू झालेला आणि लोकहितवादी इ. नी घडवलेला आकार विशेष रंगसंगतीत नटला. मराठी निबंधाच्या कायमपणाला हवी असलेली अस्मिता देश, भाषा व धर्म यांच्यावरील भक्तीत आहे आणि अशा गद्यरचनेबद्दलचा विश्वासच निबंधाला चिरंतनत्व देईल या अनुभवातून कै. चिपळूणकरांनी मराठी निबंधाचा पाया भक्कम केला. शास्त्रिमनाला दुर्मिळ असणारा गोडवा चिपळूणकरात आढळतो. त्यांच्या शैलीत बीजरूप असणाऱ्या अनेक गुणांच्या वाढीसोबतच नंतरचे मराठी निबंध वाढले.

## २. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

(१८५६ ते १९२०). भारतीय असंतोषाचे जनकत्व व " स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच. " हा अमृत मंत्र यांचा प्रथम घोष करण्याचा मान यांनी मराठी भाषेला दिला. ' थोरांचा पोवाडा थोरांनी गावा ' असा हा विवेकानंदावरला लेख त्यांच्या एरव्ही दृष्टिआड होणाऱ्या ललित शैलीचा नमुना होय. व्यक्तिमत्त्वाचा टणकपणा आणि कोमलपणा याचा हा प्रत्यय. ज्योतिष, तत्त्वज्ञान, धर्म, देश इ. वर सारख्याच सामर्थ्याने हक्क सांगणारा हा मराठी भारतीय आपल्या थोर वंगबंधूच्या मृत्यूवर किती आत्मीयतेने लिहितो ते पाहण्यासारखे आहे. टिळकांच्या लेखन रीतीने नव्हे; पण व्यक्तिमत्त्वाने महाराष्ट्राची पुढची लेखक मंडळी घडवली.

## ३. देशभक्त शिवराम महादेव परांजपे

( १८६४ ते १८९५ ). आपले कथन रोचक करण्यासाठी का होईना; पण महाराष्ट्राचे सारे गंभीर वाटणारे लेखक विनोदाची साखर आपल्या वाङ्मयात पेरतात. अर्थात प्रत्येक संदर्भात त्याचे प्रमाण कमीजास्त होईल. देशभक्त परांजपे हे लोकमान्यांच्या जहाल प्रथेचे पुरस्कर्ते. अनेकदा लोकमान्याहूनही अधिक प्रमाणात पारतंत्र्याविषयी चीड व्यक्त करताना आढळतील. त्यांची कविप्रकृती व उच्च शिक्षणामुळे झालेले व्यासंगाचे संस्कार यामुळे त्यांची लेखणी भावनामय व गहनगंभीर होणार हे उघडच; पण महाराष्ट्राच्या हाडात भिनलेला जो विनोद त्याने परांजप्यांनाही सोडले नाही. प्रस्तुत निबंध त्यांच्या या गुणाची विशेष प्रमाणात जाणीव देईल. Anti-climax (अनुलोम सार) हे या निबंधाचे वैशिष्ट्य आहे.

## ४. विनोदाचे जनक श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

( १८७१ ते १९३४). मराठी विनोद नेहमीच श्री. कृ. कोल्हटकरांना पितृत्व देत आला आहे. त्यांचे ‘ सुदाम्याचे पोहे ’ व त्यातल्या नित्य हासवणाऱ्या व्यक्ती मराठी साहित्यात अजरामर आहेत. मराठीचे इतर थोर शैलीकार आपल्या विचारांना मधुर व प्रसन्न करण्यासाठी विनोदाचा आधार घेतात तर श्री. कृ. कोल्हटकर विनोदाला समाजसुधारणेसाठी राबवतात. अर्थातच दोन्ही कार्ये एकच होत. विडंबन आणि रेशमी चिमटे हे त्यांच्या विनोदाचे प्रधानत्व. परांजप्यांनी विनोद व उपहास यातून भावना प्रगट केल्या तर कोल्हटकरांनी त्याच माध्यमातून आपले सुधारक विचार प्रगट केले. यांच्या लेखनाचा विषय आगरकरांशी नाते सांगतो. तत्कालीन समाजाची दोन अंगे म्हणजे लोकमान्य व आगरकर आहेत. हे लक्षात घेऊन परांजप्यांचे गुरू टिळक व कोल्हटकरांचे स्फूर्तिस्थान आगरकर यांच्याकडे पाहण्याची संधी आपणास मिळते.

## ५. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर

( १८७२ ते १९४७). वाङ्मयाच्या अनेक क्षेत्रात लेखणी सारख्याच सामर्थ्याने चालवू शकणारे हे अष्टपैलू लेखक होते. त्याच कारणामुळे लोक

त्यांना आदराने साहित्यसम्राट म्हणून ओळखीत. लोकमान्यांच्या 'केसरी' या प्रख्यात वृत्तपत्राचे ते संपादक होते. राजकीय क्षेत्रातही त्यांना अजातशत्रू म्हणावे लागेल.

प्रस्तुत निबंधात त्यांच्या मर्मविनोदी, प्रसन्न व ऋतुंभरा शैलीचा प्रत्यय यावा. देशभक्ती आणि साहित्य-सेवा या दोन विशेषांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलले आहे.

## ६. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

(जन्म १८८३). महाराष्ट्राने भारतास दिलेला अत्यंत तेजस्वी पुत्र म्हणून स्वा. सावरकरांचा उल्लेख करावा लागेल. अत्यंत सखोल विचारसरणी, मुद्देसूद मांडणी व पांडित्याचा आव न आणता सरळ सोप्या रीतीने विवेचन करण्याची त्यांची हातोटी सुविख्यात आहे. महाराष्ट्राला त्यांनी तर्कशुद्ध विचारांचे धन दिले.

'माझी जन्मठेप', 'सत्तावनचे स्वातंत्र्य समर' इ. त्यांची पुस्तके मराठी वाचकांस नवी नाहीत. कादंबरी, इतिहास, काव्य (विशेषतः 'कमला'), नाटक वगैरे अनेक प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळले आहेत.

## ७. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

(१८८४ ते १९३७). एक थोर समाजशास्त्रज्ञ, पट्टीचा विद्वान, आगळा कादंबरीकार व 'ज्ञानकोश' या अमोल ठेव्याचा कर्ता म्हणून महाराष्ट्र केतकरांना ओळखतो. बुद्धिमत्तेचा राक्षस असे त्यांना आदराने व कौतुकाने संबोधले जाते. निर्भीडता व निस्पृहता यांनी त्यांचे जीवन काठोकाठ भरले आहे. प्रत्यक्ष जीवनात त्यांनी जी मूल्ये जपून महाराष्ट्राची स्वावलंबी परंपरा सिद्ध केली त्याच मूल्यांच्या बैठकीवर त्यांचा हा लेख आहे. या निबंधाच्या योगाने स्वतः-सारख्या अनेक जुन्या वाङ्मयकारांच्या निर्लोभी स्वभावाची पर्यायाने तेजस्वी महाराष्ट्राच्या वाङ्मयीन अस्मितेची साक्ष त्यांनी दिलेली आहे. त्यांची लेखणी सत्यशोधक आणि तत्त्वनिष्ठ आहे. रीती उमदी आहे.

## ८. आचार्य विनोबा भावे

(जन्म १८९५). देशभक्ती व देवभक्ती साधून आपले संत व्यक्तिमत्त्व मराठी निबंधांना बहाल करणारा हा थोर विचाराग्रणी आहे. त्यांची गीताप्रवचने ही महाराष्ट्राला मिळालेली महान देणगी होय. त्या पुस्तकाची भारताच्या प्रमुख भाषांतून भाषांतरे झाली आहेत. महाराष्ट्राच्या गंभीर व गहन मनाला स्पष्टास्पष्ट विनोदाचीही झालर आहे. त्याचा प्रत्यय येण्यासाठी विनोबाही अपवाद नाहीत. त्यांच्या लेखनात पावित्र्य आणि रुचकरपणा जोडीने नांदतात. तत्त्वज्ञानही त्यांनी शैलीच्या गोडव्याने पाचक करून टाकले.

प्रस्तुत निबंधात 'गीता प्रवचने' या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकाचा मासला पाहायला मिळेल. भूदान यज्ञ, म. गांधींच्या वेळचा सत्याग्रह इ. नी विनोबांचे व्यक्तिमत्त्व नटवले आहे.

## ९. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

(जन्म १८९८). थोर व झुंजार नेता, वाङ्मयाच्या क्षेत्रात शुक्रताऱ्याप्रमाणे तळपणारा तेजस्वी लेखक आणि विशाल हृदयाचा माणूस म्हणून आचार्य अत्रे यांचा लौकिक आहे. लेखनातून प्रगट होणाऱ्या त्यांच्या वैशिष्ट्यात विनोद, उपहास, खंबीरता यांचे बाहुल्य असले तरी अनेकदा त्यांच्या स्वभावाची लपलेली कोवळीक व ललितरम्यता प्रगट झालेली आढळते. त्याची प्रचिती ते कुमारांशी साहित्याबद्दल बोलताना येईल. स्वातंत्र्यप्रिय, देशभक्त, जीवनोन्मुख अत्रे वाङ्मयाच्या ध्येयाबद्दल किती उदार, विशाल व सुरम्य विचार प्रगट करतात ते प्रस्तुत निबंधात दिसेल. विचार देखील ते भावनेच्या लवचिकतेने व गोडव्याने उचित शब्दात मांडतात त्याचा हा पुरावा. त्यांच्या वक्तृत्वाचा चेहरा घेतलेल्या या लेखनात नाट्यगुणही प्रकर्षाने आढळतील.

## १०. श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

(जन्म १९००) मराठी निबंधात चिपळूणकरांच्या शैलीस पुढे नेणारे निबंधकार, फडक्यांच्या नावासोबतच मराठी जिभेवर सतत उच्चारले जाणारे कादंबरीकार आणि यशस्वी पत्रकार हे वर्णन केवळ माडखोलकरांचे. 'शाहिरी

काव्या 'कडे ज्या अभ्यासूवृत्तीने ते पाहतात व त्यावरची मते ज्या रंगीत व चित्रदर्शी पद्धतीने ते मांडतात त्यांत पुढील निबंधकारांची लागवण आहे. मराठीत त्यांनी 'अस्मिता' हा शब्द प्रचलित केला. महाराष्ट्राच्या असणेपणास हा प्रतिशब्द सार्थ होय. विद्यमान लेखकांत यांच्या इतके शब्दप्रभू शोधूनच सापडतील.

## ११. सौ. कुसुमावती देशपांडे

(१९०४ ते १९६१). मराठीच्या लघुनिबंधाचे दालन यांनी समृद्ध केले. क्षुल्लक विषय व त्यात शर्करावगुंठित तत्त्वगोवणी असा पुढे पुढे निर्जीव वाटलेला लघुनिबंधाचा अथवा गुजगोष्टीचा तंत्रखाक्या यांनी बराच बदलवून टाकला. तत्त्वज्ञानासोबतच कविहृदयाची जोड त्यांनी लघुनिबंधास दिली. भाषेच्या सोपेपणास अथवा घरगुतीपणास लालित्य दिले व अभिव्यक्तीस लेखकाच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाची जोड दिली. इतर लघुनिबंधातले 'मी' हे पात्र निबंधाला आत्मनेपदी करतेच असे नाही; पण कुसुमावतींच्या बाबतीत तसा प्रत्यय येतो. सध्याचा ललित लेख हा प्रकार मराठी निबंधाच्या लघुनिबंध या उपप्रकाराशी नाते सांगू लागला तर त्याला कुसुमावतींच्या लेखनप्रकाराशी बऱ्हंशी जवळीक सांगावी लागेल.

* * *

# मराठी साहित्य महामंडळ शुद्धलेखन-नियमावली

## अनुस्वार

१. स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ–तंटा, चिंच, आंबा. संस्कृत अनुनासिकाबद्दल विकल्पाने परसवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

२. य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल संस्कृताप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदाहरणार्थ–सिंह, संयम, मांस.

३. नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्ति-प्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ-लोकांस, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

४. वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी, व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

## ऱ्हस्व दीर्घ

५. तत्सम ऱ्हस्व इकारान्त आणि उकारान्त शब्द प्रथमेत दीर्घान्त लिहावे. उदाहरणार्थ–कवी, गती, मती, गुरू. इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदाहरणार्थ–पाटी, जादू, पैलू, विनंती, ही ( शब्दयोगी अव्यय ). अपवाद–आणि, नि. स्पष्टीकरण–परंतु, तथापि, यथामति इत्यादी तत्सम अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावी. तसेच बुद्धिवैभव, कविराज, गतिमान, गुरुवर्य इत्यादी सामासिक शब्दांतही इकार-उकार ऱ्हस्व लिहावे.

६. दीर्घ ईकारान्त व ऊकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार-उकार ऱ्हस्व लिहावे. उदाहरणार्थ–गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू. अपवाद–नीती, भीती, रीती, कीर्ती इत्यादी संस्कृत तत्सम शब्द.

७. अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार-उकार दीर्घ लिहावे. उदाहरणार्थ–गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद–ऱ्हस्वोपान्त्य अकारान्त तत्सम शब्द. उदाहरणार्थ–गुण, विष, मधुर, प्रचुर.

### सामान्यरूप

८. उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ईकार-ऊकार उभयवचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा. उदाहरणार्थ – गरिबास वकिलांनी, सुनेला, वसुलीची, नागपुरास, जिवाला ( प्राण, मन या अर्थी ). अपवाद–दीर्घोपान्त्य तत्सम शब्द. उदाहरणार्थ–शरीरास, सूत्रात, गीतेत, जीवास ( प्राणी या अर्थी ).

### किरकोळ

९. " पूर " हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामाशी लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदाहरणार्थ—नागपूर, संबळपूर, तारापूर.

१०. कोणता, एखादा ही रूपे लिहावी. कोणचा, एकादा ही रूपे लिहू नये.

११. हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

१२. एकारान्त नामाचे सामान्यरूप याकारान्त करावे. उदाहरणार्थ— करण्यासाठी, फडक्यांना ( म्हणजे फडके यांना ), पाहण्याला. करणेसाठी, फडकेना, पाहणेला यांसारखी एकारान्त सामान्यरूपे करू नयेत.

१३. बोलण्याची भाषा लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी घालावी लागते. त्यावेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

१४. मराठीत रूढ झालेले पुढील तत्सम शब्द अकारान्त लिहावे. उदाहरणार्थ—क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान इत्यादी.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३६५ दि १२.९५
९३७९५
२५१० नों दि ६/६/६२

REFBK-0013776
REFBK-0013776